# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार २२ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


# एक काळ असा येईल, जेव्हा देशाला पंतप्रधानच नसेल

## येत्या चार पाच महिन्यात मोठ्या घडामोडी घडतील

**मुंबई/प्रतिनिधी-** नीट परीक्षेतील पेपरफुटीपासून ते हल्लीच निवडणूक आयोगाच्याविरोधात झालेल्या आंदोलनांपर्यंत आणि दुष्काळी परिस्थितीपासून ते वाढत्या महागाईपर्यंतच्या समस्यांमुळे देशातील जनमानसात धुमसत असलेल्या अस्वस्थतेच्या पार्श्वभूमीवर मनसेप्रमुखराज ठाकरे यांनी आज एक मोठं भाकित केलं आहे. पुढच्या चार-पाच महिन्यात देशांमध्ये मोठ्या घडामोडी घडतील, तसेच एक वेळ अशी येईल की या देशाला पंतप्रधानच नसेल, असा दावा राज ठाकरे यांनी केला आहे.



आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राज ठाकरे यांनी देशात असलेल्या अस्वस्थतेबाबत मोठं विधान केलं. ते म्हणाले की, पुढच्या चारपाच महिन्यांमध्ये या देशात काहीतरी मोठी गडबड होईल, एवढं निश्चित आहे. येत्या काही काळात खूप गोष्टी बाहेर येतील. सरकार चुकांवर चुका करत राहणार आणि हे आता थांबणार नाही. पुढच्या काही महिन्यांत संपूर्ण देश रस्त्यावर आला तरी मला आश्चर्य वाटणार नाही. काही महिन्यांपूर्वी नीटचं आंदोलन झालं होतं. आता हल्ली निवडणूक आयोगाविरुद्ध आंदोलन झालं. आता नीटच्या आंदोलनामध्ये सहभागी झालेले सगळे लोक हे काही नीटचा पेपर देऊन आले नव्हते. पण प्रत्येकाच्या मनात कुठच्या ना कुठच्या गोष्टीचा राग आहे. तो राग व्यक्त करण्यासाठी ही आंदोलनं हे मंच ठरत आहेत, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आज महाराष्ट्रामधील ३०० ते ३२५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. अजून खराब परिस्थिती निर्माण होणार आहे. पुढे पुढे तर अन्नधान्याच्या टंचाईपासून ज्या गोष्टी घडतील त्या मला वाटतं सरकारला झेपणारं प्रकरण नाही आहे. एवढंच ➪(पान २ वर)

# फ्रान्ससारखे प्रयत्न भारतातही सुरू

## देशातील आंदोलनावर मोहन भागवत यांचे भाष्य

**नागपूर/प्रतिनिधी-** दस-यानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा नागपुरात विजयादशमी सोहळा पार पडत आहे. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी विजयादशमीनिमित्त 'शस्त्रपूजन' केले. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या स्मृतीस्थळावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी आपल्या भाषणात त्यांनी देशात सध्या सुरू असलेल्या आंदोलनावर भाष्य केले.

मोहन भागवत म्हणाले की, पश्चिमेकडून एक 'वादळ' उठले आहे आणि त्याबाबत सावध राहणे आवश्यक आहे. कारण फ्रान्स आणि अल्बेनियामध्ये घडणा-या घटना जग पाहत आहे आणि भारतातही असेच प्रयत्न केले जात आहेत. परंतु अशा प्रकारच्या अयोग्य वर्तनाला भारतात स्थान नसावे. लोकशाहीत निदर्शने होणे ही एक स्वाभाविक गोष्ट असली, तरी त्यावर उपाय समाजातूनच शोधले पाहिजेत. कोणत्याही निदर्शनाचा उद्देश हा तोडगा काढणे हाच असावा. काही लोक केवळ स्वस्त लोकप्रियतेसाठी इतरांना भडकवण्याचा प्रयत्न करत असतात, असा आरोप भागवत यांनी केला. मोहन भागवत म्हणाले की,



आपण भारताचे लोक एक आहोत. आपली एकता नैसर्गिक आहे आणि ती हृदयापासून निर्माण होते. हा कोणताही व्यवहार किंवा करार नाही. ही कोणतीही अटींवर आधारित अशी व्यवस्था नाही, जिथे कोणी असे म्हणू शकेल की, 'जर मला बदल्यात काही मिळाले तरच मी भारताचा आहे, अन्यथा नाही.' खरं तर आपली एकता बिनशर्त आहे. भारताकडून आपल्याला काही मिळो किंवा न मिळो, आपल्याकडे जे काही आहे, ते सर्व भारताचेच आहे. जेव्हा आम्ही संघामध्ये 'हिंदू भावने'ला बळकट करण्यासाठी एक संघटित आणि सशक्त हिंदू समाज घडवण्याबद्दल बोलतो, तेव्हा त्याचा अर्थ इतर धर्मांबद्दलचा ➪(पान २ वर)

# शिक्षक निवडणूक: खरी लढत दोन्ही शिवसेनेतच?

# बुलढाणा जिल्हा ठरणार किंगमेकर!







**बुलडाणा/प्रतिनिधीः-** अमरावती शिक्षक मतदार संघ निवडणूक काही दिवसांवर आली आहे. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यात सर्वाधिक मते या वेळेला आहेत. दहा हजार मते असणाऱ्या अमरावती जिल्ह्यात तब्बल नहु उमेदवार उभे आहे, तर त्या पाठोपाठ नऊ हजारावर मते असणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यात दोनच प्रबळ उमेदवार रिंगणात असून स्थानिक अस्मिता नेतृत्वाच्या मुद्दाने जोर धरला आहे. अमरावती जिल्ह्यात उभे असलेले भरभक्कम उमेदवार पाहता मत विभाजन अटळ असून बुलढाणा जिल्हा मात्र किंगमेकर ठरण्याची चिन्हे आहे. या निवडणुकीत अनेक उमेदवार उभे असले तरी मुख्य तिरंगी लढत होण्याची चिन्हे आहे. त्यात दोन्ही शिवसेना आपसात लढतील व पाठोपाठ काँग्रेस, या तिरंगी लढतीमुळे बुलढाणा जिल्हा निर्णायक ठरू शकतो. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे प्राध्यापक दत्तात्रय लहाने, शिंदे शिवसेनेचे किरण सरनाईक, तर काँग्रेसच्या आदिती पोहरे अशी मुख्य लढत दिसत आहे.

**शिक्षकांना बोचतो पैठणीचा डाग-** मागील निवडणुकीत येवल्याची प्रसिद्ध असणारी पैठणी सरनाईकांच्या नावावर केव्हा झाली हे मतदारांनाही कळले नाही. यावरून टीकेचे लक्ष झालेल्या शिक्षकांना यंदा पैठणीचा डाग बोचतो आहे.तो पुसण्याची संधी त्यांना उपलब्ध आहे. जवळपास त्याच मानसिकतेमध्ये मोठी टीका सहन करणारे शिक्षक असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे सरनाईक यांच्यापुढे आव्हानांचा डोंगर आहे. ही निवडणूक सरनाईक यांना सोपी नाही. त्यांचे कार्यकर्तृत्व तसेही मागील पंचवार्षिक मध्ये दिसून आले आहे. शिक्षकांचे प्रलंबित असणारे प्रश्न आजही तसेच रेंगाळत आहे. टप्पा अनुदान व जुनी पेन्शन हे मुद्दे तर आजही धगधगत आहे.

**सरंजामी आदेश शिक्षक पाळतील का?**

दुसरा काँग्रेस चा उमेदवार ऐनवेळी माथी मारावा असाच दिला गेला.अंतर्गत गटबाजी व खेकडे प्रवृत्तीने ग्रासलेल्या काँग्रेसने ऐन वेळेवर दिलेला उमेदवार कितपत स्वीकारला जातो हा कळीचा मुद्दा आहे. सामाजिक कार्यात शून्य योगदान असणाऱ्या अदिती पोहरे यांचा जनसंपर्क तसाही असून नसल्यागतच आहे. केवळ वडिल हर्षवर्धन देशमुख यांची पुण्याई यावर नशीब आजमावणे त्यांना अवघड डोंगर सर करण्यासारखे आहे. शिवाजी शिक्षण संस्थेचे ते अध्यक्ष असले तरी शिवाजी मध्ये भरती होण्यासाठी शिक्षकांना काय काय दिव्य करावे लागते याचा अनुभव शिक्षकांच्या पाठीशी आहे. केवळ गुणवत्तेच्या जोरावर कुणालाही शिक्षक होता येत नाही, इतरही निकष आहे. बरेच काही करावे लागते,ती गुणवत्ता असेल तरच 'शिवाजीत' जमते. त्यामुळे सरंजामी आदेश कितपत पाळले जातात हा प्रश्न आहे. ज्यांची सून म्हणून आदिती पोहरे निवडणुकीत उतरल्या आहे ते प्रकाश पोहरे यांचे वेळोवेळी शिक्षकांविषयी आलेले मत देखील दुर्लक्ष करता येण्यासारखे नाही. शिक्षकच नव्हे तर एकूणच नोकरदार वर्गाविषयी त्यांनी वेळोवेळी आक्रमक भूमिका घेतली आहे. अगदी पगारावर सुद्धा पोहरे यांनी लिहिले आहे. ही बाब शिक्षक विसरले असतील असे मानण्याचे कारण नाही. केवळ शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये आहे म्हणून मतदार शिक्षक पोहरे यांना स्वीकारतील असे मानणे भाबडे पनाचे ठरेल. त्यामुळेच नवख्या आदिती पोहरे यांच्यासाठी ही निवडणूक अवघड सांगितली जाते.

या दोन्ही उमेदवारांच्या तुलनेत बुलढाण्याचे दत्तात्रय लहाने मात्र सेफ दिसतात.बुलढाणा जिल्ह्यातील बक्कळ मतदान त्यातही त्यांचे तळागाळातील सामाजिक कार्य, विधवा परिषदेच्या माध्यमातून तन-मन धनाने झोकुन देण्याची त्यांची वृत्ती, शैक्षणिक क्षेत्रामध्ये लहाने हे नाव आदराने घेतले जाणे ,त्यामुळे बुलडाणा जिल्हा त्यांच्या नावावर एकवटण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ही त्यांच्यासाठी जमेची बाब ठरू शकते.

**शिक्षकांच्या मनातील बोलताहेत उद्धव ठाकरे-**

मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी फारसे आढेवेढे न घेता कुठलाही अभ्यास आयोग न नेमता सरसगट कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला होता. यावरून त्यांच्या सरळ स्वभावाची कल्पना सर्वांनाच आली आहे. याच वेळी ठाकरे यांनी जुनी पेन्शन लागू करण्याचे स्वतः मान्य केले होते. मात्र सरकार पडले आणि तो मुद्दाही बाजूला राहिला. मात्र हा मुद्दा ठाकरे यांनी अजूनही सोडलेला नाही. नुकतेच उद्धव ठाकरे यांनी याच विषयावर जाहीर पत्रक प्रसारित केले असून जुनी पेन्शन योजना व टप्पा अनुदानावर मोठे भाष्य केले आहे. कोरोना काळात जेव्हा कर्मचारी पगार कपातीचा मुद्दा आला तेव्हा उद्धव ठाकरे यांनी शिक्षकांचे पगार शाबूत ठेवले होते हे विशेष.त्यामुळे ठाकरे यांच्याविषयी गुरुजी सॉफ्ट आहे. आता प्रा.लहाने यांच्यासाठी ठाकरे यांनी भावनिक साद घातली आहे. जुनी पेन्शन लागू करण्याचे अभिवाचन त्यांनी दिले असून लहाने यांच्यासाठी ही जमेची बाब ठरू शकते. नेमके याच मुद्द्यावर पदवीधर निवडणुकीमध्ये नवखा उमेदवार विजयी झाला होता.

## दिलीप गावितची सोनेरी कामगिरी, एशियन पॅरा गेममध्ये जिंकलं सुवर्णपदक

**मुंबई/प्रतिनिधी-** नाशिकचा मराठमोळा धावपटू दिलीप गावित याने सोनेरी कामगिरी करत जापानमधील नागोया येथे सुरू असलेल्या एशियन पॅरा गेम्समध्ये सुवर्णपदक पटकावलं आहे. दिलीप गावित याने पुरुषांच्या १०० मीटर धावण्याच्या टी-४७ प्रकारात अवघ्या १०.६९ सेकंदात शर्यत पूर्ण करत विक्रमी वेळेसह सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. याबरोबरच भारतीय संघाने एशियन पॅरा क्रीडा स्पर्धेत आपल्या ५० पदकांचा टप्पा ओलांडला आहे. दरम्यान, ग्लास्गो येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत पुरुषांच्या १०० मीटर टी ४७ अंतिम शर्यतीत नाशिक जिल्ह्यातील आदिवासी पाड्यातील दिलीप महादू गावित याने १०.७१ सेकंदांत राष्ट्रकुल स्पर्धेतील विक्रमी आणि हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले होते.

## दीक्षाभूमीवरच्या गर्दीत हरवलेली ८० बालके पालकांच्या स्वाधीन

**नागपूर :** धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मंगळवारी दीक्षाभूमीवर अभूतपूर्व जनसागर उसळला होता. या गर्दीत पालकांचे बोट धरून आलेली ८० बालके वाट चुकल्याने हरवली. मात्र बजाज नगर पोलीस ठाण्याने चाइल्ड हेल्पलाइनच्या माध्यमातून मोहिम राबवत वाट चुकलेल्या आणि गर्दीत भरकटलेल्या चिमुकल्यांचा शोध घेत कुटुंबीयांशी त्यांची पुनर्भेट घडवून आणली. दिक्षाभूमीर येणाऱ्या बालकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी राबलेला हा उपक्रम त्यामुळे महत्त्वपूर्ण ठरला. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशाच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने अनुयायी दीक्षाभूमीवर समतेच्या सागरापुढे नतमस्तक होण्यासाठी येतात. या गर्दीत बालके हरवण्याची जोखीम असते. बाहेरगावाहून पालकांसोबत येणाऱ्या बालकांसाठी हे शहर नवखे असते. त्यात दिक्षाभूमीवरचा जनसागर अशा मुलांना भीतीदायक असतो. ही जोखीम लक्षात घेऊन चाइल्ड हेल्पलाइनच्या माध्यमातून हातावर ओळखपत्राचा बँड लावण्याची मोहिम राबवली गेली.

# SBIच्या ४,००० ग्राहकांचा डेटा लीक

## डार्क वेबवर नाव-नंबर, ईमेल आणि पत्ता उपलब्ध

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** देशातील सर्वात मोठी सरकारी बँक, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सुमारे ४,००० ग्राहकांचा डेटा डार्क वेबवर लीक झाला आहे. बँकेने डेटा लीकप्रकरणी चौकशीही सुरू केली आहे. SBI ने बुधवारी स्टॉक एक्स्चेंजला केलेल्या फाइलिंगमध्ये याची माहिती दिली. बँकेने सांगितले की, डार्क वेबवर लीक झालेल्या डेटामधील ३,८९७ ग्राहकांच्या नोंदींमध्ये वैयक्तिक ओळख पटवणारी माहिती (PII) आढळली आहे. इच्छ म्हणजे नाव, मोबाइल नंबर, ईमेल, पत्ता, आधार किंवा बँक CIF नंबर यांसारखी माहिती.

SBI ने सांगितले की, १६ ऑक्टोबर रोजी डार्क वेबवर डेटा लीकसंदर्भात त्यांना अलर्ट मिळाले होते. हे अलर्ट बँकेच्या थ्रेट इंटेलिजन्स सेवा प्रदात्याकडून, डिफेन्स सायबर एजन्सीकडून आणि इंडियन कॉम्प्युटर



इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम (CERT-In) कडून जारी करण्यात आले होते. या इशाऱ्यांनंतर लगेचच बँकेच्या तांत्रिक टीमने तपास प्रक्रिया सुरू केली. अलर्ट मिळाल्यानंतर डार्क वेबवर उपलब्ध असलेल्या सुमारे ३,७५,००० रेकॉर्ड्सचे प्राथमिक विश्लेषण करण्यात आले. या तपासादरम्यान बँकेला आढळून आले की, एकूण ३.८९ लाखांहून अधिक रेकॉर्ड्सपैकी ३,८९७ ग्राहकांच्या ➪(पान २ वर)













# प्लास्टिकमुक्त नांदगाव पेठसाठी ग्रामस्थांचा निर्धार! सार्वजनिक वाचनालयाच्या पुढाकाराने जनजागृती

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ स्वच्छ, सुंदर व प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला. ग्रामपंचायतीच्या सहकार्याने व सभागृहात आयोजित कार्यक्रमात सार्वजनिक वाचनालयाच्या पुढाकाराने अखिल भारतीय ग्राहक पंचायत आणि अमरावती जिल्हा ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली हा संकल्प करण्यात आला. थोर पुरुषांचे स्मरण करून आयोजित या उपक्रमात प्रशासक व मान्यवरांनी प्लास्टिकमुक्त गावासाठी नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.



प्रशासक हनुमान सिडाम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा समन्वयक चारुदत्त चौधरी, अमरावती जिल्हा ज्येष्ठ नागरिक मंडळाचे सर्वेसर्वा पुरुषोत्तम गावंडे, डॉ. राजपूत, मधुकर भोपाळे आणि प्रा. राम पांढरीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

चारुदत्त चौधरी यांनी प्लास्टिकचे दुष्परिणाम आणि त्याच्या निर्मूलनासाठी प्रत्येक नागरिकाने घ्यावयाची जबाबदारी प्रात्यक्षिकांसह स्पष्ट केली. शासनाच्या कोणत्याही योजनेच्या यशस्वितेसाठी ग्रामस्थांचे सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नांदगाव पेठ स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिकमुक्त झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास पुरुषोत्तम गावंडे यांनी व्यक्त केला.

नांदगाव पेठ प्लास्टिकमुक्त करण्यासाठी शासनाच्या वतीने संपूर्ण सहकार्य राहील. प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रित प्रयत्न केल्यास प्लास्टिकमुक्त गावाचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होईल, असा विश्वास अध्यक्षीय मनोगतात प्रशासक हनुमान सिडाम यांनी व्यक्त केला.कार्यक्रमात पाहुण्यांचा परिचय अनिल वानखडे यांनी करून दिला. ग्रामपंचायत अधिकारी हर्षदा बोंडे यांनी स्वागत केले. वाचनालयाचे राजन देशमुख यांनी सूत्रसंचालन, तर ग्रंथपाल स्नेहल मुळे यांनी आभार प्रदर्शन केले.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार, गणेशोत्सव मंडळाचे उदयसिंह चंदेल, ज्येष्ठ नागरिक मंडळाचे गोवर्धन बोडखे, विनोद रंधवे, स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी निखिल इंगोले, अर्पित धर्म, विवेक कावरे, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चारा टंचाई दूर करण्यासाठी शेतकऱ्यांनी रब्बी ज्वारी पेऱ्यावर भर द्यावा

## कृषी सहसंचालक गणेश घोरपडे

**अमरावती/प्रतिनिधीः-** दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे जनावरांच्या चाऱ्याच्या टंचाईची शक्यता वर्तवली जात आहे.या पार्श्वभूमीवर जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा वापर करून खात्रीशीर पर्याय म्हणून शेतकऱ्यांना रब्बी ज्वारीच्या पेरणीवर भर देण्याचे आवाहन, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनी केले आहे.

यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे जमिनीतील ओलाव्यावर परीणाम झाला असून भूगर्भातील पाण्याची पातळी खालावली आहे. यामुळे जनावरांच्या चाऱ्याच्या टंचाईची शक्यता वर्तवली जात आहे. अशात जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा वापर करून खात्रीशीर पर्याय म्हणून जास्तीत जास्त क्षेत्र रब्बी ज्वारी खाली आणणे आवश्यक असून शेतकऱ्यांनी रब्बी ज्वारीच्या पेरणीवर भर द्यावा, असे विभागीय कृषी सहसंचालकांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

रब्बी ज्वारी हे कमी पाण्यात आणि कमी ओलाव्यावर येणारे अत्यंत महत्त्वाचे पीक आहे.

या पिकापासून मानवी आहारासाठी उत्तम दर्जाचे धान्य तर मिळतेच, शिवाय जनावरांसाठी पौष्टिक आणि चवदार कडबा (चारा) मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतो. चालू रब्बी हंगामासाठी ज्वारीचे बियाणे बाजारात पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी जवळच्या अधिकृत कृषि सेवा केंद्रातून बियाण्यांची खरेदी करावी. कोरडवाहू क्षेत्रासाठी आणि कमी ओलाव्यासाठी मालदांडी ३५-१, फुले अनुराधा, फुले माऊली, फुले सुचित्रा या वाणांची शिफारस करण्यात आली आहे.

पिकाची उगवण चांगली होण्यासाठी जमिनीतील ओलावा संपण्यापूर्वी शेतकऱ्यांनी रब्बी ज्वारीची पेरणी तातडीने करावी, पारंपरिक पिकाऐवजी रब्बी ज्वारीला प्राधान्य देऊन आर्थिक नुकसान टाळावे आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडवावा यासंदर्भात अधिक माहिती व मार्गदर्शनसाठी शेतकऱ्यांनी कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा,असे सांगण्यात आले आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## एक काळ असा येईल,

नाही तर इतरही काही गोष्टी घडतील. त्यातून एक वेळ अशी येईल की या देशाला पंतप्रधानच नसेल, बघू काय होतंय ते?, असे भाकित राज ठाकरे यांनी केले. तसेच देशात ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका व्हायला हव्यात या मागणीचाही राज ठाकरे यांनी यावेळी पुनरुच्चार केला. बॅलेट पेपरवर निवडणुका व्हाव्यात हीच आमची मागणी आहे. पुढाललेल्या देशात बॅलेट पेपरवर निवडणुका होतात मग भारतात ईव्हीएम मशीन कशाला हवी, असा सवालही त्यांनी विचारला.

## फ्रान्ससारखे प्रयत्न भारतातही

परस्पर आदर किंवा राष्ट्रीय एकता यांच्या विरोधात जाणे असा अजिबात नाही. हिंदू मानसिकता आणि चारित्र्य मुळातच सर्वसमावेशक असल्याने आणि सर्वांना सामावून घेणारे असल्याने हा प्रयत्न प्रत्यक्षात आपली भावनिक एकता, सदिच्छा आणि नैतिक अखंडता अधिक दृढ करतो. याच मूल्यांपासून (संस्कारांपासून) प्रेरित होऊन, कॅप्टन स्मित मच्छार यांनी अलीकडे जे कृत्य केले, ते पूर्णपणे स्वाभाविक होते. अशा परिस्थितीत कसे वागावे, याचे कोणतेही विशेष प्रशिक्षण त्यांना दिलेले नव्हते. उलट त्या कसोटीच्या क्षणी त्यांच्यामध्ये रुजलेली परंपरा आणि मूल्ये आपोआपच समोर आली, असे म्हणत मोहन भागवत यांनी स्मित मच्छार यांचे कौतुक केले.

## SBIच्या ४,००० ग्राहकांचा

डेटामध्ये त्यांची वैयक्तिक माहिती होती. तपासात समोर आलेल्या ३,८९७ रेकॉर्ड्समध्ये ग्राहकांची अनेक वैयक्तिक आणि बँकिंगविषयक माहिती समाविष्ट आहे...

**वैयक्तिक तपशील:** ग्राहकांची नावे, लिंग, नोंदणीकृत मोबाईल क्रमांक, जन्मतारीख, ईमेल-आयडी आणि घराचा पत्ता।

**बँकिंग तपशील:** शाखा कोड, कस्टमर इन्फॉर्मेशन फाइल (CIF) आयडेंटिफायर्स आणि लीड आयडी।

कर्जाची कागदपत्रे: कर्ज आणि लीड रेकॉर्डशी संबंधित मेटाडेटा तसेच त्यांच्याशी संबंधित इतर फाइल्स।

**हॅकर ग्रुप 'Siriusim' ने बँकेचा डेटा हॅक केला-** बँकेचे हे अधिकृत निवेदन अज्ञात हॅकर ग्रुप 'Siriusim' ने केलेल्या दाव्यानंतर आले आहे। या ग्रुपने दावा केला होता की, त्याने एँघ शी संबंधित ग्राहकांचा डेटा, कर्ज अर्ज आणि खाते उघडण्याची कागदपत्रे हॅक केली आहेत. सायबर सिक्युरिटी मॉनिटरिंग अकाउंट 'CyberPulse56' ने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ̎ वर १६ ऑक्टोबर रोजी पहिल्यांदा या दाव्याकडे लक्ष वेधले होते।

**बँकेच्या कामकाजावर-सेवांवर कोणताही परिणाम नाही**

SBI ने सांगितले की, या घटनेचा बँकेच्या मुख्य व्यवसाय संचालनावर, सेवांवर, आर्थिक कामगिरीवर किंवा व्यवसायाच्या सातत्यावर कोणताही परिणाम झालेला नाही. बँकेचे मुख्य कामकाज कोणत्याही व्यत्ययाशिवाय सुरळीतपणे सुरू आहे. SBI ने सांगितले की, या संपूर्ण घटनेवर बँक सतत लक्ष ठेवून आहे. लागू असलेल्या सर्व नियमांनुसार बँक आवश्यक ती पावले उचलेल. तपासणीत हे पाहिले जाईल की लीक झालेला डेटा पूर्णपणे अधिकृत आणि संपूर्ण आहे की नाही, तो लीक होण्याचा स्त्रोत काय होता आणि ग्राहकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी कोणते प्रतिबंधात्मक उपाय तातडीने लागू केले पाहिजेत.

**पर्सनली आयडेंटिफायेबल इन्फॉर्मेशन (PII):** ही एखाद्या व्यक्तीची अशी वैयक्तिक माहिती असते, ज्यामुळे तिची ओळख थेट उघड होऊ शकते. यामध्ये नाव, नंबर, ईमेल, पत्ता, आधार किंवा बँक CIF नंबर यांसारखे तपशील समाविष्ट असतात. सायबर गुन्हेगार याचा वापर स्पॅम, फिशिंग हल्ले किंवा आर्थिक फसवणुकीसाठी करू शकतात.

इंटरनेटचा तो लपलेला भाग, जो सामान्य सर्च इंजिनद्वारे (जसे की गुगल) शोधता येत नाही. त्याचा ॲक्सेस घेण्यासाठी विशेष ब्राउझरची (जसे की ऊदे) गरज असते. सायबर गुन्हेगार चोरीला गेलेला डेटा खरेदी-विक्री करण्यासाठी याचा वापर करतात.

## धारदार शस्त्राने युवकाची

येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. परंतु, डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

हत्येची माहिती वाऱ्या सारखी पसरली. चांदूरबाजार पोलीस स्टेशनचे ठाणेदार आधारसिंह सोनवणे, प्रेमसिंग केदार, सुवास पोटे, रोशन चव्हाण, कोपचे, सलामे, गोविंद शिंदे व पोलीस पथक तातडीने घटनास्थळी आणि ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अचलपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांनीही तात्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. सध्या पोलिसांकडून आरोपीचा कसून शोध घेतला जात असून चांदूरबाजार पोलीस पुढील कायदेशीर तपास करत आहेत.

## डॉ. भोजने मॅटरनिटी हॉस्पिटल

अल्पवयीन मुलीच्या प्रियकराविरुद्ध १८ ऑक्टोबर रोजी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणातील पीडित अल्पवयीन मुलीचे मित्रासोबत प्रेमसंबंध होते. त्यातून ती गर्भवती राहिली. गर्भधारणे बाबत माहिती मिळाल्यानंतर मुलीच्या कुटुंबीयांनी तिला डॉ. वैशाली भोजने यांच्या रुग्णालयात उपचारासाठी नेले. १५ ऑक्टोबर रोजी मुलीची प्रसूती होऊन तिने एका बाळास जन्म दिला. त्यानंतर नवजात बाळाच्या ताब्यावरून व संगोपनाबाबत वाद निर्माण झाला. पीडित मुलीच्या आईने याबाबत डॉक्टरांना विचारणा केली. त्यावर डॉक्टराने बाळाला अनाथाश्रमामध्ये ठेवण्याचे म्हटले होते. पण असे न करता त्यांनी बाळाचा परस्पर सौदा केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता. रुग्णालय सील केल्यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

**३.५० लाखांत विक्रीचा प्रयत्न-** या बाळाला साडेतीन लाखांत विकण्याचा कथित प्रयत्न झाला. याप्रकरणी डॉ. वैशाली भोजने, त्यांचे पती व अन्य एकाविरूद्ध अत्याचार व मानवी तस्करीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आपणच हा सापळा रचला होता, तो यशस्वी झाल्याचा दावा शिवसेना शिंदे गटाच्या सहसंपर्कप्रमुख वर्षा भोयर यांनी पत्रपरिषदेतून केला होता. भोजने यांच्याकडे आलेल्या अल्पवयीन मुलींची प्रसूती करून नवजात बालकांची विक्री केली जात असल्याची कुजबूज चार वर्षापूर्वीपासून कानी होती, असे त्यांचे म्हणणे होते. आपण पाठविलेल्या डमी महिला रुग्ण आणि डॉ. भोजने यांच्यातील ३.५ लाखांमधील बाळ विक्रीचा ऑडिओ संवाद पोलिसांना दिल्याचेही वर्षा भोयर यांनी स्पष्ट केले. या प्रकरणात डॉक्टरचे पती प्रफुल्ल भोजने यांनी धमकी दिल्याचा आरोप करत पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी करून सीसीटीव्ही आणि डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवावेत, अशी मागणी त्यांनी केली. या पुराव्यांच्या आधारावर रुग्णालयाला सील लावण्यात आले.

**आरोग्य विभागाची कारवाई-** दरम्यान, संबंधित रुग्णालयाचा वैद्यकीय परवाना, इतर आवश्यक कागदपत्रे, रुग्णालय सील करण्याची प्रक्रिया यासंदर्भात फ्रेजरपुरा पोलिसांनी सोमवारी जिल्हा शल्य चिकित्सक तसेच महापालिकेच्या आरोग्य विभागाला पत्र पाठवले होते. संबंधित यंत्रणेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर आज आरोग्य विभाग आणि पोलीस पथकाने डॉ. वैशाली भोजने यांच्या रुग्णालयाला आणि घराला टाळे ठोकले.

## भावाचा साखरपुडा जिव्हारी;

जामोदकर (वय २३) आणि शोएबुद्दीन सिराजुद्दीन शेख (वय ३२) यांना अटक केली.

मिळालेल्या माहितीनुसार, मयूर एका तरुणीसोबत देवीच्या दर्शनासाठी जात होता. ते कुलकर्णी रुग्णालयाजवळ पोहोचले असता दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांच्यावर अचानक चाकूने वार केले. या हल्ल्यात दोघेही जखमी झाले. परिसरातील नागरिकांनी तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल केले. तरुणीवर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.

विशेष म्हणजे, घटनास्थळाजवळ दुर्गोत्सव मंडळे असल्याने परिसरात नागरिकांची वर्दळ होती. अशा परिस्थितीत झालेल्या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. हल्ल्यामागे मयूरच्या नातेवाइकाचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची दिशा बदलली. राजापेठ पोलिसांच्या डीबी पथकाने तत्परतेने हालचाली करून मयूरचा लहान भाऊ धीरज आणि त्याचा साथीदार शोएबुद्दीन यांना ताब्यात घेतले.

**नाराजीचे हल्ल्यात रूपांतर?** प्राथमिक माहितीनुसार, मोठ्या भावाचा साखरपुडा झाल्यामुळे धीरज नाराज होता. याच नाराजीतून त्याने साथीदाराच्या मदतीने हल्ला केल्याचा संशय आहे. मात्र, हल्ल्यामागील नेमकी पार्श्वभूमी आणि इतर बाबींचा तपास सुरू आहे. पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहेत.

## अंजनगाव सुर्जी घनकचरा निविदा

खंडपीठात पोहोचले असून, न्यायालयाने यावर महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना कायद्यानुसार चार आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नगरपरिषदेने काढलेल्या घनकचरा संकलन व वाहतूक निविदेमध्ये शासकीय नियमांचे आणि निकषांचे काटेकोर पालन झाले नसल्याचा आक्षेप नगरसेविका सीमा विजेकर यांनी सर्वसाधारण सभा आणि विविध बैठकांमध्ये अत्यंत आक्रमकपणे घेतला होता. निविदा प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचा व विशिष्ट कंत्राटदाराला फायदा पोहोचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा मुद्दा त्यांनी सातत्याने लावून धरला होता. मात्र, सत्ताधारी गटाने आपल्या बहुमताच्या जोरावर त्यांच्या प्रत्येक कायदेशीर आक्षेपाकडे कानाडोळा केला आणि निविदा प्रक्रिया पुढे रेटण्याचा प्रयत्न केला. यामुळे हा वाद अधिकच चिघळत गेला.स्थानिक पातळीवर सत्ताधारी आणि प्रशासनाकडून न्याय न मिळाल्याने, सीमा विजेकर यांनी हार न मानता थेट कायदेशीर लढाई लढण्याचा निर्णय घेतला. त्यांनी या वादग्रस्त घनकचरा निविदा प्रक्रियेला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केली. त्यांच्या वतीने न्यायालयात निविदेतील त्रुटी आणि नियमांचे उल्लंघन झाल्याचे पुरावे सादर करण्यात आले.या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने या प्रकरणाची अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. न्यायालयाने या प्रकरणी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांना संबंधित कायद्यानुसार चार आठवड्यांच्या आत योग्य तो निर्णय घेण्याचे स्पष्ट व कडक निर्देश दिले आहेत.उच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर शिवसेना (उबाठा) गटाच्या नगरसेविका सीमा विजेकर यांच्या चिकाटीचे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे अंजनगाव सुर्जी शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता, एकट्या महिला लोकप्रतिनिधीने संपूर्ण सत्ताधारी यंत्रणेविरुद्ध आणि प्रशासनाविरुद्ध दिलेल्या या कायदेशीर लढ्यामुळे सत्ताधारी गटाची चांगलीच कोंडी झाली आहे. नगरपरिषदेने वेळीच विजेकर यांच्या आक्षेपांची दखल घेऊन निविदा प्रक्रियेतील त्रुटी दूर केल्या असत्या, तर आज नगरपरिषदेवर ही न्यायालयीन नामुष्की ओढवली नसती. आता हायकोर्टाच्या आदेशानुसार नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांच्या निर्णयाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, येत्या चार आठवड्यांत या वादग्रस्त निविदेचे भवितव्य काय असणार, हे स्पष्ट होईल.

## चांदूर रेल्वेत वीजपुरवठा व्यवस्थेचा

प्रकार घडत असल्याने महावितरणच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

चांदूर रेल्वे शहरासाठी पूर्वी ६६ केव्ही क्षमतेच्या वीजपुरवठ्याचा संदर्भ दिला जात असताना, सध्या ३३ केव्हीच्या पुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत असल्याचा दावा करण्यात येत आहे. या परिस्थितीमुळे शहरातील वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला असून, त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी होत आहे. बुधवार दुपारपासून ते सायंकाळपर्यंत शहरातील वीजपुरवठा बंद होता. धामणगाव रेल्वे ते चांदूर रेल्वे दरम्यानच्या वीजवाहिन्यांमध्ये केबल जळाला, शॉर्टसर्किट झाला आणि अन्य तांत्रिक बिघाड झाल्याचे सांगून दिवसभर वीजपुरवठा बंद होता. संबंधित ठेकेदार आणि महावितरणचे अधिकारी तात्पुरती दुरुस्ती करून वीजपुरवठा सुरू करतात; मात्र कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने त्याच समस्या पुन्हा उद्भवत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

विशेष म्हणजे, वादळ, पाऊस किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती नसतानाही शहरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होते, लघुव्यावसायिकांची कामे ठप्प होतात, तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही विपरीत परिणाम होतो.

या समस्येबाबत आमदार प्रताप अडसड यांना अनेकदा माहिती देण्यात आली असून, कायमस्वरूपी उपाययोजनेसाठी विविध प्रस्तावही मांडण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, अद्याप या प्रश्नावर ठोस तोडगा निघालेला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. शहराच्या वीजपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी अधिक गांभीर्याने लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, संबंधित महावितरणचे सहाय्यक अभियंता कवाडे यांच्याशी संपर्क साधून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, फोनला प्रतिसाद मिळाला नाही. वीजपुरवठा वारंवार खंडित होत असतानाही वीजबिलांमध्ये कोणतीही सवलत दिसून येत नाही; उलट अनेक ग्राहकांची बिले वाढून आल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

चांदूर रेल्वे शहरातील वीजपुरवठा बुधवारी दुपारपासून खंडित झाल्याने शहरातील अनेक कामांवर परिणाम झाला. सणासुदीच्या काळातही नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत असल्याने महावितरणच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील वीजपुरवठा सुरळीत ठेवणे आवश्यक असताना, वारंवार होणाऱ्या खंडित वीजपुरवठ्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. आम आदमी पार्टीचे नेते नितीन गवळी यांनीही या समस्येबाबत अनेकदा निवेदने देऊन पाठपुरावा केला आहे. मात्र, निवेदनांनंतरही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. आता तरी महावितरण प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन वीजवाहिन्यांची तांत्रिक तपासणी, आवश्यक दुरुस्ती आणि कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी चांदूर रेल्वेतील नागरिकांकडून होत आहे.

## प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना २ कोटी ७६ लाख

सरपंच अक्षय चऱ्हाटे पदाधिकारी सचिन ढवळे शिवाजी चऱ्हाटे, सतिश दाभाडे व अन्य प्रमुख मंडळी उपस्थित होती.विदर्भातील शेतकऱ्यांवर गेल्या २००६ ते २०१३ या कालावधीत तत्कालीन सरकारने केलेल्या अन्याया विरोधात बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या माध्यमातून मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वात सरळ खरेदी धारक शेतकऱ्यांसाठी गेल्या १२ वर्षापासून प्रचंड असा संघर्ष सुरू होता.या संघर्षाची तिव्रता बघता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २४ मध्ये बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने नियामक मंडळाच्या ८५ व्या बैठकीत विषेश सानुग्रह अनुदान म्हणून प्रति हेक्टरी पाच लाख रुपये सानुग्रह अनुदान मंजूर केले होते.विदर्भातील एकुण १६३३३ हेक्टर करीता ८३२ कोटी रुपयांसाठी मान्यता प्रदान करण्यात आली होती. १६ एप्रिल २५ मध्ये अमरावती येथील सांस्कृतिक भवनात सानुग्रह अनुदानाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते करण्यात आला होता. आता टप्प्याटप्प्याने हे अनुदान वितरित करण्यात येत असुन दर्यापूर तालुक्यातील मौजे सांगवा येथील चंद्रभागा बॅरेज लघु प्रकल्पात एकुण ४५ सरळ खरेदी धारक शेतकऱ्यांना दोन कोटी ७६ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान प्राप्त झाले होते. मंजूर झालेल्या अनुदानाचा धनादेश दसऱ्याच्या आधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हावा हा प्रामाणिक उद्देश ठेवून बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सानुग्रह अनुदानाचे वाटप यावेळी दर्यापूर मतदार संघाचे आमदार गजानन लवटे व अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रविण तायडे यांच्याहस्ते करण्यात आले. १० वर्षाच्या संघर्षाचं यश अखेर आपल्या हातात बघून उपस्थित प्रकल्पग्रस्तांचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर निखळपणे दिसत होता. प्रास्ताविक देवानंद भुस्कुट यांनी केले तर आभार सतिश दाभाडे यांनी मानले.

# मुक्त विद्यापीठाच्या केंद्रीय युवा महोत्सवात कौस्तुभ पाचडे प्रथम



**अमरावती/प्रतिनिधीः-** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नाशिक येथे नुकत्याच झालेल्या केंद्रीय युवा महोत्सव २०२६ मध्ये श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय केंद्राचा विद्यार्थी कौस्तुभ पाचडे याने वादविवाद आणि वकृत्व या दोन्ही स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. कौस्तुभ पाचडे हा पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचा विद्यार्थी असून या स्पर्धेत त्याने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले होते. कौस्तुभ पाचडे याच्या या यशाबद्दल त्याचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे, मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्राच्या संयोजिका डॉ. सुजाता सबाने, पत्रकारिता अभ्यासक्रमाचे संयोजक डॉ.कुमार बोबडे यांनी नुकताच सत्कार केला.याप्रसंगी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. संजय कटाईत, डॉ. प्रशांत हरमकर, विवेक जाधव, प्रा. शुभम बांबल आदी उपस्थित होते.

## नाइट ड्युटीनंतर घरी झोपलेल्या

एका नामांकित खासगी रुग्णालयात कार्यरत होती. नाइट ड्युटी पूर्ण केल्यानंतर ती घरी परतली आणि झोपली. त्यावेळी तिचे आई-वडील घरी नव्हते, तर बहीण घरी होती. दरम्यान, दुपारी सुमारे दीड वाजता आईने नेहाला फोन केला. मात्र, ती झोपेतून उठत नसल्याचे लक्षात आले. तिला उठविण्याचा वारंवार प्रयत्न करूनही प्रतिसाद मिळाला नाही. शरीरात हालचाल जाणवत नसल्याने कुटुंबीय चिंतेत पडले. त्यानंतर तिला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर मृत घोषित केले. अवघ्या २८ वर्षाच्या नेहाच्या अचानक मृत्यूने कुटुंबीयांना मोठा धक्का बसला असून, गगलानी नगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रात्रपाळी करून घरी परतल्यानंतर काही तासांतच ही घटना घडल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. फ्रेजरपुरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. आवश्यक वैद्यकीय तपासण्या आणि तपासातील निष्कर्षानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## मोटरचा शॉक लागल्याने तरुणाचा

पसरली आहे. पोलीस पाटील प्रदीप गजबे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव राजदी येथील रहिवासी कार्तिक वसंत पोसरे मंगळवारी सकाळी घरातील पाण्याची मोटर चालू करण्यासाठी गेले होते. त्यांनी मोटरचा स्विच ऑन करताच त्यांना विजेचा तीव्र झटका बसला. या गंभीर अपघातात त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. दसऱ्याच्या आनंद आणि उत्साहाच्या वातावरणात घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोक व्यक्त होत आहे. चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन येथे आकस्मिक मृत्यूचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अपहरण झालेल्या बालकाची

भवन येथे गरबा पाहण्यासाठी गेल्या होत्या. त्यांनी मुलाला मंडपात खुर्चीवर बसवले आणि गरबा पाहण्यासाठी गेल्या. काही वेळाने परतल्यानंतर मुलगा जागेवर दिसला नाही. परिसरात शोध घेऊनही तो न सापडल्याने त्याला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार त्यांनी १९ ऑक्टोबर रोजी राजापेठ पोलिसांत दिली. त्यावरून भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलिसांची चार आणि गुन्हे शाखेची सहा अशी दहा पथके तयार करण्यात आली. सुरुवातीला सीसीटीव्ही फुटेजमध्ये केशरी मफलर घातलेल्या व्यक्तीसोबत दुचाकीवर दिसणारे बालक अपहृत बालक नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर फुटेजचे बारकाईने विश्लेषण केले असता, लाल साडी परिधान केलेली महिला बालकाला कडेवर घेऊन घाईघाईने जाताना दिसून आली.

पोलिसांनी विविध मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. बसस्थानके, रेल्वेस्थानके आणि परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली. महिलेचे छायाचित्र स्थानिक नागरिकांना दाखवून माहिती घेण्यात आली. त्यातून ती हमालपुऱ्यातील रहिवासी असल्याचे समोर आले. ती गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथे माहेरी गेल्याची माहिती मिळाल्यानंतर तांत्रिक माहितीच्या आधारे तिला अमरावती रेल्वेस्थानकातून ताब्यात घेण्यात आले.

**आमगावातून बालकाची सुखरूप सुटका-** महिलेची चौकशी केली असता अपहृत बालक आमगाव येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर आमगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी निळकंठ कुकडे यांच्याशी संपर्क साधून माहिती, छायाचित्र आणि ठिकाणाचा तपशील देण्यात आला. आमगाव पोलिसांच्या मदतीने बालकाची सुखरूप सुटका करण्यात आली. महिलेने चौकशीदरम्यान वेगवेगळी कारणे सांगितल्याने अपहरणामागील नेमका हेतू अद्याप स्पष्ट झालेला नाही. या प्रकरणात कलम १४३ (४) अन्वये वाढीव कलम लावून महिलेला अटक करण्यात आली असून, तिला न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३२४ ■ गुरुवार, २२ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# भिंतीवर देवी प्रगटली नव्हे, अफवेचा खेळ अंनिसने केला चमत्काराचा भंडाफोड

## कुटुंबाची पोलिसांना लेखी कबुली, दोषींवर कारवाईची मागणी

### अंनिसचा चमत्काराच्या दाव्याला छेद

**देवळी जनमाध्यम :** घराच्या भिंतीवर देवी प्रगटल्याचा दावा, समाजमाध्यमांवर अफवेचा धुरळा आणि दर्शनासाठी नागरिकांची झुंबड. मात्र, या कथित चमत्कारामागचे सत्य समोर येताच या चर्चेला वेगळेच वळण मिळाले. भिंतीवर आधीपासूनच स्त्रीचे चित्र होते. नागरिकांनी त्याला देवीचे रूप देत चमत्काराची अफवा पसरवली. आम्ही असा कोणताही दावा केला नव्हता, असे संबंधित कुटुंबाने देवळी पोलिसांना लेखी स्वरूपात स्पष्ट केल्याची माहिती अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीने दिली.

१९ ऑक्टोबर रोजी देवळी शहरातील प्रभाग क्रमांक ८ परिसरात एका घराच्या भिंतीवर देवीचे चित्र उमटल्याची चर्चा पसरली. काही वेळातच समाजमाध्यमांवरून ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली. दर्शनासाठी नागरिकांची गर्दी जमली. पूजा-अर्चा सुरू झाल्याने परिसरात मोठी हालचाल निर्माण झाली. परिस्थिती लक्षात घेऊन देवळी पोलिसांनी घटनास्थळी कर्मचारी पाठवले आणि संबंधित कुटुंबाला





जादूटोणाविरोधी कायद्याबाबत माहिती देत आवश्यक सूचना केल्या.

घटनेची माहिती मिळताच अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वर्धा जिल्हा व देवळी तालुका शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. राज्य कार्यकारिणी सदस्य संजय इंगळे तिगावकर आणि जिल्हाध्यक्ष हरीश इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी पोलिसांशी संवाद साधला. कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांच्या मुलाखती घेऊन वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

**कुटुंबाच्या लेखी खुलाशाने अफवेला पूर्णविराम**

भिंतीवरील चित्र हे आधीपासून अस्तित्वात असलेले स्त्रीचे चित्र होते. काही लोकांनी त्याला देवीचे चित्र म्हणत अफवा पसरवली. आम्ही देवी प्रगटल्याचा किंवा चमत्कार घडल्याचा दावा कधीच केला नाही. भिंतीवरील चित्रही काढून टाकले आहे, असा खुलासा संबंधित कुटुंबाने पोलिसांना दिल्याचे समितीने सांगितले. त्यामुळे कथित चमत्काराच्या चर्चेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**चमत्कार सिद्ध करा, ८० लाखांचे आव्हान**

घटनास्थळ परिसरात आयोजित प्रबोधन सभेत अंनिसचे महाराष्ट्र राज्य युवा संघटक पंकज वंजारे यांनी नागरिकांना विवेकनिष्ठ विचार करण्याचे आवाहन केले. जादूटोणाविरोधी कायद्याच्या तरतुदींचा संदर्भ देत चमत्कारांच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करणे, फसवणूक करणे किंवा दहशत निर्माण करणे हा कायद्याच्या कक्षेत येणारा प्रकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कथित चमत्कार सिद्ध करून दाखवा आणि अंनिसचे ८० लाख रुपयांचे बक्षीस मिळवा, असे खुले आव्हानही त्यांनी दिले. दरम्यान, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनीही या प्रकरणात संबंधितांवर जादूटोणाविरोधी कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी केली. अफवा पसरवून नागरिकांची दिशाभूल करणाऱ्यांची चौकशी व्हावी, अशी त्यांची भूमिका आहे.

प्रबोधन सभेला डॉ. सुचिता ठाकरे, अजय इंगोले, दादाराव मुन, आशिष मोडक, नरेश ठोकणे, गणेश शेंडे यांच्यासह कार्यकर्ते, पोलीस कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

# शहीद जवानांच्या त्यागाला सलाम; वीरांच्या कुटुंबीयांचा सन्मान

## १५४ शहीद पोलीस अधिकारी आणि जवानांना वर्धा पोलीस मुख्यालयात मानवंदना

**वर्धा जनमाध्यम :** देशाची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था आणि नागरिकांच्या रक्षणासाठी कर्तव्य बजावताना प्राणांची आहुती देणाऱ्या शूर पोलीस अधिकारी आणि जवानांच्या स्मृतींना बुधवारी वर्धा पोलीस मुख्यालयात अभिवादन करण्यात आले. पोलीस स्मृती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सन २०२५ मध्ये देशभरात कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या १५४ पोलीस अधिकारी आणि जवानांना मानवंदना देण्यात आली. यावेळी शहीद जवानांच्या कुटुंबीयांचा सन्मान करून त्यांच्या त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



पोलीस मुख्यालयात २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजता बँड पथकाच्या धूनने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी पोलीस स्मृती दिनाची पार्श्वभूमी आणि त्याचे महत्त्व विशद केले. देशाच्या रक्षणासाठी कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या पोलीस अधिकारी आणि जवानांच्या शौर्याचे स्मरण यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून पुलगाव येथील सीएडी कॅम्पचे ब्रिगेडियर प्रशांत कुमार उपस्थित होते. ब्रिगेडियर प्रशांत कुमार आणि पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या हस्ते शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. यानंतर शस्त्र सलामी, तीन फैरींची सलामी, दहा सेकंदांचे मौन आणि बिगुल वादनाद्वारे शहीद जवानांना अंतिम मानवंदना देण्यात आली.

कर्तव्य बजावताना प्राण गमावलेल्या पोलीस अधिकारी आणि जवानांच्या नावांचे वाचन करण्यात आले. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करताना देशाच्या सुरक्षेसाठी पोलीस दलाने दिलेल्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमात शहीद पोलीस अंमलदार दिलीप इवनाथे यांच्या पत्नी अनिता दिलीप इवनाथे आणि वर्धा जिल्ह्यातील शहीद पोलीस अंमलदार गौरव खरवडे यांच्या आई नंदाबाई नथूजी खरवडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. गडचिरोली येथे कर्तव्य बजावताना शहीद झालेल्या दिलीप इवनाथे आणि गौरव खरवडे यांच्या कुटुंबीयांना पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त प्रमाणपत्र, शाल आणि रोपटे देऊन गौरविण्यात आले. ाहीद जवानांचे बलिदान त्यांच्या कुटुंबीयांच्या आयुष्यात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण करते. मात्र, देशाच्या सेवेसाठी त्यांनी केलेला त्याग समाजासाठी सदैव प्रेरणादायी राहतो. या भावनेतून शहीदांच्या कुटुंबीयांचा सन्मान करून त्यांच्या योगदानाप्रती आदर व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्यासह जिल्ह्यातील विविध उपविभागांचे आणि शाखांचे वरिष्ठ पोलीस अधिकारी, गृहरक्षक दलाचे जवान तसेच राज्य राखीव पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दसऱ्याच्या रात्री व्यापाऱ्याच्या स्वप्नांची राख, जनरल स्टोअर्सला भीषण आग

## दहा लाखांचा माल जळून खाक; शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा संशय

**विरुळ आकाजी जनमाध्यम :** दिवसभर ग्राहकांची सेवा करून दसऱ्याच्या सायंकाळी दुकान बंद केले आणि घरी परतले. मात्र, तासाभरातच आगीने आयुष्यभराच्या कष्टांवर पाणी फेरले विरुळ आकाजी येथील बाजार चौकातील माँ भवानी जनरल स्टोअर्स व किराणा दुकानाला लागलेल्या आगीत लाखो रुपयांचा माल जळून खाक झाला. या घटनेत सुमारे दहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून, ऐन सणासुदीच्या काळात व्यापाऱ्यावर आर्थिक संकट कोसळले आहे.

विरुळ आकाजी येथील बाजार चौकात सुरेंद्र बबनराव उमक यांचे मोठे जनरल स्टोअर्स व किराणा दुकान आहे. दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी सातच्या सुमारास त्यांनी नेहमीप्रमाणे दुकान बंद करून घर गाठले. मात्र, त्यानंतर अवघ्या तासाभरात दुकानाला आग लागली. आगीने रौद्र रूप धारण केल्याने दुकानातील किराणा साहित्य आणि अन्य माल जळून मोठे नुकसान झाले.



प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा संशय दुकानमालक सुरेंद्र उमक यांनी व्यक्त केला आहे. आगीत झालेल्या नुकसानीमुळे त्यांच्या व्यवसायापुढे मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. यासंदर्भात वीज वितरण कंपनीचे अधिकारी आणि स्थानिक तलाठी यांना निवेदन देऊन नुकसानभरपाईची मागणी करण्यात आली आहे.

सणासुदीच्या काळात झालेल्या या दुर्घटनेमुळे उमक यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आगीच्या कारणाची तांत्रिक तपासणी करून नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. संबंधित यंत्रणांनी प्रकरण गांभीर्याने घेऊन नियमानुसार नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

व्यवसाय उभा करण्यासाठी घेतलेले कष्ट एका आगीत उद्ध्वस्त झाल्यानंतर व्यापाऱ्याला मदतीसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या प्रकरणात लक्ष घालून उमक यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

# थेंब थेंब पाण्यासाठी नागरिकांची वणवण, आष्टीत मात्र महिनाभर पाणी रस्त्यावर

### पाणी वाचविण्याचे आवाहन कागदावर, गळती रोखण्याची जबाबदारी कोणाची

**आष्टी शहीद जनमाध्यम :** एका बाजूला पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची वणवण, तर दुसऱ्या बाजूला महिनाभरापासून लाखो लिटर पाणी थेट रस्त्यावर आष्टी शहरातील न्यायालय परिसरात सुरू असलेल्या पाणीगळतीचा हा प्रकार प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. पाण्याची टाकी जवळ असताना पाणी रस्त्यावर वाहत आहे. मात्र, ही गळती थांबविण्यासाठी ठोस पावले उचलली जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याचे आवाहन करणाऱ्या यंत्रणेला या उघड नासाडीचे गांभीर्य कधी कळणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



**पाणी बचतीचे आवाहन कागदावरच**

राज्यात अनेक भागांत पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना शासन आणि प्रशासनाकडून नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जाते. मात्र, दुसरीकडे सार्वजनिक पाणीपुरवठ्याच्या परिसरातच पाण्याची नासाडी होत असेल, तर या आवाहनांचा उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या प्रकाराची नगरपंचायतीला माहिती देण्यात आल्याचे सांगण्यात येते. तरीही गळती थांबविण्यासाठी प्रभावी कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप आहे. संबंधित यंत्रणांकडून जबाबदारी झटकली जात असल्याने नागरिकांनी दाद मागायची कुणाकडे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे**

न्यायालय परिसरातील पाणीगळती तातडीने थांबवून पाण्याचा अपव्यय रोखावा. तसेच, महिनाभरापासून सुरू असलेल्या या प्रकाराकडे दुर्लक्ष का झाले, याची चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने जागे होऊन आवश्यक दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वर्षानुवर्षे वृत्तपत्र विक्रेत्यांचा संघर्ष; फडणवीसांचे आश्वासन, आता निर्णयाची प्रतीक्षा

**वर्धा जनमाध्यम :** पहाटेपासून घराघरांत वर्तमानपत्र पोहोचवून समाजाला जगभरातील घडामोडींची माहिती देणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नाला आता तरी न्याय मिळणार का, वर्षानुवर्षे शासनदरबारी प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी वृत्तपत्र विक्रेता संघटना सातत्याने पाठपुरावा करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वर्धा येथे प्रचारसभेसाठी आले असता, भाजपचे जिल्हा मंत्री जयंतराव कावळे यांनी वृत्तपत्र विक्रेता प्रतिनिधींची त्यांच्याशी भेट घडवून आणली.



यावेळी विक्रेत्यांनी शासनाला यापूर्वी सादर केलेला अभ्यास अहवाल तसेच तत्कालीन शिंदे सरकारच्या काळातील मंत्रिमंडळ ठरावाची प्रत मुख्यमंत्र्यांना दिली. मागण्यांवर चर्चा करताना मुख्यमंत्र्यांनी, मला माहिती आहे. लवकरच सकारात्मक निर्णय घेऊ, असे आश्वासन दिल्याची माहिती संघटनेने दिली. वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मागण्यांसंदर्भात मागील सप्ताहात राज्यातील विविध जिल्हे आणि तालुक्यांतून जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना निवेदने पाठविण्यात आली होती. या मागण्यांचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने आता आश्वासनाचे रूपांतर प्रत्यक्ष निर्णयात व्हावे, अशी अपेक्षा विक्रेत्यांकडून व्यक्त होत आहे.

यावेळी वर्धा संघटनेचे संजय देवगिरकर, नरेश शेवडे, हर्षवर्धन नाखले, मोहन गिरडकर, सुधीर मुंजेवार, गजानन मसने, अनिल मुळे, प्रशांत जांभूळकर आणि संजय बारस्कर उपस्थित होते.

# सुशिक्षित बेरोजगारांना रोजगारासाठी पदपथावर जागा द्या

## नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांना निवेदन

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील पदपथ आणि पायवाटांवर अतिक्रमणांचा विळखा घट्ट होत असताना सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न मात्र दुर्लक्षित आहे. एकीकडे बेरोजगारीचे संकट, तर दुसरीकडे छोटासा व्यवसाय सुरू करण्यासाठी जागेची वानवा. अशा परिस्थितीत बेरोजगारांच्या पाठीशी उभे राहून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्या संचालकांनी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्याकडे निवेदनातून केली.



भाजीपाला, दूध, अगरबत्ती, अंडी, पान, फळे, हार आणि अल्पोपाहार यांसारखे छोटे व्यवसाय सुरू करण्यासाठी पदपथ किंवा पायवाटेच्या ठिकाणी नियमानुसार छोटी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. शासन निर्णय अस्तित्वात असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची खंत संस्थाचालकांनी व्यक्त केली.

मोठ्या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष आणि बेरोजगारांना संधीची प्रतीक्षा, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. तरुणांच्या हाताला काम आणि कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा, यासाठी नगरपरिषदेने सकारात्मक भूमिका घ्यावी. बेरोजगारांचे प्रश्न सभागृहात मांडून त्यांना न्याय द्यावा, अशी भावनिक साद निवेदनातून घालण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक वरुण पाठक उपस्थित होते. निवेदन देताना अजय हिवंज, विशाल हजारे, चेतन चोरे, पंकज अनकर, अजय कांबळे, भानुदास मून, तेजराम निखाडे, विद्या खोडके, नितीन चिमोटे, चंद्रशेखर बेले आणि गुणवंत चोपडे यांच्यासह संस्थाचालक उपस्थित होते.

# वाघाच्या हल्ल्यात चार वासरे ठार

## तीन वासरे जागीच ठार, चौथ्याला जंगलात ओढून नेले

**आष्टी शहीद जनमाध्यम :** कारंजा (घाडगे) तालुक्यातील अजनदेवी शिवारात वाघाने हल्ला करून चार वासरे ठार केल्याची घटना १८ ऑक्टोबरच्या पहाटे घडल्याचा अंदाज आहे. यात तीन वासरे जागीच मृतावस्थेत आढळली, तर एका वासराला वाघाने जंगलाच्या दिशेने ओढून नेले. या घटनेमुळे पशुपालक गौरव धनराज किनकर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

किनकर यांच्या मालकीच्या गाई-म्हशींसाठी शेतात गोठा तयार करण्यात आला होता. नेहमीप्रमाणे १७ ऑक्टोबर रोजी त्यांनी जनावरे गोठ्यात बांधली आणि घरी परतले. रात्रीच्या सुमारास गोठ्यात शिरलेल्या वाघाने चार वासरांवर हल्ला केला. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या घटनेमुळे परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने नुकसानग्रस्त पशुपालकाला नियमानुसार आर्थिक भरपाई द्यावी, तसेच परिसरात गस्त वाढवून पशुधनाच्या संरक्षणासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वाघाच्या हल्ल्यात दोन वर्षांचे वासरू ठार

## खडकी परिसरात दहशत; नुकसानभरपाईची मागणी

**सेलू / जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील खडकी येथे मंगळवारी दसऱ्याच्या रात्री वाघाने गोठ्यावर हल्ला करून दोन वर्षांचे वासरू ठार केले. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

खडकी येथील शेतकरी उमेश तुकाराम राऊत यांच्या शेतातील गोठ्यात वासरू बांधलेले होते. मंगळवारी रात्रीच्या सुमारास वाघाने गोठ्यात शिरून वासरावर हल्ला केला. यात वासराचा जागीच मृत्यू झाला. बुधवारी सकाळी शेतात गेल्यानंतर राऊत यांच्या निदर्शनास ही घटना आली.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे वनरक्षक अर्चना व्यंकटी मडावी आणि वनमजूर अंकुश बावणे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. परिसरात मागील काही दिवसांपासून वाघाचा वावर वाढल्याने शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वनविभागाने गस्त वाढवून वाघाचा बंदोबस्त करावा तसेच नुकसानग्रस्त शेतकरी उमेश राऊत यांना नियमानुसार तातडीने आर्थिक नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# हिंगणघाट बसस्थानकात एसटी कर्मचाऱ्यांवर हल्ला

## नातेवाईकांना बोलावून हिंगणघाट बसस्थानकात हल्ला; वाहकाच्या नाकाला दुखापत, तिघांना अटक

**हिंगणघाट जनमाध्यम :** एसटी बसमधील महिला प्रवाशासोबत झालेल्या वादाचे पर्यवसान चालक आणि वाहकाला मारहाण करण्यात झाल्याची घटना बुधवारी २१ ऑक्टोबर रोजी हिंगणघाट बसस्थानकात घडली. वर्धा बसस्थानकात सुरू झालेल्या वादानंतर संबंधित महिलेने हिंगणघाट येथे नातेवाईकांना बोलावल्याची माहिती आहे. त्यानंतर चालक आणि वाहकाला मारहाण करण्यात आली. या घटनेत वाहकाच्या नाकाला दुखापत झाली असून चालकही किरकोळ जखमी झाला आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

**वर्धा बसस्थानकात वादाची ठिणगी**

महामंडळाच्या माहितीनुसार, वर्धा विभागातील आर्वी आगाराची बस क्रमांक एमएच १४ एलएक्स ८५४० ही नियत क्रमांक ९३/९४ नुसार आर्वी ते चंद्रपूर मार्गावर धावत होती. बुधवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास ६५ वर्षीय महिला वर्धा बसस्थानकातून या बसमध्ये चढत असताना चालकाने दरवाजा बंद केला. यावेळी दरवाजा लागल्याने महिला आणि चालक यांच्यात वाद झाल्याची माहिती आहे.



महिलेने चालकाला शिवीगाळ केल्यानंतर बसस्थानकावरील अधिकारी आणि सुरक्षा रक्षकांनी मध्यस्थी करून तिची समजूत काढली. त्यानंतर महिलेला त्याच बसमधून पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आले.

**हिंगणघाटमध्ये नातेवाईकांना बोलावले**

बस सकाळी सुमारे १०.३० वाजता हिंगणघाट बसस्थानकात पोहोचल्यानंतर या वादाला वेगळे वळण मिळाले. संबंधित महिलेने हिंगणघाट येथील नातेवाईकांना बोलावल्याची माहिती आहे. त्यानंतर चेतन लाडोकर आणि त्याच्या दोन साथीदारांनी चालक व वाहकाला मारहाण केल्याचे महामंडळाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

या मारहाणीत वाहक शुभम ज्ञानेश्वर डहाके यांच्या नाकाला दुखापत झाली, तर चालक गणेश मनोहर खेळकर हे किरकोळ जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांना कळविण्यात आले. पोलिसांनी या प्रकरणातील तिघांना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

**एसटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न**

प्रवाशांच्या तक्रारींची दखल घेणे आणि त्यांची योग्य चौकशी करणे आवश्यक आहे. मात्र, वादाचे निराकरण करण्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याऐवजी कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना मारहाण करण्याच्या प्रकारामुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे

. सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या चालक आणि वाहकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजनांची गरज या घटनेमुळे अधोरेखित झाली आहे.

# नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहणाचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण






**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**-नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य पर्वाचा शुभारंभ ठरणाऱ्या ३१ ऑक्टोबरच्या ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील अन्य मंत्री आणि अधिकारी - पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

राष्ट्रपती भवन येथे झालेल्या या भेटीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना येत्या ३१ ऑक्टोबर रोजी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे आयोजित ध्वजारोहण सोहळ्याचे औपचारिक निमंत्रण दिले. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेपासून आदिवासी उद्योजकता, वस्त्रकला, कृषिसमृद्धी आणि खाद्यसंस्कृतीपर्यंतच्या वैविध्यपूर्ण वारशाची ओळख करून देणारा विशेष भेटवस्तू संचही त्यांना प्रदान केला. राष्ट्रपती यांना ध्वजारोहणाच्याच दिवशी होणाऱ्या गोदा आरती, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या संकेतस्थळाचे उद्घाटन, कुंभमेळा गीताचे लोकार्पण, कुंभमेळ्यावर आधारित कॉफीटेबल बुक आणि कुंभमेळा टपाल तिकिटाच्या अनावरणासाठीदेखील आमंत्रित करण्यात आले.यावेळी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन व कुंभमेळा मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके-आहेर, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, त्र्यंबकेश्वर देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय सहआयुक्त न्यायमूर्ती विवेक सोनवणे, नाशिक पुरोहित संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, त्र्यंबकेश्वर पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज थेटे, रामतीर्थ गोदावरी सेवा समितीचे नरसिंहकृपा दास, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह आदी यावेळी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला वैविध्यपूर्ण वारसा संच भेट

**कुंभमेळा-महाराष्ट्र संस्कृती दर्शवणारे अनोखे निमंत्रण**

राष्ट्रपतींना सादर करण्यात आलेले निमंत्रण वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक संकल्पनेवर आधारित आहे. निमंत्रण पेटी उघडताच कुंभमेळ्याची पौराणिक पार्श्वभूमी, आध्यात्मिक महात्म्य आणि भव्यता दर्शविणारी त्रिमितीय (पॉप-अप) कलाकृती उलगडते. दृष्टी, श्रवण, गंध, चव आणि स्पर्श या पंचेंद्रियांशी संबंधित अनुभवांचा समावेश असलेल्या या संकल्पनेतून नाशिकचा सांस्कृतिक वारसा, पवित्र गोदावरीचा महिमा आणि भारतीय परंपरेतील कुंभमेळ्याचे अनन्यसाधारण महत्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले आहे.आदिवासी विकास विभागांतर्गत शबरी नॅचरल्सच्या उत्पादनांचा या भेटवस्तू संचात समावेश आहे. अगरबत्ती, भरडधान्यांपासून तयार केलेले खाद्यपदार्थ, मोहफुलांपासून बनविलेली उत्पादने, बांबूपासून तयार केलेल्या वस्तू आणि वनमध अशा विविध उत्पादनांतून आदिवासी समाजाचे पारंपरिक ज्ञान, नैसर्गिक संसाधनांचा सुयोग्य वापर आणि स्थानिक उद्योजकतेचे सामर्थ्य समोर येते. आदिवासी कारागिरांचे कौशल्य, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याचे प्रयत्न आणि समुदायांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा संदेशही या माध्यमातून देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या वस्त्रपरंपरेचा मानबिंदू असलेल्या येवला येथील पैठणीचा या संचात समावेश करण्यात आला आहे. नाशिकच्या कृषिसमृद्धीचे प्रतिनिधित्व काळ्या मनुका आणि काजू या उत्पादनांद्वारे करण्यात आले आहे. नाशिकच्या खाद्यपरंपरेचे प्रतीक असलेल्या चिवड्याचाही या संचात समावेश आहे. यासह निवडक मिठाई आणि सुकामेव्याच्या पदार्थांचाही या भेटवस्तू संचात समावेश आहे.

# एकीकडे ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याची मागणी; दुसरीकडे निवडणूक आयोगाचे पथक मणिपूरमध्ये

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे एक विशेष पथक सध्या मणिपूरच्या दौऱ्यावर आहे. निवडणूक आयोगाची योजना आगामी वर्ष २०२७च्या सुरुवातीला मणिपूरसह उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब आणि गोवा या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका घेण्याची आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुकीच्या पूर्वतयारीची पाहणी करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचालींना वेग आला असून आयोगाचे अधिकारी विविध राज्यांचे दौरे करत आहेत.



**कोणत्या राज्यात कधी दौरा?**

वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली हे पथक सध्या निवडणुकीची तयारी असलेल्या राज्यांची प्रत्यक्ष पाहणी करत आहे. याआधी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी उत्तराखंडचा दौरा पूर्ण केला आहे, तर पंजाबमधील निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी आगामी २८ ऑक्टोबर रोजीचा दौरा निश्चित करण्यात आला आहे. याशिवाय गोव्याचा दौराही प्रस्तावित होता, परंतु काही प्रशासकीय कारणांमुळे तारखांमध्ये बदल केला जात आहे. निवडणूक कार्यक्रमाची अधिकृत घोषणा होण्यापूर्वी संपूर्ण निवडणूक आयोग स्वतः या सर्व राज्यांचा दौरा करणार आहे.

**पाच राज्यात २०२७मध्ये निवडणुकांची रणधुमाळी**

या आगामी निवडणुकांमध्ये मणिपूर विधानसभेचा ६० सदस्यांचा कार्यकाळ, गोवा विधानसभेचा ४० सदस्यांचा कार्यकाळ, पंजाब विधानसभेचा ११७ सदस्यांचा कार्यकाळ आणि उत्तराखंड विधानसभेचा ७० सदस्यांचा कार्यकाळ मार्च २०२७ मध्ये वेगवेगळ्या तारखांना संपणार आहे. तसेच उत्तर प्रदेश विधानसभेचा ४०३ सदस्यांचा कार्यकाळ २२ मे २०२७ रोजी संपुष्टात येणार आहे. या सर्व राज्यांमध्ये वेळेवर आणि सुरळीत निवडणुका पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने आतापासूनच जय्यत तयारी सुरू केली आहे.

**SSRचे काम वेगाने सुरू-** लोकप्रतिनिधी कायदा, १९५० मधील तरतुदींनुसार निवडणूक आयोगाला विधानसभांचा कार्यकाळ संपण्यापूर्वी सहा महिने आधी निवडणुका घेण्याचे अधिकार आहेत. या सर्व ५ राज्यांमध्ये सध्या मतदार याद्यांच्या विशेष सविस्तर पुनरीक्षणाचे (SSR) काम वेगाने सुरू आहे. या पुन क्षणांतर्गत अंतिम मतदार याद्या आगामी ४ जानेवारी रोजी प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मतदार याद्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर आणि आयोगाच्या उच्चस्तरीय दौऱ्यांचा आढावा घेतल्यानंतर लवकरच निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

# पोलीस स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पोलीस हुतात्म्यांना अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी-**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षभरात संपूर्ण देशात शहीद झालेल्या पोलीस हुतात्म्यांना नायगाव पोलीस मुख्यालय येथील पोलीस स्मृतीस्तंभावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. असीम ध्येयनिष्ठेने कर्तव्य बजावताना वीरगती प्राप्त झालेल्या ३६ पोलीस अधिकारी आणि ११८ पोलीस अंमलदार अशा एकूण १५४ पोलीस हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतींना मी विनम्रपणे अभिवादन करतो, अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त करून पोलीस हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण केले.विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, महापौर रितू तावडे, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन



भारती यांनी यावेळी पुष्पचक्र वाहून पोलीस हुतात्म्यांना अभिवादन केले. पोलीस दलाच्या वतीने बंदुकीच्या फैरी झाडून हुतात्म्यांना मानवंदना देण्यात आली.

विविध देशांच्या दूतावासातील निमंत्रित, वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्यासह शहीद पोलिसांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वांची भेट घेतली. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) मधुकर पाण्डेय आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) अभिषेक त्रिमुखे यांनी पोलीस स्मृतीदिन संचलन कार्यक्रमाचे संयोजन केले.ज्यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठेपोटी स्वतःचे प्राण अर्पण केले त्या शूर शहीद पोलिसांना आदरांजली वाहण्यासाठी दरवर्षी दि २१ ऑक्टोबर रोजी स्मृती संचलन केले जाते. दि. १ सप्टेंबर २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राज्य तसेच अर्ध सैनिक दलातील शहीद झालेल्या पोलिसांचा सन्मान करण्यासाठी या पोलीस स्मृतीदिन संचलनाचे आयोजन करण्यात आले.

# संभाव्य पाणीटंचाईचे गावनिहाय कृती आराखडे २५ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत- मंत्री गुलाबराव पाटील

**मुंबई/प्रतिनिधी–** नागपूर, अमरावती आणि कोकण विभागांतील संभाव्य पाणीटंचाईच्या सर्व टप्प्यांचे वस्तुनिष्ठ व गावनिहाय कृती आराखडे



येत्या २५ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत. जलजीवन मिशनअंतर्गत ७५ ते ९९ टक्के प्रगती झालेल्या पाणीपुरवठा योजना प्राधान्याने पूर्ण करून कार्यान्वित कराव्यात, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठकीत नागपूर, अमरावती आणि कोकण विभागांतील पाणीपुरवठा योजना, भूजल पातळी आणि संभाव्य पाणीटंचाईच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. सध्या या विभागांत गंभीर पाणीटंचाई नसली, तरी आगामी महिन्यांतील संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच सज्ज राहावे. अधिकारी, लोकप्रतिनिधी, सरपंच आणि ग्रामपंचायतींशी चर्चा करून तसेच प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे कृती आराखडे तयार करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.जलजीवन मिशनअंतर्गत अंतिम टप्प्यात असलेल्या योजनांची पाइपलाईन, पंप, वीजजोडणी, रोहित्र आदींची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत. ७५ टक्क्यांपेक्षा अधिक प्रगती झालेल्या योजनांची पॅकेजविषयक माहिती पूर्ण करून प्रमाणित करावी, जेणेकरून निधी वितरणात अडथळे येणार नाहीत, असेही ते म्हणाले. संभाव्य टँकरग्रस्त गावांसाठी जलस्त्रोत बळकटीकरणाचा स्वतंत्र आराखडा तयार करावा. जिल्हा नियोजन समितीच्या दोन टक्के निधीच्या तरतुदीतून स्त्रोत बळकटीकरणाची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत. विहीर पुनर्भरण, शेततळी, सिमेंट बंधारे, सिमेंट प्लग, सलग समतल चर आणि जुन्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे करावीत. आवश्यक कामांसाठी जिल्हा नियोजन, खनिज आणि सामाजिक उत्तरदायित्व निधीतूनही नियोजन करावे, असे मंत्री पाटील यांनी सांगितले.पाणीटंचाई निवारणासाठी टँकरचा वापर हा अंतिम पर्याय असावा. त्यापूर्वी उपलब्ध विहिरींची स्वच्छता व निर्जंतुकीकरण, स्थानिक जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन, पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन आणि पाण्याचा काटकसरीने वापर या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. पाणीटंचाईबाबत तक्रार प्राप्त झाल्यास किंवा त्यासंदर्भात बातमी प्रसिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने गावाला भेट देऊन आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प्रज्ञा स्पर्श बहुउद्देशीय संस्थेचा स्तुत्य उपक्रम

# दीक्षाभूमीकडे जाणाऱ्या अनुयायांसाठी नांदगाव पेठ टोल नाक्यावर भोजनदान

**अमरावती /प्रतिनिधी-** समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमीकडे जाणाऱ्या बौद्ध अनुयायांची सेवा करण्यासाठी प्रज्ञा स्पर्श बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या भोजनदान उपक्रमाला यंदा १४ वर्षे पूर्ण झाली आहेत. गेल्या चौदा वर्षांपासून सुरू असलेली ही अन्नदानाची परंपरा यंदाही उत्साहात पार पडली. नांदगाव पेठ टोल नाका येथे आयोजित या उपक्रमाच्या माध्यमातून दीक्षाभूमीकडे जाणाऱ्या अनुयायांना भोजनदान करून सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला.या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे दरवर्षी या कार्यक्रमाला उपस्थित राहून स्वतः श्रमदान करतात आणि बौद्ध अनुयायांना भोजन वाढून त्यांच्या सेवेत सहभागी होतात. लोकप्रतिनिधी म्हणून केवळ उपस्थिती नोंदविण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष भोजन



वाढण्याच्या कार्यात सहभागी होणे, ही या उपक्रमाची महत्त्वाची बाब आहे. तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि अनेक महिला-पुरुष स्वयंसेवकांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम सातत्याने पुढे जात आहे.धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या काळात अमरावती जिल्ह्यासह विदर्भातील विविध भागांतून बौद्ध अनुयायी नागपूरकडे रवाना होतात. अनेक अनुयायी कुटुंबीयांसह प्रवास करतात. या प्रवासादरम्यान त्यांना भोजनाची सुविधा उपलब्ध व्हावी, त्यांच्या प्रवासात थोडा विसावा मिळावा आणि सेवाभावातून त्यांचे स्वागत व्हावे, या उद्देशाने नांदगाव पेठ टोल नाका येथे भोजनदानाचे आयोजन केले जाते.

**गावातील प्रतिष्ठित नागरिकांचे मोलाचे सहकार्य** या चौदा वर्षांच्या सेवाभावी उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी नांदगाव पेठ परिसरातील प्रतिष्ठित नागरिकांचेही महत्त्वपूर्ण सहकार्य लाभते.यामध्ये राजेश बोडखे, मोरेश्वर इंगळे, विनोद डांगे, राजेंद्र तुले, सागर खंडेलवाल, विजय भूतडा आणि विवेक गुल्हाने यांचे सहकार्य लाभत आहे. सामाजिक उपक्रम यशस्वी होण्यासाठी केवळ आयोजन पुरेसे नसते, तर त्यासाठी स्थानिक नागरिकांचे सहकार्य, नियोजन आणि सामूहिक सहभाग आवश्यक असतो. गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी या उपक्रमाला सहकार्य केल्यामुळे भोजनदानाची परंपरा पुढे नेण्यास मदत होत आहे.या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी मंगेश तायडे, कैलास मोरे, सुमेद कांबळे, धीरज गवई, मनीष गुळधे, अर्जुन युवनाते, दिनेश खडसे, सचिन कांबळे, मनोज गडलिंग, शंकर बसले, दिनेश कांबळे, दिनेश इंगोले, विजय खंडारे, अण्णाजी कांबळे, आदर्श डोंगरे, अनिरुद्ध कांबळे, निलेश कांबळे आणि अतुल गडलिंग यांचे योगदान लाभत आहे. त्याचप्रमाणे महिला कार्यकर्त्यांचाही या सेवाभावी उपक्रमात महत्त्वपूर्ण सहभाग आहे. राजनंदिनी कांबळे, सुशीला कांबळे, शालू कांबळे, कोमल गडलिंग, सुजाता कांबळे, लता गडलिंग, येनू गडलिंग, निकिता गडलिंग, सपना गडलिंग, प्रणाली इंगोले, विशाखा कांबळे आणि रविना गडलिंग यांचेही सहकार्य या कार्यक्रमाला लाभत आहे.

# सौरव, आशुतोषला ७ दिवसांनंतर जामीन

## दिल्ली पोलिसांनी ३ दिवस कोठडी मागितली होती; जंतर-मंतरवर आंदोलनादरम्यान ताब्यात घेतले होते

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** 'कॉकरोच जनता पार्टी'चे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना दिल्लीतील एका विशेष न्यायालयाने सात दिवसांच्या कोठडीनंतर जामीन मंजूर केला आहे.१३ ऑक्टोबर रोजी जंतरमंतर येथे सुरू असलेल्या निदर्शनादरम्यान दिल्ली पोलिसांनी या दोघांना ताब्यात घेतले होते. ते तिथे तिरंगा घेऊन पोहोचले होते आणि त्यांच्यासोबत ण्व्ङ चे ८-१० समर्थकही होते.१२ ऑक्टोबर रोजी सरकारने जंतरमंतरवर निदर्शने करण्यास बंदी घातली होती; तरीही, १३ ऑक्टोबर रोजी हे दोन्ही नेते तिरंगा घेऊन तिथे पोहोचले. त्यानंतर, सार्वजनिक सुव्यवस्थेचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली त्यांना पाच दिवसांसाठी तुरुंगात पाठवण्यात आले होते.१९ ऑक्टोबर रोजी त्यांची कोठडी आणखी दोन दिवसांनी वाढवण्यात आली. तत्पूर्वी, बुधवारी दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता आणि त्यांना सल्ला दिला होता की, उच्च न्यायालयात जाण्यापूर्वी त्यांनी प्रथम दंडाधिकाऱ्यांच्या (मॅजिस्ट्रेट) निर्णयाची प्रतीक्षा करावी.

न्यायालयाने असा प्रश्न उपस्थित केला की, जेव्हा मॅजिस्ट्रेटच्या आदेशाला आव्हान देण्यासाठी 'रिव्हिजन पिटिशन' दाखल करण्याचा पर्याय उपलब्ध होता, तेव्हा याचिकाकर्त्यांनी थेट उच्च न्यायालयात कलम २२६ अंतर्गत याचिका का दाखल केली? जेव्हा कायद्यात एखाद्या आदेशाला आव्हान देण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया दिलेली असते, तेव्हा सर्वप्रथम त्या प्रक्रियेचेच पालन केले पाहिजे.परिणामी, न्यायालयाने याचिकाकर्त्यांना सध्याची याचिका मागे घेण्यास आणि त्याऐवजी 'रिव्हिजन पिटिशन' दाखल करण्यास सांगितले. त्यानंतर, सौरव दास आणि आशुतोष रंका यांनी आपापल्या याचिका मागे घेतल्या.



**कलम २२६ आणि 'रिव्हिजन पिटिशन' यांमधील फरक**

जर एखाद्या व्यक्तीला असे वाटत असेल की त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन झाले आहे किंवा सरकारी प्राधिकरणाने कोणतीही बेकायदेशीर कारवाई केली आहे, तर ती व्यक्ती उच्च न्यायालयात कलम २२६ अंतर्गत याचिका दाखल करू शकते.याउलट, 'रिव्हिजन पिटिशन'द्वारे कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला कायदेशीर आधारावर आव्हान देता येते. या प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने आदेश दिला असल्याने, सर्वप्रथम 'रिव्हिजन पिटिशन' दाखल करायला हवी होती.

**१. हमीपत्राचे (बॉन्डचे) उल्लंघन:** दोन्ही व्यक्तींनी (सौरव आणि आशुतोष) यापूर्वी शांतता राखण्याचे हमीपत्र दिले होते. त्यानंतरही ही घटना घडली. हमीपत्राचे उल्लंघन होण्याची भीती खरी ठरली असेल, तर प्रशासनाने कठोर नियमांनुसार कारवाई केली, यात चुकीचे काय आहे?

**२. बॅरिकेड्स ओलांडण्याबाबत:** आंदोलक बॅरिकेड्स ओलांडतात, तेव्हा त्यांच्यासोबत आणखी १०-२० लोक सामील होण्याचा धोका असतो. बाहेरून आलेले हे लोक आंदोलकांच्या नियंत्रणाबाहेरच्या कृती करू शकतात, ज्यामुळे शांतता भंग पावण्याची शक्यता निर्माण होते.

**३. शांततापूर्ण आंदोलनाबाबत:** शांततापूर्ण आंदोलन करायचे होते, तर पोलिसांची परवानगी का घेतली नाही? परवानगी घेतली असती, तर आंदोलनाचे वातावरण बिघडवू शकणाऱ्या व्यक्तींना गटात सामील होण्यापासून रोखणे शक्य झाले असते. जर जंतरमंतरवर जाण्यास मनाई होती, तर तुम्ही तिथे गेलातच का?

**४. 'ते 'जनरेशन-झेड' नाहीत':** न्यायालयाने दोन्ही याचिकाकर्त्यांच्या वयाबद्दल विचारणा केली. त्यांच्या वकिलांनी सांगितले की, एकाचे वय २७ वर्षे तर दुसऱ्याचे ३१ वर्षे आहे. त्यावर न्यायालयाने टिप्पणी केली, 'ते 'जनरेशन-झेड' नाहीत.' न्यायालयाने पुढे विचारले की, ते कोण आहेत, काय काम करतात आणि ज्या संघटनेशी ते संबंधित आहेत, तिचा उद्देश काय आहे?

# गुरुदेव सेवकांचा महाराजांना भारतरत्न मिळण्यासाठी अंतिम लढा

## गुरुकुंज मोझरीत बेमुदत जनआंदोलनाची मशाल पेटली

**गुरुकुंज मोझरी :** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न सन्मान मिळण्यासाठी जनआंदोलन समितीच्या वतीने गुरुकुंज मोझरीत बुधवार ता.२१ रोजी पासून बेमुदत जनआंदोलन पुकारण्यात आले. सप्तखंजेरीवादक समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज यांच्या हस्ते जनआंदोलनाची मशाल पेटवण्यात आली असून, कोणत्याही जाती धर्माच्या द्वेष न करणारे संत महाराज होते. त्यामुळे केंद्र सरकारने तुकडोजी महाराजांना भारतरत्न देण्यात यावा अशी मागणी यावेळी सत्यपाल महाराज यांनी केली.



पुढे बोलतांना सत्यपाल महाराज म्हणाले की, या भारतात बंधुभाव नित्य असू दे, दे वरची असा दे, सब के लिये खुला है मंदिर ये हमारा असे मानणारे संत, आदर्श ग्रामाची योजनेचे पूज्य तुकारामदादांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे कार्य चालवले. ज्याप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यासमोर संत गाडगे महाराज यांनाही राष्ट्रसंत सन्मान देण्याची मागणी यावेळी सत्यपाल महाराज यांनी केली. यावेळी जनआंदोलनाच्या ठिकाणी सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. २१ ऑक्टोंबर रोजी सुरू करण्यात आलेले जनआंदोलन २६ जानेवारी पर्यंत चालणार असून यावेळी शेकडोच्या संख्येने गुरुदेव विचारांच्या सेवकांची उपस्थिती होती.

यावेळी मनोहरराव साबळे, प्रशांत कांबळे, शफीक शहा, भैय्यासाहेब बोके, मनोज दिगांबरे, रवी मानव, जगन साबळे, संकेत काळे महाराज, डॉ.चांदूरकर, डॉ.ठोसर, गोपाळराव पेठेकर, भारत ठाकरे, अनिल कायंदे, ज्ञानेश्वर रक्षक, विश्वजीत बाखडे, ऋषी अवसरे, दिनकरराव चोरे महाराज, डॉ.नरेंद्र तराळ, शोभाताई पारिसे, वंदनाताई गणोरकर, डॉ.छायाताई मानव, अश्विनीताई बावणकुळे, सुरेश घाटोळ, सुरेश येरणे, रावसाहेब देवघरे, दिनूभाऊ ठोसर, उत्तमराव गायकवाड, दादा महाराज उंबरकर, रामकृष्ण ढोमणे, अशोकराव मोहोड, अशोक बाभुळकर, कुलदीप सिंग टाक, आकाश मकेश्वर, अरुण राऊत, अहमद शहा, रोशन राऊत, सुनील चिंचोळकर, संदीप हगवणे, पुरुषोत्तम मेश्राम, बाबूराव मेंढे, प्रवीण मुंदडा, अनिल कायंदे, रवींद्र चव्हाण, मुकुंद पुणसे, निलेश दिवे, महेश देशमुख यांच्यासह शेकडो गुरुदेव सेवकांची उपस्थिती होती.

# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# 'कॉक्रोच' फसले

राणा भीमदेवी थाटात घोषणा देणाऱ्या 'कॉक्रोच'ना तुरुंगाची हवा दाखवल्यापासून त्यांच्या आंदोलनाचा जोर गेल्या काही दिवसांत ओसरला आहे. कॅमेऱ्याच्या चौकटीत चार डोकी दिसतील, अशा बेताने वृत्तवाहिन्यांना काहीतरी 'डोस' दिला, म्हणजे वाहिन्या दिवसभर त्याचे चर्वण करत बसतात आणि 'कॉक्रोच' ही अस्तित्वाच्या तेवढ्या दर्शनाने सुटकेचा निःश्वास टाकतात. या आंदोलनाच्या पहिल्या चरणात विद्यार्थ्यांचा जसा प्रतिसाद मिळाला, तसा दुसऱ्या चरणात अजिबात मिळाला नाही. आंदोलनाच्या पहिल्या चरणात स्पर्धात्मक परीक्षांतले गैरव्यवहार, पेपरफुटी यादी विषय होते. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा तो प्रश्न होता. काही लाख कुटुंबे त्यात गुंतलेली होती. या महत्त्वाकांक्षी कुटुंबातल्या सगळ्या सदस्यांना परीक्षा आणि त्यांच्या निकालातील गैरव्यवहाराच्या संशयाने मोठाच धक्का दिला होता. त्यांच्या स्वप्नांना तडे गेले होते. हताश झालेली ही मुले, काही प्रमाणात पालकांच्याच पाठिंब्याने त्या आंदोलनात सहभागी झाली होती. प्रशासन यंत्रणेतील बेफिकीरीची किंमत नेहमी सरकारलाच द्यावी लागते. लोकशाहीतला सर्वात पहिला आणि अगदी सोपा नियम आहे तो. वास्तवाचे भान असलेल्या संवेदनशील केंद्र सरकारला परिस्थिती लवकर लक्षात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय उच्च शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेऊन क्षुब्ध मनांना दिलासा देण्याचा, शांत करण्याचा प्रयत्न केला. तो यशस्वी झाला. सर्वसामान्य विद्यार्थी आणि पालकांचं त्याने समाधान झालं. प्रधान यांच्या राजीनाम्याबरोबरच परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी सरकारने समिती नेमली, काही वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांना शिक्षा दिली. सरकार गैरप्रकारांच्या विरोधात आहे, परिस्थितीत सुधारणा घडवण्याची सरकारची राजकीय इच्छाशक्ती जिवंत आहे, असा संदेश त्यातून गेला. शाळकरी वयातून तारुण्यावस्थेत पदार्पण करत असलेल्या सीमा रेषेवरच्या त्या तरुणांशी संवाद साधण्यासाठी सरकार, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या सगळ्यांनीच झडझडून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. त्यातूनही चांगली वातावरणनिर्मिती झाली. हे सगळं ज्या आंदोलनातून झाले, त्या आंदोलनाच्या सूत्रधारांना या बदललेल्या वातावरणाचा अंदाजच आला नाही. 'शिक्षणमंत्र्याचा राजीनामा मिळवणारे यशस्वी आंदोलन' अशी आंदोलनाची भलामण केली गेली. त्यात माध्यमांतील काही ठराविक मंडळी आघाडीवर होती. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेली, 'कोरी पाटी मुलं' सरकारविरोधात असंतोष पेटवण्यासाठी योग्य हत्यार आहेत, असे मानणारी बरीच मंडळी या मोहिमेची पडद्यामागची कर्तेकरविती झाली. त्यांनी 'कॉक्रोच'ना पुन्हा घोड्यावर बसवले आणि यावेळी मतदान यादीतल्या पुनः निरीक्षणादरम्यानच्या तक्रारींचा मुद्दा त्यांच्या हाती कोंबला. आंदोलनाचे ध्येय 'मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांचा राजीनामा' हे ठरवले गेले. प्रधान यांच्याप्रमाणे ज्ञानेशकुमार यांचीही विकेट तुम्हाला सहज मिळेल, असा भ्रम त्यांच्या डोक्यात भरला. डोक्यात आधीच हवा भरलेली 'कॉक्रोच सेना' ही काहीतरी नवा मुद्दा शोधत होतीच. ज्ञानेशकुमार यांचा विषय त्यांनी आपल्या हाती घेतला आणि तिथेच सरकारची सुटका झाली. 'कॉक्रोच' च्या या आंदोलनाला पहिल्या चरणासारखा पाठिंबा मिळणार नाही, हे अनुभवी, चाणाक्ष नेत्यांनी तेव्हाच हेरले, 'कॉक्रोच' फसले. आंदोलनात जोर नाही, जनतेचा फारसा प्रतिसाद नाही हे लक्षात येताच सरकार आपली पोलिसी ताकद लावायला तयार झालं. त्यांनी थोडीशी ताकद लावताच सगळ्या 'कॉक्रोच'ची पळापळ झाली. 'जंतर-मंतर'वर क्रांतीच्या गप्पा मारणाऱ्या सगळ्यांची अभिजीत दिपकेसह खरी ताकद काय आहे, ते पोलिसांच्या; म्हणजे सरकारच्या लक्षात आले. यापूर्वी जो अंदाज येत नव्हता, तो अंदाज आता अगदी नेमका आला. यापुढे 'कॉक्रोच'नी कोणताही विषय छेडला, तरी त्यांना नियंत्रणात आणणं सरकारला फारसे जड जाणार नाही. दिपके आणि त्यांच्या सहकारी युवा नेत्यांची ताकद त्यांच्या बिगर राजकीय पार्श्वभूमीत होती. त्यांच्यावर कुठल्याच 'वादा' चा शिक्का नव्हता. परीक्षा शिक्षण या दोन्हींतील गैरव्यवहार म्हणजे मुख्यतः शिक्षण आणि शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार हे विषय त्यांनी हाती घेतले होते. वेगळ्या प्रकारची मांडणी होती, आंदोलनाची धाटणीही वेगळी होती. पारंपारिक विरोधकांना पुरून उरलेले सरकार या आंदोलनाला सामोरे जाताना सुरुवातीला भांबावले हे खरे. पण, आपले मैदान सोडून या आंदोलनाने जेव्हा काँग्रेसचा 'मतचोरी' चा आरोप आपल्या आंदोलनाचा भाग केला, तेव्हांच लोक त्यांच्याकडे पाठ फिरवणार हे नक्की झाले. शिक्षण, रोजगार या दोन्हींतील संधी, त्यातील गैरव्यवहार याच वर्तुळात हे आंदोलन आणखी काही काळ चालले असते, तर त्याचा जोर राहिला असता. विरोधी पक्षांचा अजेंडा आपल्या गळ्यात घेऊन त्यांनी स्वतःच्याच पायावर धोंडा मारून घेतला. केंद्रातल्या संघटनाभक्कम सरकारसमोर यातून सावरणे, वाटते तितके सोपे नाही.

# वित्तीय संसाधनाचे वाटप कोणाच्या हितासाठी?

**केंद्र सरकारने आयडीबीआय बँकेतील सरकार आणि भारतीय आयुर्विमा महामंडळाचा हिस्सा कॅनडास्थित कंपनीला विकण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे बँकेचे व्यवस्थापन आणि धोरणात्मक नियंत्रण खासगी विदेशी समूहाकडे जाणार आहे. बँकिंगमधील मालकीबदलाचा प्रश्न केवळ शेअर्सचा नसून कर्जाच्या सामाजिक दिशेचा आहे.**



केंद्र सरकारने आयडीबीआय बँकेतील सरकार आणि भारतीय आयुर्विमा महामंडळाचा मिळून ६०.७२ टक्के हिस्सा कॅनडास्थित फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्जच्या उपकंपनीला ५२ हजार ८७८ कोटींना विकण्यास मंजुरी दिली आहे. या व्यवहारानंतर केंद्र सरकारकडे १५ टक्के आणि एलआयसीकडे १९ टक्के हिस्सा राहणार असला, तरी दोघेही संचालक मंडळावरील प्रतिनिधी मागे घेणार आहेत. त्यामुळे बँकेचे वास्तविक व्यवस्थापन आणि धोरणात्मक नियंत्रण खासगी विदेशी समूहाकडे जाणार आहे. या निर्णयाची चर्चा प्रामुख्याने विक्रीची किंमत, परकीय गुंतवणूक, बँकेची नफाक्षमता आणि सरकारला मिळणारे उत्पन्न या चौकटीत होत आहे. परंतु भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान, ग्रामीण जनतेची कर्जविषयक गरज आणि सार्वजनिक बँकिंगची सामाजिक भूमिका लक्षात घेतली, तर हा केवळ मालकीहस्तांतरणाचा प्रश्न राहत नाही. तो देशातील वित्तीय संसाधनांचे वाटप कोणाच्या हितासाठी केले जाणार शेतकरी आणि श्रमिकांच्या की जास्तीत जास्त परतावा शोधणाऱ्या वित्तीय भांडवलाच्या हा मूलभूत राजकीय अर्थव्यवस्थेचा प्रश्न बनतो.

### बँकिंग म्हणजे...

बँकेचे भांडवल केवळ तिच्या भागधारकांचे नसते. बँकेच्या व्यवहाराचा मुख्य आधार कोट्यवधी ठेवीदारांनी जमा केलेली सामाजिक बचत असते. या बचतीचे कर्जामध्ये रूपांतर करताना कोणत्या क्षेत्राला किती कर्ज द्यायचे, कोणत्या व्याजदराने द्यायचे, कोणता धोका स्वीकारायचा आणि कोणत्या प्रदेशात शाखा ठेवायच्या या निर्णयांतून अर्थव्यवस्थेची दिशा ठरते. बँक ही सामान्य व्यापारी कंपनी नसून समाजातील संचित बचतीचे पुनर्वाटप करणारी संस्था आहे. सार्वजनिक मालकीमध्ये या प्रक्रियेवर संसद, सरकार, नियंत्रक संस्था, माहितीचा अधिकार, सार्वजनिक लेखापरीक्षण आणि जनआंदोलनांचा काही प्रमाणात प्रभाव राहतो. खासगी मालकीमध्ये कर्जवाटपाचे प्रधान मापदंड सामाजिक गरज न राहता नफा, भांडवलावरील परतावा आणि भागधारकांचे मूल्यवर्धन हे बनतात. म्हणूनच प्रश्न फक्त 'आयडीबीआय बँक शेतकऱ्यांना कर्ज देणे बंद करेल का?' असा नाही. कायदेशीर बंधनामुळे ते तत्काळ घडणार नाही. अधिक महत्त्वाचा प्रश्न असा आहे की प्रत्यक्ष कर्जवाटपात लहान शेतकरी, कोरडवाहू भाग, आदिवासी क्षेत्र, शेतमजूर, महिला बचतगट आणि लहान कृषिपूरक उद्योग यांना किती प्राधान्य मिळेल ?

### आयडीबीआयची ग्रामीण उपस्थिती

मार्च २०२६ अखेर आयडीबीआय बँकेची एकूण कर्जे सुमारे २ लाख ५३ हजार ६२६ कोटी होती. बँकेकडे २,१७४ शाखा आणि ६९ स्थिर 'आयडीबीआय समीप' बँकिंग प्रतिनिधी केंद्रांसह २,२४३ प्रत्यक्ष सेवा केंद्रे होती. बँकेच्या वार्षिक अहवालानुसार, कृषी आणि सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना कर्ज देण्यासाठी विशेष शाखा, बँकिंग प्रतिनिधी आणि वित्तीय समावेशन यंत्रणा वापरण्यात येत होती. मार्च २०२५ अखेर बँकेची कृषी क्षेत्रातील कर्जे सुमारे ३२ हजार २५४ कोटी होती आणि ती समायोजित निव्वळ बँक कर्जाच्या सुमारे १९.४ टक्के होती. म्हणजेच आयडीबीआय ही केवळ महानगरांतील कॉर्पोरेट बँक नसून ग्रामीण आणि कृषी अर्थव्यवस्थेशी जोडलेली मोठी वित्तीय संस्था आहे. ही उपस्थिती सार्वजनिक बँकांच्या तुलनेत पुरेशी आहे, असे म्हणता येणार नाही. ग्रामीण शाखा आणि बँकिंग प्रतिनिधींचे जाळे आणखी वाढविण्याची आवश्यकता आहे. परंतु विद्यमान मर्यादांवर उपाय म्हणजे सार्वजनिक नियंत्रण मजबूत करणे - सामाजिक उद्दिष्टच बाजूला सारणे नव्हे.

खासगीकरणाच्या चर्चेत एक वस्तुस्थिती स्पष्टपणे नोंदविली पाहिजे. आयडीबीआय खासगी किंवा विदेशी नियंत्रणाखाली गेल्यानंतरही आरबीआयचे प्राधान्य क्षेत्र कर्जाचे नियम लागू राहतील. व्यावसायिक बँकांना त्यांच्या समायोजित निव्वळ बँक कर्जाच्या किमान १८ टक्के कर्ज कृषी क्षेत्राला द्यावे लागते. त्यापैकी १० टक्के कर्ज लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी असणे आवश्यक आहे. त्यामुळे 'खासगीकरणानंतर कृषिकर्ज पूर्णतः बंद होईल' असे नाही. परंतु नियामक लक्ष्य आणि प्रत्यक्ष सामाजिक बँकिंग यात मोठे अंतर असू शकते. बँक पुढील मार्गांनी आकडेवारीतील लक्ष्य पूर्ण करूनही प्रत्यक्ष शेतकऱ्यापासून दूर जाऊ शकते.

- शेतकऱ्याला थेट कर्ज देण्याऐवजी एनबीएफसी, सूक्ष्मवित्त संस्था किंवा मध्यस्थांना पुनर्कर्ज देणे;
- मोठ्या कृषी कंपन्या, गोदामे, अन्नप्रक्रिया उद्योग आणि व्यापारी साखळ्यांना अधिक कर्ज देणे;
- कृषी क्षेत्रातील तुलनेने सुरक्षित आणि मोठ्या खात्यांना प्राधान्य देणे;
- प्राधान्य क्षेत्र कर्ज प्रमाणपत्रे विकत घेऊन तांत्रिक लक्ष्यपूर्ती करणे;
- कमी नफ्याच्या जिल्ह्यांत शाखा किंवा कर्मचारी वाढविण्याऐवजी डिजिटल आणि प्रतिनिधी पद्धतीवर अवलंबून राहणे;
- ग्रामीण पायाभूत विकास निधीत रक्कम जमा करून थेट शेतकरी कर्जाची जबाबदारी टाळणे.

म्हणजे नियमांचे औपचारिक पालन आणि शेतकऱ्याला योग्य वेळी परवडणारे कर्ज मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

### शेतकरी उपेक्षित होण्याचा धोका

भारतीय शेतीचे स्वरूप प्रामुख्याने लहान व सीमांत भूधारकांचे आहे. त्यांचे उत्पन्न अनिश्चित असते. पीक हवामान, बाजारभाव, रोगराई आणि इनपुट खर्चावर अवलंबून असते. त्यांच्याकडे अनेकदा बँकेला अपेक्षित जमीन अभिलेख, नियमित रोकडप्रवाह किंवा अतिरिक्त तारण उपलब्ध नसते. सार्वजनिक बँकेकडून अशी अपेक्षा केली जाते की ती केवळ संगणकीय क्रेडिट स्कोअर न पाहता स्थानिक परिस्थिती, पीकचक्र, नैसर्गिक आपत्ती आणि सरकारी योजनांचा विचार करेल. खासगी नफाकेंद्री व्यवस्थापनात मात्र कमी खर्चात मोठी आणि सुरक्षित कर्जखाती निर्माण करण्यावर भर असतो.

यातून पुढील परिणाम संभवतात...

- कर्ज नाकारण्याचे प्रमाण वाढू शकते.
- औपचारिक कजएिवजी सावकारीकडे ढकलले जाऊ शकते.
- कर्जाची किंमत वाढू शकते.
- मानवी निर्णयाची जागा अल्गोरिदम घेऊ शकतो.

(पूर्वार्ध)

**देविदास तुळजापूरकर**
९४२२२०९३८०
(लेखक बँकिंग शिक्षण अन् प्रशिक्षण संशोधन संस्थेचे अध्यक्ष आहेत.)

## संवाद

## दसरा मेळावा म्हणजे?

नुकताच मुंबईच्या शिवाजी पार्कवर शिवसेनेचा दसरा मेळावा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वखाली पार पडला.यावेळी सत्ता परिवर्तनसाठी सज्ज व्हा,आमचे ऐकले जात नसेल तर काय करायचे ? ज्ञानेश कुमार यांची तुलना रावणाशी करुन घणाघात केला. याउलट विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपला पक्ष भाषणापेक्षा कामावर विश्वास ठेवतो असा आपल्या मेळाव्यात उल्लेख केला. मात्र उणीव जाणवली ती हिंदूसम्राट, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची, कुठे त्यांच्या वेळेचा दसरा मेळावा आणि कुठे अताचा दसरा मेळावा जमीन अस्मानाचा फरक आहे.त्यांची वैचारिक प्रगल्भता मोठी होती.बाळासाहेब ठाकरेंच्या दसरा मेळाव्याला खूप महत्व असायचे. ते काय बोलणार याकडे सर्वच राजकीय मंडळींचे लक्ष असायचे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या मेळाव्याला हजारोच्या संख्येने शिवसैनिक उपस्थित असायचे. सध्या दसरा मेळावा वेगळ्या वळणावर जात असल्याचे दिसत आहे फक्त आणि फक्त विरोधी पक्षावर निशाणा साधत एकमेकावर आरोपांच्या फैरी झाडून आपण किती त्यांच्यापेक्षा वेगळे आहोत असे भासवले जात आह.वैचारिक पातळी घसरल्यामुळे दसरा मेळाव्याचे महत्व कमी होत आहे. आज महाराष्ट्रात जनतेचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत त्यांची सोडवणूक करण्याऐवजी असल्या कार्यक्रमांमधून एकमेकांची उणीदुणी,राजकीय कुरघोड्या,श्रेवाद यामध्येच वेळ घालवला जात आहे.दसरा मेळाव्यातून महाराष्ट्रातील तमाम जनतेला चांगला, सकारात्मक, विकासाभिमुख संदेश गेला तर आणि तरच दसरा मेळाव्यासारख्या कार्यक्रमांचे महत्त्व वाढून भविष्यात टिकून राहील.

**राजू जाधव**

## पाणी हे जीवन !

यंदा साऱ्या महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती आहे . सरकारने ३५८ तालुक्यापैकी ३०४ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे . महाराष्ट्रातील एकूण ३०३३ धरण प्रकल्पात ७०.१८ टक्के पाणीसाठा आहे .मागील वर्षी हाच साठा९०.५९ टक्के होता . अजून पुढील वर्षाच्या ऑगस्ट महिन्यापर्यंत हा साठा पुरविणे सरकारची व आपणा सर्वांची जबाबदारी आहे . विदर्भ मराठवाड्यात अधिक तूट आहे . पाण्याचा थेंब अन थेंब वाचविला पाहिजे . पाण्याचा वापर काटकसरीने करणे आवश्यक आहे . सध्या शहरात गाड्यांची संख्या प्रचंड प्रमाणात आहे . त्या गाड्या धुतल्या जातात साहजिकच पाणी फारच प्रमाणात खर्च होते .त्या ऐवजी ओल्या फडक्याने त्या पुसून घ्याव्यात . भांडी धुताना नळाची सतत धार ठेवू नये . घरातील नळ जेव्हा पाहिजे तेव्हाच सोडावेत . दररोज अंगण पाण्याने धुऊ नये तसेच झाडांना पाणी घालताना जे पाणी धुण्याचे असते तेच घालावे वाशिंग मशीन चा वापर मर्यादित ठेवावा . सरकारने जलतरण तलावावर काही दिवस पाणी सोडू नये व ते काही दिवस बंद ठेवावेत .अर्थात हा निर्णय कटू आहे पण असे उपाय केल्याशिवाय पाणी पुरणार नाही . कारण धरणातील पाणी संपल्यानंतर पुढील वर्षी पाऊस येईपर्यंत आपणाकडे दुसरा स्रोत उपलब्ध नाही मागील काही वर्षांपूर्वी लातूर येथे पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली होती तेव्हा मिरजेहून दररोज रेल्वेने पाणी पुरवठा केला जात होता . सार्वजनिक ठिकाणी नळ सतत वाहणार नाहीत याची दक्षता सुद्धा जरुरी आहे . एकूणच हे उपलब्ध पाणी आपणास नजीकचे दहा महिने पुरवावयाचे आहे . पशु पक्षी यांनाही पाणी देऊन या दुष्काळात जगविणे हे आपली सर्वांची जबाबदारी आहे काही ठिकाणी जनावरांच्या चाऱ्याची टंचाई आहे तेथे सरकारतर्फे जनावरांच्या छावण्या उभारल्या पाहिजेत . हे पशुधन वाचविणे जरुरीचे आहे सरकारी पातळीवर काटकसर आवश्यक आहे या बाबतीत मुख्यमंत्र्यांनी आदेश जरी केले आहेत असे नुकतेच वाचले . सर्वच पातळीवर बचत व काटकसर हवी लग्न समारंभ प्रसंगी खर्च आटोक्यात ठेवणे अतिशय जरुरीचे आहे . एकूणच पाण्याच्या बचतीबरोबर खर्चात काटकसर व बचत हवी येणारा काळ पाणी संकटाचा आहे .

**शांताराम वाघ** पुणे

# राजवट बदलणे, परकीय हस्तक्षेप आणि रा.स्व. संघ






**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक सहसा तोलून मापून व संयमित विधाने करत असतात. परंतु यावर्षीच्या दसरा मेळाव्यात त्यांनी सध्या देशात सुरु असलेल्या आंदोलनांचा राजवट बदलणे (Regime Change) हाच उद्देश असून या आंदोलनात विदेशी शक्तींचा हात असल्याचाही स्पष्ट आरोप केलेला दिसतो.**

१९७४-७५ मध्ये आधी गुजरात, नंतर बिहार आणि अखेर भारताचीच राजवट बदलण्याचे जोरदार प्रयत्न झाले. गुजरात मध्ये त्या प्रयत्नास लगेच यश आले. गुजरातची विधानसभा भंग करा, अशी स्पष्ट मागणी घेऊन गुजरात नवनिर्माण सेनेने सुरु केलेल्या या आंदोलनात पुढे राजकीय पक्षही उतरले. मोरारजी देसाईंनी आमरण उपोषण सुरु केले आणि इंदिरा गांधींच्या सरकारने मोरारजींचा जीव वाचवण्यासाठी गुजरातची विधानसभाच भंग केली. तो एक रेजिम चेंजच होता. त्यातून प्रेरणा घेऊन बिहारमध्येही विद्यार्थ्यांचे मोठे आंदोलन सुरु झाले. आधी त्यांना मुख्यमंत्र्यांचा राजीनामा हवा होता. पुढे पुढे विधानसभा भंग करा, अशी मागणी जोर धरू लागली. नंतर अलाहाबाद उच्च न्यायालयाने तांत्रिक कारणास्तव इंदिरा गांधींची निवडणूकच रद्दबातल ठरविली. त्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने काही अटींसह स्थगनादेश दिला. तरीही दिल्लीला रामलीला मैदानावर एक अतिप्रचंड रॅली विरोधकांनी घेतली आणि त्या सभेत जयप्रकाश नारायण यांनी सैन्य दलाला केंद्रशासनाचे बेकायदेशीर आदेश पाळू नका, अशी विनंती केली. त्यास उत्तर म्हणून इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी घोषित केली व सर्व विरोधकांना स्थानबद्ध केले.

वरील सर्व घडामोडींमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघाचा उत्साहपूर्ण सहभाग होता. विदेशी शक्तींच्या हस्तक्षेपामुळे अशी आंदोलने उभारून लोकनियुक्त सरकारला सत्ताच्युत करण्याचा प्रयत्न सुरु आहे, असे इंदिरा गांधी सतत म्हणत होत्या. त्यावेळी देशभक्त रा.स्व.संघाने परकीय शक्तींच्या कथित हस्तक्षेपाविषयी चौकशी न करताच आंदोलनात उडी घेतली काय?की चौकशी करून हे आंदोलन पूर्णतः स्वदेशी आहे अशी खात्री करून घेतली होती ? त्यावेळी रेजिम चेंजची मागणी करणे हे देशभक्तांचे नैतिक कर्तव्य होते, आणि आता फक्त देशद्रोहीच अशी मागणी करू शकतात, असे संघाला म्हणावयाचे आहे काय? अण्णा हजारेंना पुढे करून केजरीवाल आणि मंडळींनी लोकपाल नियुक्तीच्या एका गैरलागू व किरकोळ मागणीसाठी देशभर रान उठविले. राजवट बदलणे हाच त्या आंदोलनाचाही हेतू होता आणि रा.स्व. संघ व भाजप त्या आंदोलनातही उत्साहाने सहभागी होते.अण्णा आंदोलनातून निर्माण झालेल्या आम आदमी पक्षाशी सीजेपीचे तरुण संस्थापक निगडीत होते, तसेच योगेंद्र यादव व प्रशांत भूषण यांच्या सारखे विचारक देखील त्यात सहभागी होते. अण्णा आंदोलनापेक्षा या आंदोलनाचे असे कोणते वेगळे वैशिष्ट्य आहे की ज्यामुळे तेव्हा पवित्र असलेली मंडळी आता मात्र अपवित्र झालीत?

गेली बारा वर्षे देशात भाजपचे सरकार आहे. आपल्या पंतप्रधानांना जगात विश्वगुरु मानल्या जाते. अनेक देशांनी त्यांना सर्वोच्च नागरी पुरस्कारही दिले आहेत. सरकारचे गृहमंत्री हे देशाचे दुसरे (की तिसरे?) लोहपुरूष मानले जातात. कौटिल्याच्या अर्थशास्त्रानुसार देशाच्या सीमा सुरक्षित ठेवणे, गुप्तहेरांचे मजबूत जाळे देश-विदेशात विणणे ही राजाची मुख्य कर्तव्ये मानली जातात. कौटिल्य म्हणजेच चाणक्य होय, अशी हिंदुत्ववाद्यांची खात्री आहे. काँग्रेसची राजवट न धड सीमा सुरक्षित करू शकली, न आपल्या गुप्तहेरांचा दबदबा जगात निर्माण करू शकली, असा रा.स्व. संघाचा समज होता. त्यामुळे बारा वर्षांपूर्वी आपला एक स्वयंसेवक पंतप्रधान झाल्यानंतर या दोन्ही क्षेत्रांमध्ये मजबुतीने काम करण्यास संघाने केंद्रशासनास निश्चितच भाग पाडले असणार. इतके शक्तिशाली भारत सरकार पूर्वी कधीही नव्हते. तरी सुद्धा परकीय शक्तींचा हस्तक्षेप होऊन पोराबाळांचे आंदोलन शासनाच्या डोळ्यादेखत वाढत का गेले? हे आंदोलन पेटते ठेवण्यासाठी दिपके, रांका, दास, नेहा बोरा, राहुल गांधी, इंडियन एक्स्प्रेस, द हिंदू, योगेंद्र यादव, प्रशांत भूषण इत्यादी फक्त दिमागी नसून प्रत्यक्षात कार्यशील असलेल्या शहरी नक्षल्यांना कोण पैसा पुरवते, याची निश्चित माहिती असल्यास सरसंघ चालकांनी ती उघड करणे योग्य राहील. कारण केंद्र सरकार अश्या फंडिंगबाबत काहीच माहिती देत नाही. भाजपचे प्रवक्ते आणि टी.व्ही. मिडिया फक्त आवेशपूर्ण आरोप करत राहतात. त्यामुळे सामान्य नागरिकांना केंद्र शासनाच्या क्षमतेबद्दल संशय वाटतो.

राजवट बदलणे हा प्रत्येक विरोधी राजकीय पक्षाचा अजेंडा असतोच. फक्त हे राजवट बदलण्याचे कार्य निवडणुकांच्या माध्यमातून व्हावे, असे संविधानाला अपेक्षित आहे. बांगलादेश व नेपाळ मध्ये घटनाबाह्य मार्गाने राजवटी बदलल्या.

भारतात अजून तरी भाजपचे सरकारच नको किंवा संसद विसर्जित व्हावी अशा मागण्या कोणीही आंदोलक करताना दिसत नाही. त्यांचा रोष ज्ञानेश कुमार, मोदी आणि शाह यांच्यावरच अधिक आहे. भारतातले आंदोलन शांततापूर्ण व अहिंसक आहे.

कुठेही फ्रांस सारखी जाळपोळ झालेली नाही किंवा आंदोलकांनी कोणाला मारण्याचा प्रयत्नही केलेला नाही. तरीसुद्धा भारतातल्या आंदोलनाची जर बांगलादेश, नेपाळ, फ्रांस, अल्बानिया इत्यादी देशातील आंदोलनाशी तुलनाच करायची असेल, तर या सर्व चळवळींमध्ये नेमके कोणते कोणते साम्य आहे, याचाही तपशील रा.स्व. संघाने, भाजपने अथवा केंद्र शासनाने जाहीर करावा.सरकारने व भाजपने वेळीच सकारात्मक प्रतिसाद देऊन निवडणूक आयोगाने आता टप्प्याटप्प्याने सुरु केलेल्या सुधारणा आंदोलनाच्या सुरुवातीसच मान्य केल्या असत्या; २०२३ ची कायदादुरुस्ती रद्द करून मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी असलेल्या समितीत पुन्हा सरन्यायाधीशांचा समावेश केला असता; तर कदाचित हे प्रकरण इतके चिघळले नसते, असे सरसंघचालकांना का वाटत नाही ?

**किशोर देशपांडे**

गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# पुसदकरांची रात्रीची झोप उडवणाऱ्या बुलेटबाजांना आवरणार कोण?

## मॉडिफाय सायलेन्सरच्या फटाकेबाज आवाजाने नागरिक हैराण..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २१ : शहरातील रस्त्यांवर रात्री-अपरात्री कर्णकर्कश आवाज करत धावणाऱ्या मॉडिफाय सायलेन्सरच्या बुलेटमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.**



सायलेन्सरमधून फटाके फुटल्यासारखा आवाज काढत फिरणाऱ्या बुलेटस्वारांनी शहरातील शांततेचा भंग केला असून, या बुलेटबाजांना आवरणार कोण, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.बुलेट ही आकर्षक दुचाकी म्हणून ओळखली जाते. मात्र, काही तरुणांकडून तिच्या मूळ सायलेन्सरमध्ये बदल करून मोठा आवाज काढण्याचा प्रकार केला जात आहे. रात्रीच्या शांततेत अचानक होणाऱ्या या कर्णकर्कश आवाजामुळे लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी दचकतात. काही वेळा वाहनचालकांचे लक्ष विचलित होऊन अपघाताची शक्यताही निर्माण होते. मनोरंजनाच्या नावाखाली इतरांच्या शांततेचा बळी घेण्याचा हा प्रकार थांबणार कधी, असा प्रश्न उपस्थित होत आहे.गेल्या काही दिवसांपासून पुसद शहरातील विविध भागांत बुलेटस्वारांचे घोळके रात्रीच्या वेळी धुडगूस घालत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. विशेष म्हणजे, हा प्रकार सुरू असतानाही त्यावर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवण्यात पोलिसांना यश आलेले नसल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

### कारवाई झाली मग धडाका कायम कसा?

**काही दिवसांपूर्वी पुसद वाहतूक शाखेने मॉडिफाय सायलेन्सर बसवून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेटस्वारांवर कारवाई केली होती. जप्त केलेल्या बदललेल्या सायलेन्सरवर बुलडोझर फिरवून पोलिसांनी कठोर संदेशही दिला होता. मात्र, त्यानंतरही हा प्रकार सुरू असल्याने केवळ एकदाच कारवाई करून चालणार नाही.**
**नियमभंग करणाऱ्या बुलेटस्वारांवर नियमित तपासणी, दंडात्मक कारवाई आणि बेकायदेशीर फेरबदलांविरोधात सातत्यपूर्ण मोहीम राबविण्याची गरज आहे. पोलिसांनी नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन रात्रीची गस्त वाढवावी आणि शहरातील शांतता भंग करणाऱ्यांना कायद्याचा धाक दाखवावा, अशी मागणी जोर धरत आहे.**

# दोन दुचाकीसह चोरटे गजाआड १ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २१ :** मोटारसायकल चोरीच्या घटनांचा तपास करत पांढरकवडा पोलिसांनी दोन गुन्ह्यांचा छडा लावत दोन चोरीच्या दुचाकी हस्तगत केल्या.गोपनीय माहिती आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी अक्षय मोरेश्वर दरने (वय ३१,रा. घोंसी,ता.केळापूर) आणि निकेश पुंजाजी किनाके (वय ३५,रा.गवराई-मांगुर्डा,ता.केळापूर) यांचा शोध घेतला.या कारवाईत एकूण १ लाख १० हजार रुपये किमतीच्या दोन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या.

पांढरकवडा पोलीस ठाण्यात मोटारसायकल चोरी प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हे दाखल होते.या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना पोलिसांना मिळालेली गोपनीय माहिती आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला.यामध्ये अक्षय दरने याच्याकडून अंदाजे ५० हजार रुपये किंमतीची स्प्लेंडर प्लस (क्र.एम.एच २९ बी.एस ००६७),तर निकेश किनाके याच्याकडून अंदाजे ६० हजार रुपये किमतीची होंडा शाईन (क्र.एम.एच २९ ए.एक्स ६०१७) हस्तगत करण्यात आली.अशा प्रकारे दोन्ही गुन्ह्यांतील चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात पोलिसांना यश आले.ही कारवाई पोलीस निरीक्षक यांच्या सूचनेनुसार करण्यात आली.कारवाईत पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशीर,सहायक फौजदार प्रमोद जुनूनकर,पोलीस हवालदार विलास जाधव,नायक पोलीस शिपाई सुनील राठोड,सचिन काकडे आणि पोलीस शिपाई राजू मुत्यालवार यांनी सहभाग घेतला.

## थोडक्यात



### धम्मक्रांतीचा विचार कृतीतून, महागावात भीम अनुयायांसाठी अन्नदान!

**१२ तास सेवाभावाचा जागर, समता, बंधुता आणि मानवतेचा दिला संदेश**

**महागाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मक्रांतीच्या विचारांना कृतीची जोड देत महागावातील भीमसैनिकांनी ७० व्या धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त नागपूरकडे जाणाऱ्या भीम अनुयायांसाठी भव्य अन्नदान कार्यक्रम आयोजित केला. सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ ते मंगळवारी पहाटे ५ वाजेपर्यंत हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करताना समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवतेची मूल्ये केवळ भाषणांपुरती मर्यादित न ठेवता ती कृतीत उतरविण्याचा संदेश महागावातील उपक्रमाने दिला.

नागपूरकडे जाणाऱ्या अनुयायांना अन्नदान करून आयोजकांनी सामाजिक बांधिलकी जपली. धम्माची शिकवण ही केवळ धार्मिक आचरणापुरती नसून करुणा, मैत्री आणि सेवाभावातून समाजपरिवर्तन घडविणारी आहे, हा विचार या उपक्रमातून अधोरेखित झाला. बाळासाहेब डोंगरे, प्रवीण कावळे, धम्मानंद कावळे, बंटी सांगडे, टिकू डोंगरे, सक्षम कावळे, गुड्डू सांगडे, स्वप्निल कावळे, मुन्ना कांबळे, प्रभाकर सांगडे, प्रेम साबळे, गोकुळ भद्रे, हर्षवर्धन कावळे, राहुल बेहडे मामा आणि आदर्श साळवे यांनी आयोजनासाठी पुढाकार घेतला.

यावेळी प्रा. शरदचंद्र डोंगरे, नगरसेविका जयश्रीताई संजय नरवाडे, विशाल पांडे, नारायण शिरबिडे, सुजित ठाकूर, तेजस पाटील नरवाडे, संजय नरवाडे, संजू कोपरकर आणि अमोल राजवाडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. धम्माचा खरा संदेश समता आणि माणुसकीचा असून, सेवाकार्यातून तो समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या अन्नदान उपक्रमातून करण्यात आला.

### तरुणाचा खून करणाऱ्या आरोपीला जन्मठेपेची शिक्षा..! जिल्हा न्यायालयाचा निकाल

**यवतमाळ:** जुन्या वैमनस्यातून तरुणावर धारदार चाकूने वार करून त्याची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपीला यवतमाळच्या जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने दोषी ठरवत जन्मठेपेची कठोर शिक्षा सुनावली आहे. गज्जा उर्फ अक्षय विजय चौधरी (वय २७, रा. पंचशील नगर, वाघापूर टेकडी, यवतमाळ) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.ही घटना ११ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास घडली होती. मृतक अक्षय भीमराव मनवर हा हनुमान मंदिराजवळ उभा असताना, आरोपी अक्षय चौधरी याने जुन्या भांडणाचा राग मनात धरून त्याला गाठले. आरोपीने धारदार चाकूने अक्षय मनवरच्या छातीवर व पाठीवर जोरदार वार करून त्याला गंभीर जखमी केले. शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी फिर्यादी कमलेश भीमराव मनवर यांच्या तक्रारीवरून लोहारा पोलीस ठाण्यात खुनाचा व अॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याची सुनावणी जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश श्री. एस. यु. बघेले यांच्या न्यायालयात झाली. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षातर्फे एकूण १४ साक्षीदार तपासण्यात आले. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी आणि तपास अधिकाऱ्यांची साक्ष तसेच उपलब्ध पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला भा. दं. वि. कलम ३०२ आणि अॅट्रॉसिटी कायद्यान्वये दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. या दोन्ही शिक्षा आरोपीला एकाच वेळी भोगाव्या लागणार आहेत. सदर प्रकरणात सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील अॅड. नरेंद्र एन. पांडे यांनी काम पाहिले. या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पुजलवार व लोहारा पोलीस ठाण्याच्या पो. नि. यशोधरा दि. मुनेश्वर यांनी केला. तसेच कोर्ट पैरवी म्हणून महिला पो. हेड कॉ. आशा नाईक आणि सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक श्री. भगत यांनी सहकार्य केले.

### आधुनिक कृषी तंत्रज्ञान कार्यशाळेचे आयोजन

**आ. संजय देरकर यांच्या संकल्पनेतून विज्ञानसंत अंकुश पाटील देणार आधुनिक शेतीचे धडे**

**झरी :** शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, शेतीतील उत्पादन वाढावे आणि शेती अधिक फायदेशीर व्हावी, या उद्देशाने झरी तालुक्यातील खडकी-मुकुटबन येथील हिमांशू सेलिब्रेशन येथे सोमवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता कृषी तंत्रज्ञान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार संजय देरकर यांच्या संकल्पनेतून आयोजित या कार्यशाळेत विज्ञानसंत अंकुश पाटील (सांगली) हे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. आधुनिक शेती पद्धती, कृषी संजीवके, कीटकनाशके, तणनाशके तसेच पिकांच्या वाढीसाठी उपयुक्त विविध घटकांविषयी या कार्यशाळेत माहिती दिली जाणार आहे. कार्यशाळेत ह्युमिक अॅसिड, फुल्विक अॅसिड, अमिनो अॅसिड, ऑर्गेनिक कार्बन, लायन सल्फर, सिलिकॉन स्ट्रक्चर, बायोडायनॅमिक पद्धती, सिलिकॉनसाठीची औषधे आणि सर्व माध्यमांचे न्यूट्रिशन अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करता यावा, शेतीतील समस्या समजून घेता याव्यात आणि उपलब्ध कृषी तंत्रज्ञानाचा लाभ घेता यावा, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे. परिसरातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांची दिवाळी गोड करा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. २१ :** शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या आयुष्यात दिवाळीचा आनंद फुलविण्यासाठी घाटंजी प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. 'मिशन उभारी' अंतर्गत आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या या कुटुंबांना दिवाळी सणानिमित्त मदत करण्यासाठी तालुक्यातील व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी सामाजिक बांधिलकीतून पुढे यावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

यासंदर्भात तहसीलदार कार्यालयाकडून १९ ऑक्टोबर २०२६ रोजी पत्र जारी करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या संदेशानुसार, २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत शेतकरी आत्महत्या झालेल्या कुटुंबांना दिवाळी साजरी करण्यासाठी मदतीचा हात देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.या आवाहनात तालुक्यातील व्यापारी, दुकानदार, डॉक्टर, जिनिंग व्यावसायिक आणि अन्य व्यावसायिकांचा समावेश आहे. आर्थिक मदत, दिवाळीचे साहित्य तसेच जीवनावश्यक वस्तू देऊन या कुटुंबांना दिलासा देता येऊ शकतो. शेतकरी आत्महत्येमुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक आणि मानसिक बळ खचते. अशा परिस्थितीत सणासुदीच्या काळात त्यांना आधार देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या घरात दिवे लावताना दुःखाच्या अंधारात जगणाऱ्या कुटुंबांच्याही आयुष्यात आशेचा प्रकाश निर्माण करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. घाटंजीतील नागरिकांच्या सहकार्यामुळे या कुटुंबांची दिवाळी अधिक आनंददायी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा झाली डिजिटल!

## विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची संधी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. २१ :** मुकुटबन येथील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने डिजिटल शिक्षणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. शाळेत विद्यार्थ्यांसाठी डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण घेण्याची संधी मिळत आहे. डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना श्रवण व दृक्माध्यमांच्या सहाय्याने विविध विषय समजून घेणे अधिक सोपे होणार आहे.

हेडफोन व संगणकाच्या माध्यमातून विद्यार्थी एकाग्रतेने अभ्यास करू शकतील. यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला गती मिळून शिक्षण अधिक रंजक, प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण होण्यास मदत होणार आहे. आजच्या डिजिटल युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक शैक्षणिक सुविधा मिळणे आवश्यक आहे. या दृष्टीने शाळेचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असून, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाशी जोडण्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी नवी दिशा मिळत आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असून, मुकुटबनच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

# कुटारा सह शेती साहित्य पेटविले, शेतकऱ्याचे मोठे नुकसान!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभूळगाव, दि. २१ :** शेती आधीच संकटात असताना शेतातील कुटार आणि शेती उपयोगाचे साहित्य जाळून शेतकऱ्याचे नुकसान करण्याचा धक्कादायक प्रकार बाभूळगावपासून चार किलोमीटर अंतरावरील कोपरा जानकर येथील शेतकरी मोबीन अली कोपरेकर यांच्या बाबतीत घडला. या घटनेमुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असून मुक्या जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

मोबीन अली कोपरेकर यांच्या खडकसांवगा शिवारातील गट क्रमांक ४१ मधील शेतात सोयाबीन काढणीनंतर कुटार साठवून ठेवले होते. रात्री दोन ते तीन अज्ञात इसमांनी शेतात प्रवेश करून कुटाराच्या गंजीला आग लावल्याची तक्रार आहे. एवढ्यावरच न थांबता शेतातील प्लास्टिकच्या तीन पाण्याच्या टाक्या, स्प्रे पंप, स्प्रिंकलरचे नोझल, शेतीसाठी वापरण्यात येणारी औषधे, तणनाशके आणि मिठाचे पुडेही पेटत्या कुटारावर टाकून जाळण्यात आल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून जनावरांसाठी साठवलेला चारा जळाल्याने पुढील काळात चाऱ्याची व्यवस्था कशी करावी, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणी मोबीन अली कोपरेकर यांनी बाभूळगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. जमादार पृथ्वीराज चव्हाण यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. आग लावणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा पोलीस शोध घेत आहेत. शेतीतील साहित्य जाळण्यामागे नेमके कोण आणि कारण काय, याचा उलगडा होणे गरजेचे आहे.

# यश गिरीची तिहेरी उडी, राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत निवड

## विभागस्तरीय मैदानी स्पर्धेत स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूलचे यश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २१ :** येथील स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात पुन्हा एकदा आपल्या यशाची मोहर उमटवत संपूर्ण तालुका, जिल्हा व विभागात शाळेचा व परिसराचा डंका वाजवला आहे.

मागील अनेक दिवसांपासून पार पडलेल्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये शाळेच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत तालुका व जिल्हा स्तरावर आपले वर्चस्व सिद्ध केले. या उत्कृष्ट मालिकेचा पुढचा टप्पा गाठत शाळेचा गुणवंत व जिद्दी खेळाडू यश अविनाश गिरी याने राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी आपली धडक मारली आहे. यश गिरी याने तालुका, जिल्हा व विभाग पातळीवरील अत्यंत चुरशीच्या सामन्यांमध्ये आपल्या शिस्तबद्ध खेळाचे आणि उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन केले. त्याच्या या धडाकेबाज कामगिरीमुळेच त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, त्याच्या या यशाने स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूलसह हरदडा परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे. मार्गदर्शकांचे सहकार्य अन् आई-वडिलांची प्रेरणा आपल्या या यशा विषयी प्रतिक्रिया देताना यश गिरी याने सांगितले की, नियमित सराव, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबाचा भक्कम पाठिंबा यांमुळेच हे यश शक्य झाले. त्याने आपल्या यशाचे श्रेय शाळेचे प्राचार्य प्रीतम विश्वकर्मा, स्वामी विवेकानंद ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य देवानंद गाडबेले, फाउंडेशनल स्टेजच्या एचओडी जयश्री देशमुख, क्रीडाशिक्षक अशोक सव्वाशे तसेच आपले आई-वडील व सर्व शिक्षकवृंदांना दिले आहे. सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव यश गिरी याच्या या राज्यस्तरीय निवडीबद्दल संस्थेचे पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व ग्रामस्थांनी त्याचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. राज्यस्तरीय स्पर्धेतही तो अशीच चमकदार कामगिरी करून शाळेचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त करत सर्वांनी त्याला पुढील वाटचालीसाठी उदंड शुभेच्छा दिल्या.

# एकाच खुर्चीवर दीर्घकाळ ठाण दिग्रसच्या उपकार्यकारी अभियंत्यांची बदली होणार?

## माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाची अधीक्षक अभियंत्यांकडे तक्रार..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. २१ :** महावितरणच्या दिग्रस उपविभागातील उपकार्यकारी अभियंत्यांच्या दीर्घ कार्यकाळाचा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. एकाच ठिकाणी दीर्घकाळ कार्यरत असलेल्या या अधिकाऱ्याच्या नियुक्तीपासून आजपर्यंतच्या कार्यकाळाची चौकशी करून नियमांनुसार बदली करावी, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष मो. शहबाज मो. अकील यांनी अधीक्षक अभियंत्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीसह महावितरणच्या बदली धोरणाची अंमलबजावणीही चर्चेत आली आहे. शासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भातील नियमांचा आधार घेत संबंधित अभियंता किती वर्षांपासून दिग्रस येथे कार्यरत आहेत, त्यांची नियुक्ती कधी झाली आणि निर्धारित कार्यकाळ ओलांडला आहे का, याची तपासणी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दीर्घकाळ एकाच ठिकाणी राहिल्यामुळे हितसंबंध निर्माण होण्याची शक्यता असून, त्याचा प्रशासकीय कामकाजावर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका महासंघाने मांडली आहे.

**कामांचे ऑडिट आणि तक्रारींची चौकशी करा!**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ चा संदर्भ देत संबंधित अधिकाऱ्याच्या कार्यकाळातील मंजूर कामे, प्रलंबित फाइल्स, वीज ग्राहकांच्या तक्रारी आणि प्रशासकीय विलंबाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. कार्यकाळ तीन वर्षांपेक्षा अधिक असल्याचे आढळल्यास लागू नियमांनुसार बदली करावी, तसेच केलेल्या कारवाईचा लेखी अहवाल द्यावा, अशीही मागणी आहे.

**वरिष्ठ अधिकारी नेमकी काय भूमिका घेणार?**

तक्रारीनंतर अधीक्षक अभियंता चौकशीचे आदेश देतात का, संबंधित अधिकाऱ्याच्या कार्यकाळाची पडताळणी होते का आणि नियमभंग आढळल्यास कारवाई केली जाते का, हे महत्त्वाचे ठरणार आहे. केवळ तक्रारीपुरते प्रकरण मर्यादित न राहता त्यावर पारदर्शक निर्णय व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कारवाई न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही महासंघाने दिला आहे.

# अधर्मावर धर्माचा विजय! महागावात विजयादशमीचा उत्साह शिगेला!

## श्री हनुमान मंदिरात दर्शन,शमीवृक्ष पूजनासह आपट्याची पाने देत जपला स्नेह आणि बंधुभाव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २१ :** अधर्मावर धर्माचा, असत्यावर सत्याचा आणि वाईट प्रवृत्तींवर चांगुलपणाचा विजय अधोरेखित करणारा विजयादशमीचा सण महागाव शहरात पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला.

धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक एकतेचा संगम घडविणाऱ्या या सोहळ्यात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दसऱ्यानिमित्त सर्वप्रथम श्री हनुमान मंदिरात दर्शन घेऊन आशीर्वाद घेण्यात आले. त्यानंतर रमेश पाटील यांच्या शेतातील शमीवृक्षाचे विधिवत पूजन करण्यात आले. आपट्याच्या पानांचे पूजन करून उपस्थितांनी एकमेकांना ही पाने 'सोने' म्हणून देत दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी गावातील मानकरी, प्रतिष्ठित नागरिक, युवक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

**परंपरेचा गजर नव्हे, तर आचरणातून विजयाचा संदेश!**

विजयादशमी हा केवळ धार्मिक विधींचा उत्सव नसून जीवनातील वाईट प्रवृत्तींचा त्याग करून सत्य, न्याय आणि सदाचाराचा मार्ग स्वीकारण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. प्रभू श्रीरामांचा रावणावरील विजय आणि देवी दुर्गेने महिषासुराचा केलेला वध या पौराणिक घटनांतून अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याचा संदेश मिळतो. महागावातील या उत्सवाने परंपरेचे जतन करत सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याचा संदेश दिला. द्वेषाऐवजी प्रेम, अन्यायाऐवजी न्याय आणि अहंकाराऐवजी सदाचाराची निवड करणे, हाच विजयादशमीचा खरा अर्थ असल्याची जाणीव या मंगल पर्वाने करून दिली.

# पुसद येथे ७० वा धम्मपरिवर्तन दिन व विजयादशमी उत्साहात साजरा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २१ :** धम्मक्रांती प्रज्ञापर्व समिती, पुसद यांच्या वतीने ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन व विजयादशमी निमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. मंगळवार २० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पुसद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याजवळ आयोजित या कार्यक्रमात उपस्थितांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले.

सर्वप्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील पंचशील ध्वज फडकवण्यात आला तसेच तथागत गौतम बुद्ध सम्राट अशोक छत्रपती शिवाजी महाराज महात्मा ज्योतिराव फुले छत्रपती शाहू महाराज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तसेच धूप प्रचलित करून त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले. यावेळी धम्मक्रांती प्रज्ञापर्व समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुनील खाडे यांच्यासह समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव कार्यक्रमाला उपस्थित होते. तथागत भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करत हा अभिवादन सोहळा पार पडला. या प्रसंगी विठ्ठल खडसे, लक्ष्मण कांबळे, नरेंद्र पाटील, संतोष अंभोरे, डॉ. कल्याण साखरकर, विजय बहादुरे, भोलानाथ कांबळे, डॉ. भास्कर पाढेन, शरद ढेंबरे, प्रकाश सौंगडे, गोविंद कांबळे, गजानन जोगदंडे, सुधाकर जाधव, प्रा. डॉ. शेळकीकर, संतोष सोनोने, सुखदेव भगत, संतोष गायकवाड, किसन धुळे, सुनील कांबळे, अशोक लाव्हरे, दिलीप पाईकराव, अशोक कदम, तुकाराम चौरे, यश भरणे, भगवान हणवते, रमेश हाडसे, प्रा. पुंडकर, तुकाराम कानिंदे, विजय निखाते, भुजंग इंगोले व मारोती भस्मे इत्यादी समाज बांधव उपस्थित होते.

# श्री हव्याप्र मंडळाच्या १०१ वा राष्ट्रीय विजयादशमी महोत्सवाला अखंड भारताचे स्वरूप

## २२ राज्यातील ३ हजार विद्यार्थ्यांच्या चित्तथरारक कवायती; सांस्कृतिक कला संस्कृतीचे सादरीकरण

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्याचे कुलदैवत श्री अंबादेवी व श्री एकवीरादेवी नवरात्रोत्सवाला स्फुरण चढते ते श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या राष्ट्रीय विजयादशमी अर्थात दसरा महोत्सवाने. दशमीला देवींच्या सिमोल्लंघन नंतर स्थानिक अमरावती-बडनेरा मार्गावरील दसरा मैदानावर या १०१ व्या ऐतिहासिक राष्ट्रीय विजयादशमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मंडळामध्ये शिकत असलेले सर्व विभागातील २२ राज्यातील तब्बल ३ हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी भारतीय पारंपारीक खेळ, योग-व्यायाम आणि संस्कृती दर्शनातून चित्तथरारक कवायती सादर करीत विजयादशमी महोत्सवाला अखंड भारताचे स्वरूप दिले.

मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके व सचिव प्रा. विकास कोळेश्वर यांनी आद्य संस्थापक कै. अंबादासपंत वैद्य यांच्या प्रतिमेला अभिवादन केले व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा १०१ वा राष्ट्रीय दसरा महोत्सवाला सुरूवात झाली. या महोत्सवाला मनपा महापौर श्रीचंद तेजवानी, लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण संस्थांच्या कुलपती डॉ.



कल्पना शर्मा, प्रसून शर्मा, आ. प्रताप अडसड, मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, एक्साईज विभागाचे उपयुक्त पराग नवलकर मंडळाचे कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव डॉ. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रविंद्र खांडेकर, मंडळाचे आंतरराष्ट्रीय समन्वयक प्रा. प्रणव चेंडके, प्रा. दीपा कान्हेगावकर, डॉ. संजय तिरथकर, संजय खराटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आ. रवी राणा यांनी देखील दसरा महोत्सवाला भेट देत आयोजक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मनपा महापौर श्रीचंद तेजवानी, लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण संस्थांच्या कुलपती डॉ. कल्पना शर्मा, प्रसून शर्मा, आ. प्रताप अडसड यांनी पथसंचलनाचे निरीक्षण करीत विद्यार्थ्यांच्या परेड ला सलामी दिली. राष्ट्रगीत, वंदे मातरम, हिंद के बहादुरो या गीतांनी दसरा महोत्सवाला सुरूवात झाली. यानंतर मंडळाच्या विद्यार्थ्यांनी डंबेल्स कवायत, मल्लखांब, रोप मल्लखांब, दंड बैठक, रायफल डील, गोला ड्रिल, विटा फेक भाला ड्रील, सिंगल दांड पट्टा, डबल दांडपट्टा, दांडपट्टा ड्रील, लेझीम, सिंगल लाठी, दो हाती तलवार, ढाल तलवार, एरोबिक्स, योगा ड्रील, जिम्नास्टिक्स, रशियन ड्रील, बॉक्सींग, तायकांडो, बॉडी बिल्डिंग, सिंगल बनेटी, दो हाती बनेटी, चेन बनेटी, जलती जोडी टॉर्चेस मार्चिंग, लेझीम व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन वाद्यवृंद विभागाच्या तालबद्ध संगीतमय रीतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन, आभार डॉ. विजय पांडे, डॉ. अरुण खोडस्कर, प्रा. जयंत गोडसे, आनंद महाजन यांनी केले. समारोपीय सोहळ्याला मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके,



सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत त्यांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे, शिस्तबद्ध आयोजन व नेत्रदीपक कवायती पाहून प्रभावित झालेल्या लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण संस्थांच्या कुलपती डॉ. कल्पना शर्मा यांनी विद्यार्थ्यांशी थेट मैदानावर भेट घेत दिलखुलास संवाद साधत त्यांचे कौतुक केले.

**डोळ्याचे पारणे फेडणारा सोहळा**

ड्रोन द्वारे आकाशातून सतत होणारी पुष्पवृष्टी आणि त्याखाली भारतीय पारंपारीक खेळ, कवायतीचे सादरीकरण करतांना विद्यार्थ्यांनी अतिशय शिस्तबद्ध रित्या सादरीकरण केले. प्रामुख्याने मल्लखांब व त्यावरील आगीचे डोम, रोप मल्लखांब, महाराष्ट्राच्या वेशभुषेत विद्यार्थीनींचा लेझीम, ढाल तलवार, जिम्नास्टीक च्या थक्क करणाऱ्या कवायती, भाला फेक अशा एक ना अनेक चित्तथरारक कवायती सादरीकरणा दरम्यान हजारो उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले होता.हा राष्ट्रभक्तीचा सोहळा पाहतांना डोळ्याचे पारणे फेडणारा सोहळा असल्याचे मत नागरीकांनी व्यक्त केले.

**प्रेरणादायी सोहळा**

या महोत्सवामध्ये देशातील विविध राज्यातील विद्यार्थी तालबद्ध आणि एकरूप होवून विविध खेळ व कवायती सादर करतात. हे पाहतांना अखंड भारताचे होणार दर्शन गौरवास्पद आहे. खेळ आणि व्यायाम प्रत्येक युवकाने आत्मसात करणे नितांत गरजेचे असून याद्वारे निरोगी आरोग्यासह उज्वल भवितव्य साकार होण्यास मदत होते. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कार्य प्रेरणादायी आणि देशहिताचे असल्याचे मत आ. प्रताप अडसड यांनी व्यक्त केले.

**ऐतिहासिक, सांस्कृतिक देशभक्तीचा सोहळा**

दसरा महोत्सवामध्ये सादर होत असलेल्या चित्तथरारक कवायती, खेळ आणि व्यायाम पाहता अशा प्रकारचे शिक्षण आणि प्रशिक्षण आजच्या विद्यार्थ्यांना नितांत गरजेचे आहे, जे वर्तमान शिक्षण व्यवस्थेतून मिळत नाही. मागील अनेक दशकांपासून श्री हव्याप्र मंडळ क्रीडा क्षेत्रामध्ये समर्पित कार्य करीत आहे. येथील विद्यार्थी आज विविध क्षेत्रामध्ये कार्यरत असल्याचा अभिमान वाटतो. अशा प्रकारचे शिक्षण आणि प्रशिक्षण प्रत्येक युवकाने आणि युवापीढीने आत्मसात करावे असे आवाहन मनपा महापौर श्रीचंद तेजवानी यांनी व्यक्त केले.

# जिल्ह्यात ऑक्टोबर हिट कायम

**अमरावती/का.प्र.**

साधारणपणे, विदर्भातील हवामान दसऱ्याच्या सुमारास बदलायला सुरुवात होते. दिवस हळूहळू लहान होऊ लागतात आणि सकाळ-संध्याकाळचा फरक जाणवू लागतो. शरद पौर्णिमा जवळ येत आहे आणि हिवाळ्याची चाहूल लागत आहे. पण ह्या वेळी हवामान बदलत असल्याचे दिसत आहे. दसरा अगदी जवळ आला आहे, तरीही अमरावतीमधील अनेक शहरांमध्ये अजूनही उष्णतेची लाट आहे. तापमान ३४ ते ३७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने रहिवाशांना अजूनही उकाड्याचा सामना करावा लागत आहे. अवतीमधील कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअस होते. किमान तापमान २१ अंश होते. तीव्र सूर्यप्रकाश आणि उष्णतेमुळे एप्रिल-मे प्रमाणे ते जाणवत आहे. त्याच वेळी, रात्रीचे तापमान शरद ऋतू नसल्यामुळे हवामान थंड होण्याची वाट पाहत आहे. उपलब्ध हवामान अंदाजानुसार तात्काळ तीव्र थंडी पडण्याची शक्यता नाही. उष्णतेची जाणीव होत असल्यामुळे आणि रात्रीसुद्धा पुरेशी थंडी न मिळाल्याने, लोकांना हिवाळ्यासाठी जास्त काळ थांबावे लागू शकते.

**विदर्भाचे हवामान?**

पावसाअभावी हवामान उबदार राहते.यावेळी, पावसाच्या कमतरतेमुळे आणि बऱ्याच काळापासून पाऊस न पडल्यामुळे, हवामानातील अपेक्षित बदल जाणवत नाहीये.पावसानंतर जमिनीतील आणि वातावरणातील आर्द्रता वाढल्याने तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत होते.पावसाच्या कमतरतेच्या काळात, प्रखर सूर्यप्रकाश आणि निरभ्र आकाशामुळे दिवस अधिक उष्ण वाटू शकतो.वाढत्या उष्णतेचे एकमेव कारण म्हणून केवळ कमी पावसाचा विचार करता येणार



नाही.वाऱ्याची दिशा, ढगांचे आवरण, आर्द्रता आणि स्थानिक हवामानाची परिस्थिती यांचाही तापमानावर परिणाम होतो.

विदर्भातील बदलत्या हवामानाचे स्वरूप समजून घेण्यासाठी दिवसा आणि रात्रीच्या तापमानातील फरक देखील महत्त्वाचा आहे.दिवसभरात कमाल तापमान सुमारे ३३ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २१-२२ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. विदर्भातील काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या इशाऱ्यानुसार खबरदारी घेणे आवश्यक आहे.विदर्भातील प्रमुख शहरांच्या उपलब्ध तापमानाच्या आकडेवारीनुसार, यवतमाळमध्ये सर्वाधिक ३१.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली, तर अमरावती ३ अंशांच्या फरकासह दुसऱ्या स्थानावर होती. अकोला येथे ३६ अंश तापमानाची नोंद झाली, तर वाशिममध्येही ३६ अंश तापमान नोंदवले गेले. दुसरीकडे, गोंदियामध्ये किमान तापमान १९.४ अंश आणि वाशिममध्ये १९ अंश नोंदवले गेले. यावरून हे स्पष्ट होते की, काही शहरांमध्ये उन्हाळा तुलनेने थंड होऊ लागला आहे, परंतु दिवसाची उष्णता अजूनही कायम आहे.

# जागतिक वन्यजीव सप्ताहनिमित्त विविध स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बायोटेक विभागात जागतिक वन्यजीव सताहनिमित्त मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती, वाईडलाईफ ॲन्ड एन्व्हार्यमेंट कन्झर्वेशन सोसायटी, अमरावती आणि इंडियन वुमन सायंटिस्ट्स् असोसएशन यांच्या सहकार्याने सेमिनार, पोस्टर, निसर्ग व वन्यजीव छायाचित्रण, घोषवाक्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करुन विभागाचे नाव उंचावले.

पदवी स्तरावरील पोस्टर स्पर्धेत नंदिनी आगाशे प्रथम, जेनिफर कांबळे व्दितीय, तर श्रेया तिरपुडे तृतीय, घोषवाक्य स्पर्धेत साक्षी जाधव व्दितीय, सेमिनार स्पर्धेत आकांक्षा कराळे तृतीय, निसर्ग व वन्यजीव छायाचित्रण स्पर्धेत संचित पारधेकर प्रथम, पदव्युत्तर पोस्टर स्पर्धेत तनिषा तायडे व्दितीय, तर जावेरिया अनम तृतीय क्रमांक, घोषवाक्य स्पर्धेत निकिता काळमेघ हिने प्रथम क्रमांक पटकावला.विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील, डॉ. प्रशांत ठाकरे, प्रा. सुदर्शन कोवे, प्रा. अनघा उंदीरवाडे, प्रा. मैथिली उगले यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## संक्षिप्त

### नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा

**अमरावती**-स्थानिक श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट द्वारा संचालित स्व. प्रमिलाताई वसंतराव काळेले सरस्वती शिशुवाटिकेतर्फे शुक्रवार २३ रोजी सकाळी १० ते दुपारी १.०० पर्यंत शिशुगट ते वर्ग ४ पर्यंतचे आचार्य व माता-पालक यांच्याकरीता नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरुन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यशाळेत गोवा आणि कोकण विभागाचे शिशुवाटिका प्रांतप्रमुख भाईजी उपाले हे मार्गदर्शन करणार आहे. तरी सर्व आचार्य तसेच माता- पालकांनी या कार्यशाळेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

### श्री बालाजी देवस्थान महोत्सवाला प्रारंभ



**अचलपूर**-शहरातील जीवनपुरा येथील प्रसिद्ध श्री बालाजी देवस्थान येथे वार्षिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे .२० ऑक्टोबर पासून या महोत्सवाला प्रारंभ झाले असून २७ ऑक्टोबर पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.येत्या २७ ऑक्टोबर बुधवार रोजी सकाळी ४ वाजतपासून प्रारंभ ह ोणार आहे .या यात्रा महोत्सवाचा प्रारंभ तीर्थ स्थापना व श्री बालाजीच्या पालखीचे सीमोल्लंघन २० ऑक्टोबर रोजी झाले.२८ ऑक्टोबर दरम्यान दरवर्षी प्रमाणे ठरलेल्या परिक्रमा ,आरती ,भजन दिंडीचा गजर असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे .२६ ऑक्टोबर रोजी राम अवतार व आरती,ताटीका वध, त्याच प्रमाणे येत्या २७ ऑक्टोबर रोजी भाविक - भक्ताचे लोटांगण कार्यक्रम संपन्न होणार आहे.यामध्ये मोठ्या संख्येने भाविक - भक्त मोठ्या उत्साहात सहभागी होतात .सायंकाळी रथोत्सव यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे .आणि २८ ऑक्टोबर रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

### टायटन्स पब्लिक स्कूलचे यश



**अंजनगाव बारी** -विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचालित स्थानिक टायटन्स पब्लिक स्कूल, बडनेरा येथील विद्यार्थ्यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी , अमरावतीतर्फे आयोजित जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत ४ सुवर्ण आणि ३ रौप्य पदकांची कमाई केली.स्पर्धेत तनीष आंबेकर, अर्णव मेश्राम, आयुष खवासे आणि पूर्वेश धांडे यांनी सुवर्णपदक पटकावले, तर अहझम शेख, समृद्धी दुर्गे आणि आराध्या मेश्राम यांनी रौप्यपदक मिळवून शाळेच्या यशात मोलाची भर घातली. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेचे किकबॉक्सिंग प्रशिक्षक जफरखान यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत पदकांवर आपले नाव कोरले. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे प्राचार्य अजय चौबे, शाळा व्यवस्थापन, शिक्षकवृंद आणि पालकांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या देदीप्यमान यशामुळे टायटन्स पब्लिक स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशनतर्फे गरबा आयोजन

**अमरावती**-दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन च्या फॉउंडर प्रेसिडेंट डॉ रूपाली गोसावी, जनरल सेक्रेटरी डॉ आरती नल्लू, स्टेट कोर कमिटी मेंबर डॉ स्वाती पडोळे यांच्या मार्गदर्शना खाली अमरावती तर्फे नवरात्री निमित्त अंबा गरबा, शंकर नगर अमरावती येथे गरबा आयोजन करण्यात आले.या वेळी अमरावती जिल्हा अध्यक्षा डॉ प्रिया मोहोड, उपाध्यक्षा डॉ मधुरा कहाळे, सचिव डॉ स्नेहा पिंजनी, सहसचिव डॉ वैशाली टेम्भे, डॉ शीतल आचार्य, समिती सल्लगार डॉ अलका राजपुरिया, कमिटी मेंबर डॉ पल्लवी चौधरी, महिला प्रतिनिधी डॉ नीता अरोरा, डॉ शीतल चौधरी, डॉ कविता चिंचोळकर डॉ नम्रता नानवानी, डॉ संगीता राजपुरिया, डॉ रंजना पचगाडे, प्रामुख्याने उपस्थित होत्या.



# न्यायालयात वकिलाला मारहाण प्रकरणातील आरोपीवर अद्यापही कारवाई नाही

**ॲड विनय देशपांडे यांनी व्यक्त केला संताप**

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाच्या दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांच्या न्याय कक्षात मारहाण प्रकरणातील ॲड. विनय देशपांडे यांच्यावर घडलेल्या प्रकाराचा प्रचंड मानसिक आघात झाला असून त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असली तरी या प्रकरणात अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही.

अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयात सुमारे पंधरा दिवसांपूर्वी एका मालमत्ता प्रकरणात ॲड. आर. ए. सायरे यांनी ॲड. विनय देशपांडे यांच्यावर धावून येत दोन्ही कानशीलात लगावल्या होत्या. या प्रकरणाचा मानसिक आघात ॲड. विनय देशपांडे यांच्यावर झाला असून त्यांचा रक्तदाब प्रचंड वाढल्याने खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सुमारे दोन दिवस ते अतिदक्षता विभागात चिंताजनक स्थितीत दाखल होते. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे, मात्र या प्रकरणी पोलीस विभाग तसेच वकील संघाकडून अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही. ॲड. विनय देशपांडे गेल्या ३४ वर्षापासून सेवारत आहेत. या प्रकरणामुळे त्यांची सामाजिक प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या बाबत तात्काळ कारवाई करण्याची मागणी वकील बांधवांकडून करण्यात येत आहे.

# सातेगावात युवाशक्तीचा क्रीडाक्षेत्रासाठी पुढाकार!

## विजयादशमीच्या मुहूर्तावर युवाशक्ती व्हॉलीबॉल क्लबच्या मैदानाचे भूमिपूजन

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

ग्रामीण भागातील युवकांना मैदानी खेळांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने युवाशक्ती व्हॉलीबॉल क्लब, सातेगावच्या क्रीडांगणाच्या निर्मितीचा शुभारंभ विजयादशमी व दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर उत्साहपूर्ण वातावरणात भूमिपूजनाने करण्यात आला. गावातील क्रीडाक्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या या उपक्रमामुळे स्थानिक खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भूमिपूजन कार्यक्रमाला मंडळाचे मार्गदर्शक विठ्ठल पळसकर,अमोल पाटील, तुलसीदास गावंडे,अमोल



डिवर,शाम बोबडे, सैय्यद नदीम, अमोल ढोले आणि श्रीकांत वडतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.ग्रामीण भागातील युवकांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, होतकरू खेळाडूंना नियमित सरावासाठी योग्य सुविधा मिळाव्यात आणि त्यांच्यातील क्रीडागुणांना वाव मिळावा, या हेतूने या मैदानाची निर्मिती करण्यात येत आहे. या माध्यमातून सातेगावातील युवा खेळाडूंना आपल्या कौशल्याचा विकास करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.आजच्या डिजिटल युगात युवकांचा वाढता वेळ मोबाईलवर खर्च होत असताना त्यांना मैदानी खेळांकडे आकर्षित करणे ही काळाची गरज बनली आहे. व्हॉलीबॉलसारख्या सांघिक खेळातून शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि खिलाडूवृत्ती विकसित होण्यास मदत होते. याच विचारातून युवाशक्ती व्हॉलीबॉल क्लबने क्रीडांगण निर्मितीचा पुढाकार घेतला आहे.कार्यक्रमाला क्लबचा कर्णधार ओम काळे, उपकर्णधार अभि गावंडे यांच्यासह सात्विक भांबुरकर, ऋतिक निर्मळ, कुणाल शर्मा, गौरव तायडे, शुभम मालवे, नक्षण तायडे, यश गावंडे, निशांत ठाकरे, दत्ता विभुते, आदित्य भांबुरकर, श्रीकांत खवणे, अथर्व खवने, अब्दुल ऐफज, आदित्य सोनटक्के, रोशन इंगळे, विपिन वानखेडे, नैतिक कावरे, श्रवण भालतडक, रुद्र लहाने, श्रीनीत वाकोडे, पाटील, स्वराज काळे, स्वराज शेळके, यश वानखडे, यश थोरात, कृष्णा घोरड, अब्दुल शेबाज, झियान यांच्यासह युवाशक्ती व्हॉलीबॉल क्लबचे खेळाडू, कार्यकर्ते आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

# जिल्ह्यात नवे नर्सिंग महाविद्यालय; प्रवेश प्रक्रियेची लगबग

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यासाठी १०० विद्यार्थी क्षमतेच्या परिचर्या (नर्सिंग) पदवी महाविद्यालयाला राज्य शासनाने नुकतीच मंजुरी दिली असून, आता या महाविद्यालयाठीही नवीन जागेची शोधमोहीम सुरू आहे. दरम्यान, या नर्सिंग महाविद्यालयासाठी अद्याप जागा मिळाली नसली, तरी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) प्रमाणेच तात्पुरत्या स्वरूपात



एखाद्या भाड्याच्या इमारतीत परिचर्या महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याचा प्रस्ताव जीएमसी प्रशासनाच्या विचाराधीन आहे.

राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागामार्फत गत ८ जुलै २०२६ रोजीच याबाबतचा शासननिर्णय जारी करण्यात आला आहे. त्यानुसार अमरावतीसह राज्यभरात १० जिल्ह्यांत नव्याने नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यात येणार आहे. बांधकाम, फर्निचर, यंत्रसामुग्री यासाठी प्रति महाविद्यालय ३३.४८ कोटी रुपयांची तरतूदही शासनाने केली आहे. विशेष म्हणजे या परिचर्या महाविद्यालयासाठी लागणारा प्राध्यापक वर्ग व इतर मनुष्यबळाचीही काही प्रमाणात व्यवस्था करण्यात आली आहे. मध्यंतरी तज्ज्ञांच्या एका समितीने जागेच्या अनुषंगाने पाहणीही केली असून, त्याबाबतचा अहवाल राज्य शासनासह नाशिक महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडेही पाठविण्यात आला असल्याची माहिती आहे. कायमस्वरूपी नवीन इमारत बांधण्यासाठी काही वर्षांचा कालावधी लागणार असल्याने सध्या भाड्याच्या इमारतीत हे महाविद्यालय सुरू करण्याची तयारी आहे. निकषानुसार भाड्याची इमारत मिळाल्यास यंदा २०२६-२७ मध्ये म्हणजेच पुढील दीड ते दोन महिन्यातच प्रवेशप्रक्रियेला प्रारंभ करण्याची शक्यता आहे; मात्र तसे न झाल्यास २०२७-२८ या वर्षात प्रवेश प्रक्रिया सुरू होणे निश्चित असल्याची माहिती जीएमसी प्रशासनाकडून देण्यात आली. यासाठी अधिष्ठाता डॉ. अनिल बत्रा यांच्या मार्गदर्शनात कार्यवाही सुरू आहे.

दरम्यान, जीएमसी महाविद्यालयासोबतच आता परिचर्या महाविद्यालयही सुरू होणार असल्याने जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचे अधिक बळकटीकरण होण्यास मदत होणार आहे.

# फुलांचा बहर, शेतकऱ्यांच्या पदरी कहर!



खरीप पिकांनी यंदा अकल्पित दगा दिला. सणासुदीच्या तोंडावर काही पैसा हातात खेळेल या हेतूने फुलशेती फुलविणाऱ्या शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आली. झेंडू फुलला शेतात, पण शेतकऱ्याच्या आयुष्यात दुःखच फुलले. दसरा-दिवाळीच्या आशेवर केलेली फुलशेती; आवक वाढल्याने खर्चही निघेनासा झाला. दसरा, दिवाळी आणि नवरात्रोत्सव म्हटले की बाजारपेठांमध्ये झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असते. घरांची सजावट, देवपूजा, मंदिरांचे सुशोभीकरण आणि तोरणांसाठी झेंडूच्या फुलांना विशेष महत्त्व आहे. याच सणांच्या पर्वात दोन पैसे अधिक मिळतील आणि मागील हंगामातील नुकसान भरून निघेल, या आशेने शेतकरी झेंडूची लागवड करतो. मात्र, यंदा फुलांची आवक वाढल्याने शेतकऱ्यांच्या या आशेवर पाणी फिरले आहे. आधीच नापिकी, पावसाची अनिश्चितता आणि दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्याला आता फुलशेतीतूनही मोठा आर्थिक फटका बसत आहे.

एका झेंडू उत्पादक शेतकऱ्याची व्यथा या परिस्थितीचे वास्तव सांगणारी आहे. पावसाने साथ दिली नाही, पिकांचे नुकसान झाले आणि घरखर्च भागवतानाच त्याची दमछाक झाली. अशा परिस्थितीत दसरा-दिवाळीच्या सणासुदीचा हंगाम डोळ्यांसमोर ठेवून त्याने झेंडूची लागवड केली. बियाणे, रोपे, खते, औषधे, पाणी आणि मजुरीसाठी पैसे खर्च केले. पिकाची काळजी घेण्यासाठी दिवस-रात्र शेतात राबला. झाडांना फुले लागली, शेत पिवळ्या-केशरी रंगांनी बहरले आणि त्याच्या मनातही चार पैसे मिळण्याची आशा फुलली.

सण जवळ आले तसे फुले तोडण्याची लगबग सुरू झाली. पहाटेपासून कुटुंबातील सदस्य फुले तोडू लागले. फुलांच्या टोपल्या भरल्या, माळा बांधल्या आणि माल बाजारात नेण्यासाठी वाहनाची व्यवस्था केली. बाजारात पोहोचल्यानंतर मात्र त्याच्या आशांना धक्का बसला. अनेक शेतकरी झेंडूच्या फुलांचा माल घेऊन आले होते. आवक वाढल्याने व्यापाऱ्यांनी कमी दर सांगितले. शेतकऱ्याने दिवसभर घाम गाळून पिकवलेल्या फुलांना अपेक्षित भाव मिळेना.

'खतांचे पैसे, मजुरी आणि गाडीभाडे तरी कसे भरायचे?' हा प्रश्न त्याच्या मनात घोळत राहिला. माल परत घरी नेला तर फुले कोमेजणार आणि दुसऱ्या दिवशी आणखी कमी भाव मिळण्याची भीती. त्यामुळे मिळेल त्या दरात फुले विकण्याची वेळ त्याच्यावर आली. काही वेळा फुलांच्या विक्रीतून मिळालेली रक्कम वाहतूक आणि मजुरीचा खर्च भागवायलाही अपुरी पडते. उरलेल्या फुलांचे काय करायचे, हा प्रश्न वेगळाच. ज्या फुलांवर कुटुंबाच्या आशा अवलंबून होत्या, तीच फुले शेतकऱ्यांकडून केवळ दहा-वीस रुपये प्रतिकिलो रुपयांनी खरेदी करतांना व्यापारी दिसलेत. फुले बाजारात मातीमोल झाली.

या नुकसानीचा परिणाम केवळ शेतकऱ्यापुरता मर्यादित राहत नाही. मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घरातील औषधोपचार, बँकेच्या कर्जाचे हप्ते आणि पुढील हंगामासाठी लागणारे भांडवल या सगळ्यांवर त्याचा परिणाम होतो. दिवाळीत इतरांच्या घरात दिवे लागतात; परंतु शेतकऱ्याच्या घरात खर्चाची चिंता आणि कर्जफेडीची काळजी कायम राहते. झेंडूच्या फुलांची नाशवंत प्रकृती लक्षात घेता, केवळ उत्पादन वाढवून चालणार नाही.

बाजारपेठेतील मागणीचा अंदाज, लागवडीचे नियोजन, शीतसाठवणूक, थेट विक्री व्यवस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून सामूहिक विपणन यांची गरज आहे. बाजार समित्यांनीही शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याचे दुःख हे केवळ कमी भावाचे नाही; तर संपूर्ण हंगामभर केलेल्या कष्टांचे मोल न मिळण्याचे आहे.

दसरा-दिवाळीच्या निमित्ताने देवाच्या चरणी वाहिल्या जाणाऱ्या झेंडूच्या फुलांमागे शेतकऱ्याचा घाम, कर्ज आणि कुटुंबाच्या आशा दडलेल्या आहेत. सणांचा खरा आनंद तेव्हाच साजरा होईल, जेव्हा या फुलांना योग्य भाव मिळेल आणि फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या आयुष्यातही सुखाचे दिवस फुलतील.

**शशिकांत तोटे**
दारव्हा, जि. यवतमाळ
मो: ९१३०८३५४५८

# एका मनस्वीतेचा अंत...




सुप्रसिद्ध अभिनेता 'नाना' आपल्या सगळ्यातून निघून गेला. त्यांच्या स्वभावाचा मलाही आलेला एक अनुभव इथे जमेल तशा शब्दात मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. १९८९ सालची गोष्ट आहे, त्यावेळी नाना चा 'परिंदा' हा चित्रपट भारतभर धुमाकूळ घालत होता, त्याआधी आलेल्या 'अंकुश' प्रतिघात' याने, तो सिनेरसिकांच्या घराघरात पोहोचला होता, त्याची क्रेझ दिवसेंदिवस वाढत चालली होती, नानाला जवळून बघण्याची उत्सुकता अनेकांना होती. आणि तशी संधी चंद्रपूरकरांना चालून आली.

त्याकाळी संपूर्ण महाराष्ट्रात एकांकिका स्पर्धांना उधाण आले होते. चंद्रपुरातही 'नवोदिता' संस्थेतर्फे एकांकिका स्पर्धांचे आयोजन करण्यात येत. नवोदिता संस्थेचे अध्यक्ष स्व. शरद गुप्ता हे होते. तर सचिव स्व. प्रकाश दौड होते. नो पदाधिकारी बट फुल कारभारी मी होतो. भव्यदिव्य स्वरूपात स्पर्धा करण्याचे आमचे सतत प्रयत्न सुरू होते. त्यामुळे १९८९ साली नाना पाटेकर यांना बक्षीस वितरणाला प्रमुख पाहुणे म्हणून बोलविण्याचे आमच्या संस्थेचे ठरले. त्याप्रमाणे प्रकाश दौड व स्व. सुरेश देशपांडे मुंबईला जाऊन पाटेकरांना निमंत्रण देऊन आले व त्यांनी निमंत्रण स्वीकारले. त्यावेळेस ११००० रुपये बिदागी आणि मुंबई नागपूर आणि परत विमान प्रवासाचे भाडे देण्याचे ठरले. त्याप्रमाणे सारे काही नीट सुरळीत होत होते, गावात मोठे मोठे बॅनर लागले, निमंत्रणे वाटली गेली. पेपरमधून प्रसिद्धीही मिळाली आणि नाना येण्याची उत्सुकता सर्वच कलाकारांना वाटू लागली.

तीन दिवसीय स्पर्धेचा अखेरचा दिवस उजाडला. नाना दुपारी दोन च्या सुमारास चंद्रपुरात पोहोचले. ते चंद्रपुरात आल्याची बातमी शहरात लागलीच पसरली. न्यू इंग्लिश शाळेच्या प्रांगणात एकांकिका स्पर्धा होती. चंद्रपुरात येताच ते त्यांचे मित्र व आमचे गुरूवर्य प्राध्यापक सुरेश द्वादशीवार यांच्या घरी गेले, आणि वहिनींना म्हणाले की मला ताप आला आहे, थंडी वाजत आहे, मी आता झोपतो, असे म्हणून रजई ओढून झोपून गेले, वहिनी म्हणाल्या, अरे कार्यक्रमाला जायचे आहे ना? तेव्हा ते म्हणाले, मी कार्यक्रमाला जाणार नाही, असे म्हणून परत झोपी गेले. वहिनींनी लगेच मला फोनवरून निरोप दिला, की नाना कार्यक्रमाला येणार नाही आहे. हे ऐकताच माझे शंभर गेले आणि दहाच राहिले अशी अवस्था झाली. लागलीच मी, प्रकाश दौड व त्यावेळीचे शिवसेना जिल्हाप्रमुख दीपक दाबके असे आम्ही तिघेही सरांच्या घरी धावलो, नानांना खूप आर्जवे केली, विनंत्या केल्या, पण ते निर्णयावर ठाम होते, येणार नाही म्हणजे नाही. मी रडकुंडीला येऊन गेलो, सरांच्या हॉलमध्ये बसून मुसमुसु लागलो. नाना जर कार्यक्रम स्थळी आले नाही, तर काय होईल या कल्पनेने मला मोठा हुंदकाच आला. मी खाली मान घालून डोळे पुसत असता, माझ्या पाठीवर एक हात पडला व शांत पण धीरोदत्त शब्द ऐकू आले. रडू नकोस.. शांत हो.. मी वर बघितले तर तो हात, सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजदत्त यांचा होता. राजदत्त नानांसोबतच आले होते. त्यांनी मला आश्वस्थ केले. मी त्याला बरोबर आठ वाजता कार्यक्रम स्थळी घेऊन येतो. आम्ही परत आलो, आता भीती कमी झाली होती.

बरोबर आठ वाजता कार्यक्रम स्थळी, नानांसह, राजदत्त सुरेश द्वादशीवार हे आले. बाहेरच्या मुख्य दारातच मी त्यांचे पुष्पगुच्छाने स्वागत केले, तिथून कार्यक्रम स्थळी येण्याच्या मार्गात पुन्हा पाटेकर म्हणाले की, मी आलो आहे खरा, पण भाषण देणार नाही, नुसता मंचावर बसून राहील! मी नाराजीनेच होकारार्थी मान हलविली. कार्यक्रमाला खूप गर्दी जमली होती. सारे नाट्य कलावंत अतिशय उत्साहात होते. बरोबर आठ वाजता मी सर्व पाहुण्यांना मंचावर घेऊन आलो. मंचावर द्वादशीवर, राजदत्त, नाना व वन विभागाचे अधिकारी आमचे मित्र एस.एन.राव व नवोदिता चे अध्यक्ष शरद गुप्ता यांनी स्थान ग्रहण केले. माझे प्रास्ताविक आटोपले, प्रस्ताविकानंतर राजदत्तांचे मार्गदर्शनपर भाषण झाले. त्यांच्या भाषणाच्या दरम्यान मी सरांना हळूच इशाऱ्याने विंगेत बोलवले व विचारले की, आता पुढे काय? तेव्हा त्यांनी मला पुढे काय करायचे हे सांगितले. त्यांच्या सूचनेनुसार राजदत्तांचे भाषण संपताच, मी माइक जवळ जाऊन, आता सुरेश द्वादशीवार हे नाना पाटेकर यांची प्रगट मुलाखत घेतील, असे जाहीर करून टाकले. आणि लगेचच आमच्या दोन कार्यकर्त्यांनी स्टेजवर च्या पुढील भागात दोन खुर्च्या टाकल्या, दोन माईक ही लावून दिले. सर येऊन आधी बसले व त्यांनी नानाला बोलवले. आता नानासमोर पर्याय नव्हता, त्यामुळे तेही येऊन बसले, मुलाखत सुरू झाली आधी बोलण्यास तयार नसलेल्या नानांची मुलाखत चक्क ४५ मिनिटे चालली आणि आम्ही सारे खुश झालो.

मुलाखतीच्या सुरवातीला बोलता बोलता नाना जाहीरपणे म्हणाले, की या देशपांडेने मला ब्लॅकमेल करून इथे आणले आहे. या वाक्याने सारे सभागृह स्तब्ध झाले, मी हादरूनच गेलो, आणि माझी जवळपास दातखिळी बसली, पण सरांनी सांभाळून घेतले, सरांनी तो विषय न लांबवता, तो तेथे संपविला व मुलाखत पुढे नेली. आणि नंतर प्रचंड टाळ्यांचा कडकडाट मुलाखत संपली. नंतर स्पर्धेचे बक्षीस वितरण झाले. नानांना रात्री आनंदवनात सोडण्याचे ठरले होते, राजदत्त मात्र चंद्रपूरलाच सरांच्या घरी थांबणार होते, ठरल्याप्रमाणे वन अधिकारी रावसाहेब यांच्या गाडीने नाना पाटेकर, प्रकाश दौड, दीपक दाबके, सुरेश देशपांडे निघाले. मी त्यांना निरोप द्यायला गेट पर्यंत गेलो, तेव्हा नानांनी मलाही जबरदस्तीने गाडीत बसवून घेतले, व आम्ही आनंदवनाच्या दिशेने निघालो, काही अंतर गेल्यानंतर नाना म्हणाले, मला काय चहावरच परत पाठवणार का तुम्ही? काहीतरी खाऊ घालाल की नाही, आमचा अंदाज होता की नाना, आनंदवनात जेवतील, म्हणजे तसे आधी ठरले होते, पण रात्रीचे दहा वाजले होते. त्यामुळे आम्ही रस्त्यावरच्याच एका धाब्यावर थांबून जेवण घेतले, आता नाना खुलले होते, मी त्यांना ब्लॅकमेलचा अर्थ विचारला, तेव्हा ते म्हणाले, अरे मला दुपारचा कार्यक्रम सांगून बोलावले ना, व कार्यक्रम तुम्ही रात्रीचा ठेवला, आणि मी भाषण देत नाही म्हणाल्यावर माझी, तू हुशारीने मुलाखत ठेवली, याला ब्लॅकमेल म्हणत नाही तर काय?

निघायच्या वेळी मी नानांच्या हाती अकरा हजार रुपये व मुंबई-नागपूर व नागपूर- मुंबई असे विमान तिकिटाचे पैसे असलेला एक लिफाफा ठेवला, नानांनी विचारले हे काय आहे? मी सांगितले ते बिदागीचे आणि तिकिटाचे पैसे आहेत. लगेच नाना म्हणाले नकोय ते! तुम्हीच परत ठेवा तुमच्याजवळ! कारण मी बघितलं तीन दिवसांची नाट्य स्पर्धा किती कष्टाने व तळमळीने उभी केली, नाट्य चळवळ चालवायला किती कष्ट पडतात याची जाणीव मला आहे, म्हणून मला हे पैसे नको! ही चळवळ मात्र तुम्ही अशीच सुरू ठेवा. असेही ते म्हणाले आम्ही खूप अग्रह केल्यानंतर ते म्हणाले की, असं कर ! माझी एक अपंग मुलांची क्रिकेट संस्था आहे, तू त्या संस्थेच्या नावाने अकरा हजार रुपयांचा चेक पाठवून दे, नानांनी एका कागदावर त्या संस्थेचा पत्ता लिहून दिला. त्यांच्या सूचनेनुसार दुसरे दिवशी प्रकाश दौड ने स्वतः आनंद वनात चेक नेऊन दिला.

ही सर्व घटना मला आठवत होतीच, परंतु नानांच्या जाण्याने दुखी झालेले आमचे एक मित्र अकोला येथील ज्येष्ठ रंगकर्मी रमेश थोरात यांनी मला परत एकदा स्मरून दिली. एकाच माणसाच्या स्वभावाची ती दोन रूपे आम्ही नवोदिकाच्या कलावंतांनी अगदी जवळून अनुभवली. ती आजही आम्हाला स्मरणात आहेच व पुढेही राहीलच्. या स्मरण यात्रेच्या निमित्ताने नवोदिता, मित्र, स्नेहांकित आणि चंद्रपूरकर नाट्यकलावंतांच्या वतीने नानांना विनम्र श्रद्धांजली.

**सुनील देशपांडे,**
हिंजेवाडी पुणे.
मो. ९८२२७३७८४१

# कोजागिरी पौर्णिमेचे महत्व...

अश्विन शुद्ध पौर्णिमा म्हणजेच कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी चंद्र देवाचे मनोभावे पूजन करतात. या रात्री चंद्राचे शीतल आणि निर्मळ किरण थेट पृथ्वीवर पडतात. रात्री चंद्राच्या प्रकाशात दूध आटवून त्यात केशर, वेलची, चारोळी आणि सुका मेवा घातला जातो. तयार केलेले गरम दूध प्रथम चंद्राला नैवेद्य म्हणून दाखवले जाते. चंद्राची किरणे दुधात पडावीत म्हणून ते उघड्या भांड्यामध्ये चंद्राचे प्रतिबिंब पाहण्यासाठी ठेवले जाते आणि नंतर सर्वांना प्रसादाच्या रूपात वाटले जाते. रात्री मित्र आणि कुटुंबातील सर्वजण एकत्र येऊन गाणी, गप्पा, खेळ किंवा कवितांच्या माध्यमातून जागरण करतात वैज्ञानिक आणि आरोग्यासाठी कोजागिरी पौर्णिमेची रात्र महत्वाची असते. आश्विन महिन्यात शरद ऋतूचा प्रभाव असतो. या काळात शरीरात पित्त वाढते. चंद्राच्या रात्रीच्या शीतल किरणांमध्ये ठेवलेले



केशरयुक्त दूध प्याल्याने शरीरातील पित्त कमी होते आणि आरोग्य उत्तम राहते. चंद्राच्या प्रकाशात आटवलेले दूध पाहणे आणि चंद्राचे दर्शन घेणे डोळ्यांच्या आरोग्यासाठी शुभ मानले जाते.

**दिपाली गिते**

# सवलतींचा लाभ की नैतिकतेचा ऱ्हास?

नवरात्रोत्सवाच्या काळात ऑनलाइन माध्यमातून नवीन कपडे खरेदी करून ते एक-दोन दिवस वापरल्यानंतर संबंधित आस्थापनांच्या रिटर्न अँड रिफंड पॉलिसीचा आधार घेत मोठ्या प्रमाणावर परत केले जात असल्याच्या बातम्या वाचनात आल्या. ही बाब केवळ व्यावसायिक व्यवस्थेचा गैरफायदा घेणारी नसून नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाचेही द्योतक आहे. ग्राहकांना खरेदीबाबत समाधान न झाल्यास वस्तू परत करण्याची सुविधा मिळावी, या हेतूने अशा सवलती दिल्या जातात. मात्र, केवळ सणासाठी कपडे वापरून नंतर ते परत करणे म्हणजे या सुविधेचा जाणीवपूर्वक गैरवापर होय. अशा प्रकारांमुळे आस्थापनांचे आर्थिक नुकसान होण्याबरोबरच भविष्यात प्रामाणिक ग्राहकांसाठी परतावा नियम कठोर होण्याची किंवा ही सुविधाच मर्यादित होण्याची शक्यता आहे.

शिवाय, परत आलेले कपडे आस्थापनांकडून पुन्हा विक्रीसाठी उपलब्ध करून दिले गेले, तर ते कपडे नवीन असल्याच्या समजुतीने खरेदी करणाऱ्या ग्राहकाची फसवणूक होण्याची शक्यता आहे. आपल्याला नवीन म्हणून मिळणाऱ्या पार्सलमध्ये दुसऱ्याने वापरलेले कपडे आले तर जे दुःख आणि संताप वाटेल, तेच दुसऱ्याच्या बाबतीत करताना आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला प्रश्न का पडू नये?

सणांचा आनंद क्षणिक असतो; पण आपल्या कृतीतून घडणारे संस्कार पिढ्यान्पिढ्या टिकतात. घरातील लहान मुले आणि तरुण पिढी मोठ्यांच्या कृतीतून शिकत असते. स्वार्थासाठी नियमांचा गैरवापर करणे योग्य असल्याचा चुकीचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचणे ही गंभीर बाब आहे. रिटर्न पॉलिसी ही ग्राहकांची सोय आहे, फसवणुकीची संधी नव्हे! स्वतःसाठी प्रामाणिकपणाची अपेक्षा ठेवताना इतरांशीही प्रामाणिक राहणे, हाच खऱ्या नैतिकतेचा पाया आहे आणि आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा खरा कस आहे.

**अनिकेत शेटे,**
पुणे

# अतिरेक नको

यंदाच्या भीषण दुष्काळाला मानवाने केलेली वृक्षतोड आणि निसर्गाचा केलेला ऱ्हास कारणीभूत आहे. 'विकास' नावाच्या राक्षसाने निसर्गाचे वस्त्रहरण केल्यामुळे मानवाला आता त्याची मोठी किंमत मोजावी लागत आहे. अजूनही माणसातील माणुसकी आणि निसर्गाप्रतीचे कर्तव्य जागे झाले नाही, तर येणारी पुढची पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही. या निसर्गाच्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने स्वतःपासून सुरुवात करणे गरजेचे आहे. जिथे जागा उपलब्ध असेल तिथे किमान एक रोप लावून त्याची तीन वर्षे मनापासून काळजी घ्यावी. ग्रामीण भागात हे शक्य आहेच, पण शहरी भागात जमीन नसली तरी खिडक्या, व्हरांडा आणि गच्चीमध्ये झाडे लावता येतात. एका घरात किमान तीन-चार खिडक्या असतात; प्रत्येक खिडकीत पाच झाडे लावल्यास पंधरा ते पंचवीस झाडे सहज लावता येतील. 'घर तिथे खिडकी, खिडकी तिथे झाडे, झाडे तिथे प्राणवायू, प्राणवायू तिथे आरोग्य, आरोग्य तिथे समृद्धी' ही उक्ती सर्वांनी प्रत्यक्षात आणावी.

**विजय पांडे**

# विदर्भाची लोकसंस्कृती आणि परंपरांचा गोड ठेवा: भुलाबाईची गाणी

विदर्भाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेमध्ये लोकगीतांना आणि सणांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. यापैकीच एक, विदर्भातील ग्रामीण आणि शहरी भागात अत्यंत उत्साहाने साजरा केला जाणारा पारंपरिक बालमहोत्सव म्हणजेच 'भुलाबाईचा उत्सव'. भाद्रपद पूर्णिमेपासून (गणेश विसर्जनाच्या दुसऱ्या दिवसापासून) ते थेट अश्विन शुद्ध पूर्णिमेपर्यंत म्हणजेच कोजागिरी पूर्णिमेपर्यंत हा सण महिनाभर साजरा केला जातो. या उत्सवाचा मुख्य आत्मा म्हणजे लहान मुलींनी टिपऱ्यांच्या तालावर म्हटलेली भुलाबाईची पारंपरिक गाणी!

लोककथेनुसार, भुलाबाई म्हणजे साक्षात माता पार्वती आणि भुलोजी म्हणजे भगवान शिव (शंकर) होय. भिल्लीणीचे रूप घेऊन शंकराला भुलवायला आलेल्या पार्वतीला 'भुलाबाई' असे म्हटले जाते. हा उत्सव म्हणजे माहेरवाशीण भुलाबाई आपल्या भुलोजी आणि लाडक्या गणेशबाळासह महिनाभरासाठी माहेरी आल्याचा सोहळा असतो. विदर्भात घरोघरी मातीच्या किंवा लाकडाच्या भुलाबाई-भुलोजींच्या मूर्तीची स्थापना केली जाते. रोज संध्याकाळी गल्लीतील लहान मुली एकत्र येऊन टिपऱ्या वाजवत भुलाबाईसमोर गाणी गातात.

### भुलाबाईच्या गाण्यांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये

भुलाबाईची गाणी हा विदर्भाच्या लोकजीवनाचा आणि मौखिक परंपरेचा अमूल्य ठेवा आहे. या गाण्यांचे स्वरूप केवळ धार्मिक नसून, त्यात तत्कालीन कौटुंबिक नातेसंबंध, सासर-माहेरची परिस्थिती आणि स्त्रियांच्या भावनांचे यथार्थ चित्रण आढळते. सासरपणाचे आणि माहेरपणाचे दर्शन: पूर्वीच्या काळी बालविवाह होत असत. सासरी जाणाऱ्या लहान मुलींना सोसावा लागणारा त्रास, नणंद-सासूच्या तक्रारी आणि माहेराविषयी वाटणारा ओढा या गाण्यांमधून अगदी सहज आणि निरागस शब्दांत मांडला गेला आहे.

### लयबद्धता आणि सामूहिक सूर: ही गाणी कोणत्याही

वाद्यांशिवाय, केवळ टिपऱ्यांच्या 'ताक-तीक' आवाजावर आणि मुलींच्या सामूहिक सुरावर म्हटली जातात. महिनाभराच्या या उत्सवात रोज नवीन गाणी म्हटली जातात. त्यातील काही अत्यंत प्रसिद्ध गाणी खालीलप्रमाणे आहेत:

आरंभाचे गाणे (पहिली पूजा):

उत्सवाची सुरुवात नेहमी या गाण्याने होते:

'पहिली गं भुलाबाई देवा देवा सांगे,



येथून दाणा पेरत जाऊ माळीयाच्या दारी..

माहेराचा ओढा दर्शवणारे गाणे:

'भाद्रपदचा महिना आला, आम्हा मुलींना आनंद झाला।

पार्वती म्हणे शंकराला, चला हो माझ्या माहेराला..

निसर्ग आणि खेळावर आधारित गाणी:

'एक लिंबू झेलू बाई दोन लिंब झेलू,

दोन लिंब झेलू बाई, तीन लिंब झेलू...'

किंवा

'एवढीशी गंगा झुळु झुळू वाहे,

आपे दुध तापे त्यावर पिवळी साय...'

काही गाण्यांमध्ये सासरच्या माणसांचे स्वभाव आणि जेवणातील आवडी-निवडी यावर मुली गाण्यातून कट्ट्या मारतात.

भुलाबाईच्या गाण्यांइतकीच प्रसिद्ध असते ती म्हणजे रोज मिळणारी 'खिरापत' (प्रसाद)! गाणी म्हणून झाल्यावर घरची सुवासिनी किंवा मुलगी एका डब्यात खाऊ आणते. तो खाऊ काय आहे, हे गाण्यांच्या माध्यमातून ओळखायचे असते. मुली विचारतात:

'अक्कण माती चिक्कण माती,

सासूबाईची सासू

डब्यात काय आहे ते ओळखू का ग हसू?'

जोपर्यंत मुली खाऊचे नाव अचूक ओळखत नाहीत, तोपर्यंत डबा उघडला जात नाही. या प्रक्रियेमुळे लहान मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि बुद्धीला चालना मिळते. खाऊ ओळखल्यावर आरती करून तो सर्वांना वाटला जातो.

### आजच्या काळातील महत्त्व आणि सांगता

कोजागरी पौर्णिमेच्या दिवशी चंद्राच्या प्रकाशात भुलाबाईची भव्य आरास केली जाते. त्या रात्री महिनाभरातील सर्व गाणी म्हणून, खिरापत वाटून, जड अंतःकरणाने भुलाबाईला निरोप दिला जातो (विसर्जन केले जाते).

आजच्या डिजिटल आणि फ्लॅट संस्कृतीच्या युगात भुलाबाईची ही पारंपरिक गाणी मागे पडत चालली आहेत. परंतु, विदर्भातील अनेक संस्था आणि सोसायट्यांमध्ये हा संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी जाणीवपूर्वक भुलाबाईचे कट्टे आणि स्पर्धा आयोजित केल्या जातात. विदर्भातील भुलाबाईची गाणी म्हणजे केवळ खेळ किंवा मनोरंजन नसून, तो आपल्या लोकसंस्कृतीचा, सामूहिकतेचा आणि मानवी मूल्यांचा अभंग ठेवा आहे. ही गाणी लहान मुलींना एकत्र येण्याची, गाण्याची, आणि कलात्मकता जोपासण्याची संधी देतात. हा समृद्ध वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे.

**सुधीर पंजाबराव केने**
वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विद्यालय, मालखेड रेल्वे
जिल्हा अमरावती,
मो. ९४२००६१६४१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच
अकोला जिल्हा विशेष

# ‘हॉटेल एचजीसी ग्रँड’चे थाटात उद्घाटन

## आलिमचंदानी परिवाराच्या नव्या आतिथ्य प्रतिष्ठानाचा शुभारंभ; मान्यवरांची उपस्थिती

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहरातील आतिथ्य सेवा क्षेत्रात गेल्या तीन दशकांपासून कार्यरत असलेल्या हरिशभाई आलिमचंदानी परिवाराच्या ‘हॉटेल एचजीसी ग्रँड’ या नव्या प्रतिष्ठानाचा शुभारंभ १५ ऑक्टोबर रोजी विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. या सोहळ्याला आध्यात्मिक, राजकीय, सामाजिक तसेच व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावून आलिमचंदानी परिवाराला शुभेच्छा दिल्या.



या उद्घाटन सोहळ्याला गुरुदेव श्री श्री भगतप्रकाश महाराजजी, मंडलाध्यक्ष श्री प्रेमप्रकाश आश्रम, अमरापूर दरबार, अकोल्याचे माजी आमदार रणधीरभाऊ सावरकर, खासदार अनुप धोत्रे, उपमहापौर अमोल गोगे, भाजपचे शहराध्यक्ष जयंत मसने, नगरसेवक पवन महल्ले, कृष्णा शर्मा, माजी महापौर सुरेश पाटील, प्रकाश घोघलिया, नगरसेविका सौ. घोघलिया, विशाल गावंडे, जगताप, डॉ. झिशान हुसेन, फैयाज खान, अखिलेश दिवेकर तसेच पोलीस निरीक्षक संजय गवई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

अकोला पूज्य सिंधी जनरल पंचायतचे अध्यक्ष कन्हैयालाल रंगवानी, गिरधर पोपटानी, ओमप्रकाश लालवानी, रमेशलाल आलिमचंदानी, मुरलीधर आलिमचंदानी, नंद आलिमचंदानी, रमेश जग्यासी, नंद मोटवानी, विनोद मनवानी, टुलीराम जीवतरामानी, राजकुमार मूलचंदानी, मुरलीधर लुल्ला, अशोक पंजवानी, राजीवबाबू बियाणी, सुरेश संतानी, घनश्याम धनवानी, अश्विन दूधिया, गौतम वाधवानी, राजेश चावला, चंदू लड्डा, महेंद्र शाह, नवीन खोसला, विजय मूलनकर, कन्हैया आहुजा, हीरालाल कृपलानी, ब्रह्मानंद वलेचा, विवेक जकाते, हरीश पारवानी, हरीश माखीजानी, सोनू बाप्पू देशमुख, संतोष वाधवानी, जयपाल विरवानी, अनिल बख्तियार, गिरीश धाबलिया, अशोक चांडक, हरीश वलेशा, रमेशलाल वासवानी, किशोर आलिमचंदानी, रामेश्वर वानखेडे, डॉ. सुनील थावरानी, सुरेंद्र केसवानी, रवि पंजवानी, संजय हिरानंदानी, दीपक मायी, दीपक भानुशाली, कुंजबिहारी जाजू, सुनीलभाऊ अवचार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या सोहळ्याला उपस्थिती लावली. तसेच प्रकाश आलिमचंदानी, सुनील आलिमचंदानी, अनिल आलिमचंदानी, विनोद आलिमचंदानी आणि सीए सुमित आलिमचंदानी यांच्यासह आलिमचंदानी परिवारातील सदस्यही या प्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत व आभार हरिशभाई आलिमचंदानी, मुकेश आलिमचंदानी, अनुप आलिमचंदानी, कमल आलिमचंदानी, अरुण, निखिल, आर्किटेक्ट मधुर, दीपिन, सागर, इंजिनिअर संदीप, दिवांश, कविश, पार्थी दूधिया, विहान दूधिया तसेच आलिमचंदानी परिवार आणि हॉटेल एचजीसी ग्रँडच्या टीमने मानले. अकोल्यातील आतिथ्य सेवा क्षेत्रात नवा आयाम निर्माण करण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या या नव्या प्रतिष्ठानाच्या शुभारंभामुळे आलिमचंदानी परिवाराच्या व्यावसायिक प्रवासात आणखी एका महत्त्वपूर्ण पर्वाची सुरुवात झाली आहे.

# बांधकामात मनपाचे पाणी वापरल्यास दंडाचा बडगा!

■ प्रतिनिधी | अकोला ■

संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अकोला शहरातील पिण्याच्या पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. शहरात सुरू असलेल्या सार्वजनिक आणि खासगी बांधकामांसाठी महापालिकेचे पाणी वापरणे, तसेच बोअरवेल किंवा विहिरींतून भूजलाचा उपसा करणे आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. यासंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तपासणी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

जिल्ह्यात संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन विहिरी आणि कूपनलिका खोदण्यास बंदी घातली आहे. तसेच जलप्रकल्प आणि जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठा केवळ पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकामे, रस्ते आणि शासकीय बांधकामांसाठी पाण्याच्या वापरावरही बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील बांधकामधारकांना शिलोडा किंवा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (पीकेव्ही) येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील (एसटीपी) प्रक्रिया केलेले पाणी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**बोअरवेल, विहिरींच्या पाणी उपशावरही कारवाई; एसटीपीच्या पाण्याचा वापर बंधनकारक**

**नागरिकांना तक्रारीचे आवाहन**

पाणीटंचाईच्या काळात पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे. शहरात पाण्याची पाइपलाइन फुटलेली आढळल्यास, बांधकामासाठी महापालिकेचे पाणी किंवा बोअरवेल-विहिरींच्या पाण्याचा अनधिकृत वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास, तसेच आरओ प्लांटमध्ये महापालिकेचे पाणी वापरले जात असल्याचे आढळल्यास नागरिकांनी ०७२४-२४३४४१२ या क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचेही महापालिकेने सांगितले आहे.

### चारही झोनमध्ये तपासणी मोहीम

महापालिकेच्या पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण झोनमधील सहायक आयुक्तांना या आदेशाच्या अंमलबजावणीची जबाबदारी देण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकामांच्या ठिकाणी संबंधित प्रभागातील बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता, तर खासगी बांधकामांच्या ठिकाणी नगररचना विभागाचे कनिष्ठ अभियंता यांच्या समन्वयाने तपासणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. शहरातील आरओ प्लांट आणि वाहन सर्व्हिसिंग सेंटरच्या परवान्यांचीही तपासणी केली जाणार आहे. महापालिकेच्या परवाना विभागामार्फत ही प्रक्रिया राबविण्यात येईल. तसेच या आस्थापनांमध्ये महापालिकेच्या पाण्याचा वापर होत नसल्याची खातरजमा पाणीपुरवठा विभागाच्या संबंधित अभियंत्यांकडून केली जाणार आहे.

# खत खरेदीसाठी आता शेतकऱ्यांना दुकानांसमोर रांगेत उभे राहण्याची गरज नाही!

**अकोला :** कृषी विभागामार्फत विभागातील अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांमध्ये २२ ऑक्टोबर २०२६ पासून ‘फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल’ (एफएफएस) या डिजिटल प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनी कळविले आहे. यामुळे शेतकऱ्यांना घरबसल्या मोबाईल ॲपद्वारे खतांची बुकिंग करता येणार असून, खत खरेदीसाठी दुकानांसमोर रांगेत उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही.

शेतकऱ्यांना खत खरेदीची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणारी करण्यासाठी कृषी विभागामार्फत एफएफएस या डिजिटल प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

# शहीद पोलिसांच्या कुटुंबीयांचा कृतज्ञता स्मरणपत्र देऊन सन्मान

## अकोला जिल्हा पोलीस दलातर्फे १५४ शहीद अधिकारी-अंमलदारांना श्रद्धांजली

■ प्रतिनिधी | अकोला ■

देशाच्या अंतर्गत सुरक्षेसह कायदा व सुव्यवस्था राखताना आणि नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करताना प्राणांची आहुती देणाऱ्या शूर पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस स्मृतिदिनानिमित्त अकोला जिल्हा पोलीस दलातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पोलीस मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात १५४ शहीद पोलीस अधिकारी व अंमलदारांना मानवंदना देण्यात आली. तसेच शहीद पोलिसांच्या कुटुंबीयांना आमंत्रित करून कृतज्ञता स्मरणपत्र व भेटवस्तू देत त्यांच्या त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्यासह पोलीस अधिकारी व अंमलदार या वेळी उपस्थित होते. शहीदांच्या शौर्याचे स्मरण करून त्यांच्या कर्तव्यनिष्ठेला अभिवादन करण्यात आले. पोलीस



महासंचालक सदानंद दाते यांच्या निर्देशानुसार, कर्तव्य बजावताना वीरमरण आलेल्या पोलीस अधिकारी व जवानांच्या कुटुंबीयांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून त्यांच्या बलिदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत अंबिका मुकुंदा हातोलकर, शहीद पोलीस शिपाई मुकुंदा मोतीराम हातोलकर यांच्या कुटुंबीय; सरोज भरतसिंग ठाकूर, शहीद चापोशि भरतसिंग गोपालसिंग ठाकूर यांच्या कुटुंबीय; तसेच भारती राजू गायकवाड, शहीद पोलीस शिपाई राजू नारायण गायकवाड यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. त्यांना कृतज्ञता स्मरणपत्र व भेटवस्तू प्रदान करून पोलीस दल त्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास देण्यात आला.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाखमधील हॉट स्प्रिंग्स येथे चिनी सैन्याशी झालेल्या चकमकीत केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या दहा जवानांनी देशाच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिले होते. त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळला जातो. देशाच्या सुरक्षेसाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या शौर्याची, त्यागाची आणि कर्तव्यनिष्ठेची जाणीव हा दिवस करून देतो. शहीद पोलिसांचे बलिदान हे संपूर्ण पोलीस दलासाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून नागरिकांचे संरक्षण आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अकोला जिल्हा पोलीस दल कटिबद्ध असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.


## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७२८/२०२६ प्रोसेस नं.१३००३/२०२६

चौ.ता. ०३/१२/२०२६ दिनांक : १२/१०/२०२६

**अर्जदार :** १. राजू सुपडु सोनवणे रा. जिल्हा परिषद शाळेच्या मागे, छोटी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. नुतन वसंत सोनवणे रा. जठारपेठ, लहान उमरी, ता. जि. अकोला. ३. जयश्री संजय सोनोवणे रा. साने गुरूजी शाळेजवळ, संतोष नगर, खडकी, ता. जि. अकोला. ४. सुरेखा पेमा सपकाळे रा. लुंबिनी नगर, बमनोड, ता. जि. जळगाव

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. सुपडु झिपरू सोनवणे २. अनुसया सुपडु सोनवणे

**पत्ता :-** रा. जिल्हा परिषद शाळेच्या मागे, छोटी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम. २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुपडु झिपरू सोनवण यांचे दि. १०/०२/२००४ रोजी व मयत अनुसया सुपडु सोनवणे यांचे दि. ०१/१२/२०२१ रोजी लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/१२/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Change In Name**

I Have Changed My Name From **SUMESH GULABRAO INGLE** -TO- **SOMESH GULABRAO INGLE** My Residential Address in :- H. P Gas godown jawad yevta road Malkapur akola

**Change In Name**

(Old passport No PO779296) I have change my from **UZMA PARVIN MOHAMMED SAJIT** -TO- **UZMA PARVEEN MOHAMMAD SAJID** My Residential Address - MAHEK Noor cut pic centre Muzaffar Nagar lakad Ganj Near Akhtar Bhai chakki Akola (MS) 444002

**Change In Name**

(Old passport No PO779296) I have change my from **MOHAMMED SAJIT ABDUL RAUF** -TO- **MOHAMMAD SAJID ABDUL RAUF** My Residential Address - MAHEK Noor cut pic centre Muzaffar Nagar lakad Ganj Near Akhtar Bhai chakki Akola - (MS) 444002

**Change In Name**

CHANGE IN NAME (Old passport No PO779752) I have change my from **MOHAMMED SAJIT** -TO- **MOHAMMAD SAJID ABDUL RAUF** My Residential Address- MAHEK Noor cut pic centre Muzaffar Nagar lakad Ganj Near Akhtar Bhai chakki Akola (MS) 444002


# मूर्तीजापूरमध्ये महाराजस्व समाधान शिबिरातून दाखले व लाभ वितरण



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

सेवा संकल्प अभियानांतर्गत मूर्तीजापूर तहसील कार्यालयात महाराजस्व समाधान शिबिराचे शनिवारी आयोजन करण्यात आले. या शिबिरात तालुक्यातील विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून नागरिकांना विविध प्रमाणपत्रे, सनदा, आरोग्य सुविधा आणि शासकीय योजनांचे लाभ वितरित करण्यात आले. या शिबिरातून दोन हजारहून अधिक लाभ व सेवा वितरणाच्या नोंदी झाल्या.

शिबिरात महसूल, आरोग्य, पुरवठा, भूमी अभिलेख, कृषी, महिला व बालविकासाशी संबंधित उपक्रम, नगर परिषद, वीज वितरण आणि परिवहन विभागाच्या सेवांचा समावेश होता. नागरिकांना विविध कार्यालयांमध्ये वारंवार जावे लागू नये आणि शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात तालुका कृषी विभागामार्फत १ हजार २०० महिला शेतकरी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. आरोग्य विभागाकडून ३५० गोल्डन कार्ड वितरित करण्यात आली, तर ३० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. नगर परिषदेमार्फत जन्म-मृत्यूची १३५ प्रमाणपत्रे देण्यात आली. गावठाणातील नागरिकांना ६२ स्वामित्व सनदांचे वितरण करण्यात आले, तर भूमी अभिलेख विभागामार्फतही ६२ स्वामित्व सनदांचे वितरण करण्यात आले. महसूल विभागांतर्गत ७८ उत्पन्न प्रमाणपत्रे, ५४ वय व अधिवास प्रमाणपत्रे, १९ जात प्रमाणपत्रे, १७ ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्रे आणि ४७ नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच ५६ जिवंत सातबारा उताऱ्यांचे वितरण करण्यात आले.

पुरवठा विभागामार्फत ५८ शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या. महिला बचत गटांच्या ३० नोंदणी करण्यात आल्या. वीज वितरणाशी संबंधित १५ प्रलंबित घरगुती वीज जोडण्यांना मंजुरी देण्यात आली.

# बांधकाम कामगारांच्या विद्यार्थ्यांचे अर्ज तातडीने सुरू करा!

## जाचक अटी रद्द करण्याची इंटकची मागणी; बालहक्क संरक्षण आयोगाकडे धाव

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या शैक्षणिक आर्थिक सहाय्य योजनेची अर्ज प्रक्रिया तातडीने सुरू करून जाचक अटी रद्द कराव्यात, अशी मागणी इंटकचे अकोला जिल्हाध्यक्ष तथा अमरावती विभागाचे प्रभारी पदमाकर भगवान वासनिक यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष आणि मंडळाच्या सचिवांना निवेदन देण्यात आले.



शासनाने १३ जुलै २०२६ रोजी नववी व अकरावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्याची तरतूद केली; मात्र चार महिन्यांपासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर (र्स्प्ेिदमै.ग्ह) अर्जाची लिंक उपलब्ध नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या मुलांना लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. पहिली ते सातवीदरम्यान २,५०० रुपयांची मदत घेतलेल्या विद्यार्थ्यांना नववीतील, तसेच दहावीत मदत घेतलेल्या विद्यार्थ्यांना अकरावीतील सहाय्य नाकारण्याच्या अटी रद्द कराव्यात, अशी मागणी इंटकने केली आहे. पुस्तके, वह्या, गणवेश व प्रवासाचा खर्च दरवर्षी होत असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्येक शैक्षणिक वर्षात मदत मिळावी, अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

नववी, अकरावी, बारावी तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अर्ज उपलब्ध करून द्यावेत. मंडळाच्या सचिवांना नोटीस बजावून विशेष सुनावणीसाठी बोलवावे आणि चार लाख विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांच्या प्रश्नावर तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी प्रशांत मेश्राम, रामेश्वर इंगळे, अरुणाताई लबडे, गौतम तायडे, दीपक रायबोले, प्रकाश रायबोले व संतोष लबडे उपस्थित होते.

# राज्यातील बालकांसाठी काँग्रेसच्या राज्यात ‘यशोमती’चे प्रेम

## तर भाजपच्या राज्यात ‘पुतना मावशी’चे - डॉ. सुधीर ढोणे

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाभारतात गोकूळातील ‘यशोमती’ने देवकी-वासुदेव यांच्या कृष्ण या सुपुत्राला आपल्या पुत्रवत माया देत वाढविले, हा इतिहास सर्वज्ञात आहे. राज्याच्या तत्कालीन महिला व बालविकास मंत्री यशोमती ठाकूर याही नावाप्रमाणे राज्यातील अनाथांसाठी आईची माया देणा-या ’यशोमती’ ठरल्या आहेत.

यशोमती ठाकूर यांनी विधवा, घटस्फोटीत महिलांसाठी तसेच त्यांच्या मुलांना आर्थिक साहाय्य देण्यासाठी सुरू केलेल्या ७ योजना राज्यातील भाजपा महायुती सरकारने बंद केल्या आहेत. ‘लाडकी बहीण’ योजना सुरू करून महिलांची मते घेवून सत्तेवर आलेल्या भाजपा महायुती सरकारने या महिला व त्यांच्या बालकांसाठी सुरू असलेल्या योजना बंद करून बालकांप्रती त्यांच्या मनात खरेखुरे प्रेम नसून पुतना मावशीचे प्रेम असल्याचे दाखवून दिले आहे. त्यामुळे राज्यातील बालकांसाठी काँग्रेसच्या राज्यात ‘यशोमती’चे प्रेम तर भाजपच्या राज्यात ‘पुतना मावशी’चे प्रेम असल्याचा दावा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते डॉ. सुधीर ढोणे यांनी केला आहे.

पौराणिक कथेनुसार, श्रीकृष्णाला मारण्यासाठी कंसाने पुतना नावाच्या राक्षसीला पाठवले होते. पुतनेने आईचे रूप घेऊन श्रीकृष्णाला विषप्रयोग करून दूध पाजण्याचा प्रयत्न केला होता. तिच्या मनात प्रेमाचे सोंग होते, पण उद्दिष्ट मात्र कृष्णाचा घात करण्याचे होते. असेच पुतना मावशीचे प्रेम भाजपा महायुती सरकारच्या मनात राज्यातील बालकांविषयी असल्याचे त्यांच्या निर्णयावरून सिध्द होत असल्याचा आरोपही डॉ. सुधीर ढोणे यांनी केला. कोरोनामुळे आईवडिलांचे छत्र हरपलेल्या बालकांना ५ लाख रूपयांची मदत, ० ते १८



**यशोमती ठाकुरांनी सुरु केलेल्या ७ योजना भाजपने केल्या बंद**

वयोगटातील अनाथ, निराश्रित, बेघर व अन्य प्रकारे आपत्तीत असलेल्या बालकांचे संगोपन व्हावे यासाठी असलेल्या बालसंगोपन योजनेचा निधी ४२५ रूपयांवरून प्रतिमाह ११०० रूपये करण्याचा निर्णय, कोरोनामुळे १ पालक गमाविलेल्या मुलांना प्रतिमाह २५०० रूपये देण्याचा निर्णय तसेच कोरोनामुळे विधवा महिला व त्यांच्या बालकांसाठी ’वात्सल्य’ उपक्रम सुरू करण्याचा निर्णय यशोमती ठाकूर यांनी अतिशय तळमळीने व युद्धपातळीवर घेतला होता.

कोरोनामुळे आईवडिलांचे छत्र हरपलेली राज्यात एकूण ४२ बालकांना ५ लाख रूपयांची मदत देण्याचा तसेच कोरोनामुळे १ पालक गमाविलेल्या राज्यातील १३९७ बालकांना दरमहा २५०० रूपये देण्याचा निर्णय यशोमती ठाकूर यांनी घेतला होता. कोरोनामुळे पती गमावलेल्या राज्यातील ५५७ महिलांसाठी ’वात्सल्य’ हा अभिनव उपक्रम सुरू करून यामध्ये निराधार मुले व महिलांच्या पुनर्वसनासाठी विविध विभागांच्या योजनांची सांगड घालण्यात आली होती. या उपक्रमांत महिलांना ’संजय गांधी निराधार योजना’ तसेच अन्य योजनांचा लाभ देण्याचा, निराधार महिलांसाठी रोजगार निर्मिती व उपजिविकेसाठी मदत देण्याची संकल्पना होती.

यशोमती ठाकुर यांनी सुरू केलेल्या चार योजना महायुती सरकारने गुंडाळल्या तर तीन पुढील वर्षापासून बंद होणार याशिवाय यशोमती ठाकुर यांनी महिला व बालकांसाठी सुरू केलेल्या अनेक कल्याणकारी योजना राज्यातील भाजपा महायुती सरकारने नुकत्याच बंद केल्या आहेत. महिलांसाठी बहुउद्देशिय सामाजिक केंद्रे, जिल्हा परिषदांमार्फत महिला मंडळांना अनुदान, देवदासींच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी जिल्हा परिषदांना सहाय्य देण्याची योजना, वीज नसलेल्या अंगणवाडी केंद्रांसाठी सौरउर्जा संच या चार योजना १६ ऑक्टोंबर २०२६ पासून बंद करण्यात आल्या आहेत. माझी कन्या भाग्यश्री योजना (सुधारित), निवारागृहे चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना साह्य देणारी योजना, कोरोनामुळे अनाथ झालेल्या बालकांसाठी आर्थिक सहाय्य योजना या तीनही योजना महायुती सरकारने पुढील वर्षापासून बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३०८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

# अस्वच्छते विरोधात मनपा आयुक्तांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन

## सर्वपक्षीय नेत्यांचा आक्रोश

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अस्वच्छता, ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढीग आणि विस्कळीत झालेल्या साफसफाई व्यवस्थेच्या निषेधार्थ दसऱ्याच्या दिवशी सर्वपक्षीय नेत्यांनी मनपा आयुक्तांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करून प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. सणासुदीच्या काळातही नागरिकांना घाण आणि दुर्गंधीचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करत, स्वच्छता व्यवस्थेचा तातडीने बोजवारा दूर करण्याची मागणी करण्यात आली. येत्या काळात परिस्थिती सुधारली नाही, तर आयुक्तांच्या कार्यालयात फटाके फोडून दिवाळी साजरी करू, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.



या आंदोलनात माजी नगरसेवक मुन्ना राठोड, युवा काँग्रेसचे समीर जवंजाळ, निलेश देशमुख, सचिन बावणेर, जितेंद्र भैसे, चंद्रकांत मेंढे यांच्यासह इतर कार्यकर्ते सहभागी झाले.

नवरात्र आणि दसऱ्यासारख्या महत्त्वाच्या सणांच्या काळात शहर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्याची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची आहे. मात्र, शहरातील अनेक भागांत नियमित साफसफाई होत नसल्याने कचरा साचत असून, नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. अस्वच्छतेमुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली.

नागरिकांकडून नियमित कर वसूल करणाऱ्या प्रशासनाला मूलभूत सुविधा पुरविण्यात अपयश का येत आहे, असा सवाल उपस्थित करत आंदोलनकर्त्यांनी आयुक्तांच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली.

### कंत्राटदारांच्या बिलांची चौकशी करा!

शहरातील साफसफाई व्यवस्था सुरळीत नसताना स्वच्छता कंत्राटदारांची बिले कोणत्या आधारावर अदा केली जात आहेत, असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. कंत्राटदारांकडे आवश्यक वाहनांची पुरेशी उपलब्धता आहे का, कचऱ्याची नियमित उचल होते का आणि प्रत्यक्ष कामाचा दर्जा काय आहे, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. कंत्राटदारांच्या कामाची प्रत्यक्ष तपासणी करून अनियमितता आढळल्यास जबाबदारी निश्चित करावी, अशीही भूमिका मांडण्यात आली.

### दिवाळीत पुन्हा आंदोलनाचा इशारा!

महानगरपालिका प्रशासनाने तातडीने स्वच्छता व्यवस्था पूर्ववत करावी, नियमित कचरा उचलावा आणि नागरिकांच्या तक्रारींची दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा आयुक्तांच्या कार्यालयात फटाके फोडून दिवाळी साजरी करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत प्रशासना विरोधातील लढा सुरू ठेवण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

# दर्यापूरमध्ये जुगार अड्ड्यावर एलसीबीचा छापा

## -१३ जणांवर गुन्हा दाखल -९ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दर्यापूर/प्रतिनिधीः-** शहरातील राजपूतपुरा परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर अमरावती ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या कारवाईत जुगारातील रोख रकमेसह मोबाईल, दुचाकी आणि चारचाकी वाहन असा एकूण ९ लाख ३३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १९ ऑक्टोबर रोजी ही कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील अवैध जुगार व्यवसायाला आळा घालण्यासाठी प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार दर्यापूर उपविभागातील पथक गस्त घालत असताना राजपूतपुरा येथील गजेंद्र गोपालसिंग बैस याच्या घरी पैशांची बाजी लावून जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी १३ जण ताशाच्या पत्त्यांवर 'एक्का बादशाह' नावाचा जुगार खेळताना आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्याकडून १ लाख ८ हजार ४५० रुपयांची रोख रक्कम, ८५ हजार रुपये किमतीचे १३ मोबाईल, २ लाख ४० हजार रुपये किमतीच्या तीन दुचाकी, ५ लाख रुपये किमतीची एक स्विफ्ट कार आणि ताशाचे ५२ पत्ते असा एकूण ९ लाख ३३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



### अकोला, वाशिम जिल्ह्यांतील आरोपींचाही समावेश

या कारवाईत तसवर खानतसलीम खान, अर्जुन गावंडे, अमित लोकपूरे, योगेश कात्रे, अमोल ठाकूर, जुबेर खान इस्माईल खान, रितेश नवलेकर, सागर काळे, योगेश उर्फ विक्की बिल्हेकर, नागेश सुलताने, मुज्जू खान सलीम खान, सुशील घुरमाडे आणि गजेंद्र बैस यांच्याविरुद्ध दर्यापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील काही आरोपी मूर्तिजापूर व कारंजा परिसरातील रहिवासी आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे, पोलीस अंमलदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, हर्षल काळे आणि वाहनचालक हर्षद घुसे यांच्या पथकाने ही कारवाई केली. प्रकरणाचा पुढील तपास दर्यापूर पोलीस करीत आहेत.

## लो-व्होल्टेजमुळे शेतकरी संकटात!

# सोनोरा येथील शेतकऱ्यांचा महावितरणला इशारा

### समस्या न सुटल्यास उपोषणाचा निर्धार

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** एकीकडे दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत असताना, दुसरीकडे शेतशिवारातील कमी दाबाचा वीजपुरवठा आणि वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. सोनोरा बु. येथील शेतशिवारात लो-व्होल्टेजच्या समस्येमुळे शेतीपंप सुरू होत नसल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले आहे. या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन वीजपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा उपोषणाला बसण्याचा इशारा माजी सरपंच सुरज शा. मेश्राम यांच्यासह शेतकऱ्यांनी महावितरण प्रशासनाला दिला आहे.



गेल्या काही दिवसांपासून सोनोरा बु. परिसरातील शेतशिवारात अत्यंत कमी दाबाने वीजपुरवठा होत असून, दिवसातून अनेकदा वीज खंडित होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. कमी दाबामुळे शेतीपंप सुरू होत नसल्याने पिकांना वेळेवर पाणी देणे शक्य होत नाही. पंप सुरू करण्याचा प्रयत्न केल्यास मोटारी जळण्याचाही धोका निर्माण होत असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. सध्या पिकांना पाण्याची नितांत गरज असताना वीजपुरवठ्याच्या या समस्येमुळे पिके सुकण्याची भीती व्यक्त होत आहे.

समस्या कायम राहिल्यास सर्व शेतकरी उपोषणाला बसणार असल्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.आता महावितरण प्रशासन या गंभीर समस्येची कितपत दखल घेते आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नेमकी कोणती पावले उचलते, याकडे सोनोरा बु. परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.यावेळी बबन कारंडे, संजय गोरे, संजय कोकरे, मोहन कुकरे,बबन आयनर, सुरज मेश्राम, मिलन जुनघरे, रवि उपाध्ये, पंकज शिंदे, प्रफुल खंडजोड, चेतन शेलोकार,शुभम ठोंबरे, नागोराव शेलोकार आदी शेतकरी उपस्थित होते.

# खाटीक समाज परिवर्तन संघटनेच्या महाजनपुरा शाखेचे उद्‌घाटन

**अमरावती/प्रतिनिधीः-** खाटीक समाज परिवर्तन संघटना (रजि. नं. महा. ४०८/१९/ एफ २७८३०) अंतर्गत अमरावती शहरातील महाजनपुरा, शिवाजी गेट येथील नवीन शाखेचे उद्‌घाटन अतिशय उत्साहात आणि सामाजिक वातावरणात पार पडले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर हरणे आणि शहराध्यक्ष संजय माहूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या या नवीन शाखेमुळे परिसरातील समाजबांधवांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.



यावेळी शाखा अध्यक्ष नरेंद्र ओंकारराव रावेकर, उपाध्यक्ष, धनराज रावेकर, सचिव, मोहन पारवे, सहसचिव, देवेंद्र रावेरकर, सदस्य दिनेश डोळे, संजय रावेकर, जीवनदास रावेकर, मोहनराव कटारे, दिलीप पारवे, वैभव खंडारे, प्रशांत गुजर, राजूभाऊ पारवे, सतीश रावेकर, संतोष रावेकर, गजानन पारवे, ललित ढोके, मयूर विल्हेकर, सुनील पारवे, रवी पारवे, महेंद्र रावेकर, रवी रावेकर, नरेश पारवे, अनिल पारवे, मंगेश ढोके, जितेंद्र रावेकर, संतोष पारवे, गोपाल माहोरे, अंकुश माहोरे, विजय पारवे, आदित्य डोईफोडे, धनराज डोईफोडे, सोनू माकोडे, रोहित गुजर, सागर ढोके, आशिष पारवे, लक्ष्मण पारवे, किशोर रावेरकर, प्रल्हाद रावेकर, सुरेश पारवे, हरिदास पारवे, सागर पारवे, नंदू हरणे, संजय माहुरकर, माणिकराव नेहर, शालिकराम कंटाळे, दीपक राव धनाडे, शंकरराव मांडवे, रामेश्वर माहुरकर, मोहन नेहर, विजयराव हरणे, त्रिशूल धनाडे, सुरेश माहुरे आदि उपस्थित होते.

उद्‌घाटनाकरिता प्रमुख अतिथि शहर अध्यक्ष युवा स्वाभिमान पार्टी अमरावती, पंकज उर्फ राजाभाऊ बागडे, शहर महासचिव अरविंद सावरकर, शहर सचिव रोहित गुजर, सोनू माकोडे, शहर वस्ती प्रमुख, पंकज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ता, सुरज बंटोले, सुरज बागडे, दिलीप भोसरी भासरे पाटील, प्रल्हाद रावेकर, अरुण सायम्बेकर, मयूर पाचंगे, नारायण रावेरकर, यश विजयकर, प्रफुल नांदुरकर, देवेश पारडे, सागर गणेशकर, राम तायडे, गौरव काळबांडे, कीर्ती रावेरकर, जयश्री रावेकर, रेखा रावेकर, कल्याणी रावेकर, सुमित्रा माहोरे, इंदिरा रावेकर, भारती रावेकर, काजल रावेकर, मंदाबाई रावेकर, पुनम सायम्बेकर, आरती पारवे, शितल डोईफोडे, प्रवीण रावेकर, गुंजन रावेकर, प्रभाबाई रावेकर, लताबाई पारवे, पिंकी पाचंगे, आरती पाचंगे, श्रेया पाटील, जान्हवी रावेकर, चंदाबाई रावेरकर आदि उपस्थित होते.

# मजुरी मागायला गेलेल्या तरुणाला जीवे मारण्याची धमकी

## विरुळ पूर्णा येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात मारहाण आणि हल्ल्याच्या तीन वेगवेगळ्या घटना उघडकीस आल्या आहेत. पोलिसांनी तिन्ही प्रकरणात बीएनएस कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. आसेगाव पोलीस ठाणे अंतर्गत विरुळ पूर्णा येथे शनिवारी सायंकाळी ४.४५ वाजता मुकिंद वानखेडे हे आरोपी मोहन बोबडे याच्या कडे मजुरीचे पैसे मागण्यासाठी गेले होते. त्यावेळी मोहन बोबडे याने त्यांना शिवीगाळ करून 'पुन्हा घराकडे आलास तर तुझा मर्डर करून टाकेन' अशी धमकी दिली.इतकेच नाही तर मुकिंद यांचा मुलगा घरी परतत असताना आरोपीने सत्तूर घेऊन त्याचा पाठलाग केला आणि मुलाच्या चेहऱ्यावर वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.मुकिंद वानखेडे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी मोहन बोबडे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

**लोणी मध्ये पत्नीला मारहाण-**

दुसरी घटना लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बहिलोलपूर येथे घडली. दारू पिऊन आलेल्या पती ज्ञानेश्वर पवार याने पत्नी रिंगना ज्ञानेश्वर पवार (वय २५) हिला लाकडी दांडक्याने डोक्यावर आणि दोन्ही हातांवर मारहाण केली. रिंगना यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पती ज्ञानेश्वर पवार याच्याविरुद्ध बीएनएस कलम ११८(१), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

**वाईन शॉपवर धारदार शस्त्राने हल्ला-**

तिसरी घटना चांदूर रेल्वे येथील डहाणे वाईन शॉपवर घडली. रविवारी दुपारी अडीच वाजता आरोपी राम जाने याने समीर राहुल वानखेडे याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून जखमी केले.

समीरच्या तक्रारी नुसार त्याच्या उजव्या हाताला आणि उजव्या पायाला दुखापत झाली असून नाकातून रक्तस्राव झाला आहे. आरोपीने लाथा-बुक्क्यांनीही मारहाण केल्याचे समीरने सांगितले. त्याच्या दोन मित्रांनी मध्ये पडून त्याला वाचवले आणि भांडण सोडवले. पोलिसांनी आरोपी विरुद्ध बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत चांदूर रेल्वे तालुक्यात विविध उपक्रम

## विद्यार्थ्यांना शासकीय योजनांची माहिती

## समतादूतांमार्फत शैक्षणिक मार्गदर्शन

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधींची माहिती मिळावी, स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी योग्य मार्गदर्शन मिळावे तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता यावा, या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने सेवा संकल्प अभियानांतर्गत चांदूर रेल्वे तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

बार्टीचे समतादूत सलीम खान के. पठाण यांनी समतादूत सागर जाखोटिया यांच्या सहकार्याने हे उपक्रम राबविले. सहायक आयुक्त, समाजकल्याण, अमरावती येथील राजेंद्र जाधवर तसेच प्रभारी प्रकल्प अधिकारी अनिता राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक आणि स्पर्धा परीक्षा विषयक माहिती देण्यात आली. या अभियानांतर्गत नशामुक्त भारत अभियान, यशस्वी विद्यार्थ्यांशी भेट व चर्चा, अभ्यासिकांना भेट, तसेच बार्टीच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये नीट व जेईई परीक्षांचे पूर्वतयारी प्रशिक्षण, एमपीएससी पूर्व परीक्षा मार्गदर्शन, आयबीपीएस, रेल्वे व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण, स्वाधार शिष्यवृत्ती, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार आणि जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश होता.



विद्यार्थ्यांमध्ये समता, न्याय, बंधुता, भारतीय संविधान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांची जाणीव निर्माण करण्यावरही विशेष भर देण्यात आला. शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक माहिती देऊन विद्यार्थ्यांना शिक्षण आणि करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यातील जिल्हा परिषद (माजी शासकीय) कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे, मन्नालाल गुप्ता विद्यालय; विद्यामंदिर विद्यालय, सातेफळ; जिल्हा परिषद शाळा, बग्गी; शाहू-फुले-आंबेडकर अभ्यासिका, राजुरा; तसेच नगरपरिषदेची जिजामाता कन्या शाळा येथे हे मार्गदर्शनपर उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून समतादूत सागर जाखोटिया उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ठाकरे सर यांनी भूषविले. कार्यक्रमाचे संचालन वाळके यांनी केले, तर कडू यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रुग्णालयाच्या ओपीडीत वन्यप्राण्याचा शिरकाव

## डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांची सतत वर्दळ असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) सोमवारी सकाळी एक वन्यप्राणी आढळल्याने काही काळ उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले. सकाळी साडेदहाच्या सुमारास 'स्मॉल इंडियन सिव्हेट कॅट' (Small Indian Civet Cat) हा प्राणी ओपीडी परिसरात शिरला. त्यानंतर त्याला सुरक्षितपणे रेस्क्यू करण्यात आले.

१९ ऑक्टोबर रोजी सकाळी ही घटना घडली. रुग्णालयाच्या ओपीडीमध्ये उपचारांसाठी आलेल्या नागरिकांची ये-जा सुरू असतानाच हा वन्यप्राणी परिसरात आढळून आला.

अनपेक्षितपणे प्राणी दिसल्याने उपस्थितांचे लक्ष त्याच्याकडे वेधले गेले. रुग्णालय परिसरात वन्यप्राणी शिरल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याला सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी हालचाली करण्यात आल्या. अखेर या प्राण्याला रेस्क्यू करण्यात यश आले.

त्यामुळे रुग्णालयातील रुग्ण आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संभाव्य धोका टळला. मात्र, हा प्राणी नेमका कोणत्या मार्गाने रुग्णालयाच्या ओपीडीपर्यंत पोहोचला, याची माहिती उपलब्ध झालेली नाही. तसेच त्याच्या बचावासाठी नेमक्या कोणत्या पथकाने कार्यवाही केली, याबाबतही अधिक तपशील समोर आलेला नाही.

फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

संपर्क : ९४२२८५७१६९
९४२२१२०४०६

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ४७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# नवरात्रीच्या पर्वावर अडीच दिवसासाठी विराजमान होते 'ईना माय'

## आजही जपल्या जाते ही लोकपरंपरा

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** नवरात्रोत्सवात देशभरातील देवींची भक्तिभावाने पूजा-अर्चा केली जाते. मात्र, अश्विन महिन्यातील महाष्टमीपासून विजयादशमीपर्यंत मातंग समाजात श्रद्धेने जपली जाणारी 'ईना माय' या देवीची अनोखी परंपरा आजही अनेकांसाठी कुतूहलाचा विषय आहे. हत्ती हे वाहन आणि सोबत बाळाचे स्वरूप असलेल्या या देवीची घरगुती स्थापना केली जाते. अडीच दिवस भाविकांच्या घरी विराजमान होणाऱ्या ईना आई च्या पूजाविधीमागील इतिहास अद्याप पूर्णपणे उलगडलेला नाही. त्यामुळे या वैशिष्ट्यपूर्ण लोकपरंपरेभोवती गूढतेचे वलय कायम आहे.

अश्विन महिन्यातील महाष्टमीला मातीच्या स्वरूपात ईना मातेची ची मूर्ती मातीपासून घडविली जाते. या देवीला 'ईना माय', 'ईनामाता' किंवा 'विना देवी' अशा वेगवेगळ्या नावांनी संबोधले जाते. त्यानंतर घरगुती स्वरूपात तिची स्थापना करून पूजा-अर्चा केली जाते. ही देवी अडीच दिवस भाविकांच्या घरी विराजमान असते. यावेळी पारंपारिक लोकगीते ज्येष्ठ आणि वयोवृद्ध महिला मंडळी गायन करतात. महाष्टमीला सुरू होणाऱ्या या पूजापरंपरेची सांगता विजयादशमीच्या काळात होते.

समाजातील पारंपरिक श्रद्धेनुसार, हा देवीचा माहेरपणाचा काळ मानला जातो. हत्ती हे तिचे वाहन असल्यामुळे तिच्या स्वरूपाचा संबंध गजलक्ष्मीशीही जोडला जातो. गजलक्ष्मीचे स्वरूप समृद्धी आणि वैभवाचे प्रतीक मानले जाते. त्याचप्रमाणे ईना माय ही मातृत्व, माया आणि भक्तांच्या रक्षणाचे प्रतीक असल्याची श्रद्धा आहे. ईना मातेची ची पूजा अनेक कुटुंबांमध्ये कुलदेवतेच्या स्वरूपात केली जाते. पिढ्यानपिढ्या चालत आलेली ही परंपरा आजही अनेक कुटुंबांनी जपली आहे. ग्रामीण भागातील बऱ्याच खेडेगावात ईना माय बसविल्या जाते अशातच बडनेरा येथील रहिवासी निवृत्त नायब तहसीलदार गजानन दादुजी खंडारे यांच्या कुटुंबात ईना मातेची स्थापना करण्याची परंपरा गेल्या १३१ वर्षांपासून सुरू आहे. त्यांच्या कुटुंबाने आजवर ही परंपरा श्रद्धेने जपली असून, दरवर्षी त्यांच्या घरी ईना मातेची स्थापना केली जाते. बदलत्या काळातही आपल्या पूर्वजांकडून आलेली परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न लोकसंस्कृतीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.





*'सोनं' देऊन घेतले जाते देवीचे दर्शन*-विजयादशमीच्या दिवशी आपट्याची पाने एकमेकांना देऊन 'सोनं' वाटण्याची परंपरा सर्वत्र प्रचलित आहे. याच दिवशी ईना मातेच्या दर्शनासाठीही ग्रामीण भागातील नागरिक आवर्जून एकत्र येतात. देवीला लिंबू कापून अर्पण करून 'जगो रे सोनं' असा जयघोष केल्या जातो. हे पूजाविधीचे वेगळेपण अधोरेखित करते. भाविक ईना मातेला दसऱ्यानिमित्त 'सोनं' अर्पण करून तिचे दर्शन घेतात. देवीसमोर नतमस्तक होऊन आपल्या मनातील इच्छा-आकांक्षा व्यक्त करतात. सुख, समाधान, शांती आणि समृद्धीसाठी प्रार्थना करतात. या निमित्ताने गावातील नागरिक एकत्र येत परंपरेचे जतन करतात.

**दही भात, लिंबू आणि गोडधोड नैवेद्याचा पाहुणचार**

ईना मातेच्या पूजेदरम्यान दहीभात, लिंबू आणि विविध गोडधोड पदार्थांचा नैवेद्य अर्पण केला जातो. देवीला माहेरवाशिणीप्रमाणे पाहुणचार देण्याची भावना या विधीमागे असल्याचे सांगितले जाते. अडीच दिवसांचा पूजाकाल पूर्ण झाल्यानंतर विजयादशमीच्या रात्री देवीची मूर्ती गावालगत असलेल्या विशिष्ट शेतात नेऊन ठेवली जाते. विशेष म्हणजे, अनेक देवींच्या मूर्तींप्रमाणे ईना मातेचे विसर्जन नदी किंवा तलावाच्या पाण्यात केले जात नाही. मूर्ती शेतात ठेवून तिची परंपरेनुसार पूजा-अर्चा केली जाते. त्याच शेताला मग ईना मातेचे शेत म्हणुन गावगाड्यात ओळखले जाते.निसर्गाशी जोडलेली ही प्रथा ईनामाय च्या पूजापद्धतीचे वेगळेपण अधोरेखित करते.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 620/22/2026

सार्वजनिक न्यासाचे नांव वमॉडर्न सोशल रिक्रीएशन क्लब, अमरावती ता.जि.अमरावती

नोंदणी क्रमांक एफ-२७०१५

अर्जदार - सैय्यद शब्बीर सैय्यद बशीर

गैरअर्जदार - १. श्री.राजेश बजरंग मिश्रा
२. सैय्यद शफिक सैय्यद बशीर
३. शेख करीम शेख हब्बु चौधरी
४. वसीम अकरम मो.असिफ

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९.१०.२०२६ रोजी दिली.

शिक्का

अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

# मेळघाटातील खटकाली गाव विकासापासून वंचित!

## स्वातंत्र्याच्या ८० वर्षांनंतरही मूलभूत सुविधांसाठी ग्रामस्थांची वणवण; प्रशासन नेमके करतेय काय?

**मेळघाट/वार्ताहर**

टाकीत पाणी नाही, मुलांकडे जन्मदाखले आणि आधारकार्ड नाहीत, रोजगाराची संधी नाही; खटकालीकरांच्या व्यथा ऐकणार तरी कोण?स्वातंत्र्याच्या आठ दशकांच्या प्रवासात देशाने विकासाची अनेक शिखरे गाठल्याचा दावा केला जात असताना, मेळघाटातील खटकाली हे गाव आजही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करत आहे. गावात ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, आरोग्य उपकेंद्र आणि पाण्याची टाकी असूनही सामान्य ग्रामस्थांच्या जीवनात या सुविधांचा अपेक्षित लाभ पोहोचत नसेल, तर विकासाच्या दाव्यांचे वास्तव तपासण्याची वेळ आली आहे. प्रश्न केवळ एका गावाचा नाही, तर दुर्गम भागातील प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा आणि वंचित नागरिकांप्रती असलेल्या उत्तरदायित्वाचा आहे.

पाण्याची टाकी आहे, पण पाणी कुठे?- खटकाली गावात पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे; मात्र टाकीत पाणीच उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना विहिरीतून पाणी भरून आपली तहान भागवावी लागत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. पाणीपुरवठ्यासाठी यंत्रणा उभी करणे हा विकासाचा एक भाग असला, तरी प्रत्यक्ष घरापर्यंत पाणी पोहोचणे हीच त्या सुविधेच्या यशाची खरी कसोटी आहे. टाकी उभी असूनही नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असेल, तर संबंधित यंत्रणेच्या कामकाजाचा आढावा घेणार कोण?

जन्मदाखले नाहीत; मुलांच्या आधारकार्डाचा प्रश्न कायम - गावातील अंगणवाडीतील लहान मुलांकडे जन्मदाखले नसल्यामुळे आधारकार्ड काढण्यात अडचणी येत असल्याचे सांगण्यात येत आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या आधारकार्डाचाही प्रश्न कायम असल्याची माहिती समोर आली आहे. जन्मदाखला आणि आधारकार्ड यांसारख्या कागदपत्रांअभावी मुलांना शासकीय योजनांचा लाभ, शैक्षणिक प्रक्रिया आणि इतर आवश्यक सेवांमध्ये अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

शौचालये बांधली, मग प्रत्यक्ष वापराची खात्री कोणी केली?-गावात शौचालयांची कामे ठेकेदारामार्फत पूर्ण झाल्याचे सांगितले जाते. मात्र, कामे पूर्ण झाल्याची नोंद आणि प्रत्यक्षात नागरिकांना उपयोगी पडणाऱ्या सुविधांमध्ये फरक असू शकतो. अधिकारी वर्गाने प्रत्यक्ष पाहणी न करता केवळ कागदोपत्री काम पूर्ण झाल्याच्या अहवालावर समाधान मानले असेल, तर त्याची चौकशी होणे आवश्यक आहे. संबंधित कामांची निष्पक्ष तपासणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी होत आहे.

रोजगाराचा अभाव; प्रशासन आणि ग्रामस्थांमध्ये दरी - खटकालीतील नागरिकांना उदरनिर्वाहासाठी सहज उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधींचा अभाव असल्याची व्यथा मांडण्यात आली आहे. पाणी, कागदपत्रे, स्वच्छता आणि रोजगार अशा मूलभूत प्रश्नांशी ग्रामस्थांना झगडावे लागत असेल, तर विकासाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यात नेमक्या कोणत्या त्रुटी राहिल्या, याचा शोध घेणे आवश्यक आहे. गावात ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय आणि आरोग्य उपकेंद्र असणे पुरेसे नाही. या कार्यालयांच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या कितपत सोडवल्या जातात, अधिकारी नियमितपणे उपलब्ध असतात का आणि तक्रारींवर वेळेत कार्यवाही होते का, याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. कार्यकर्ते थकले, आता प्रशासन जागे होणार का? - स्थानिक कार्यकर्त्यांनी खटकाली गावाला भेट देऊन ग्रामस्थांच्या समस्या, अडचणी आणि व्यथा जाणून घेतल्याचे सांगितले आहे. या समस्या वारंवार प्रशासनातील अधिकाऱ्यांसमोर मांडूनही अपेक्षित तोडगा निघत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. निवडणुकीच्या काळातील आश्वासनांपलीकडे जाऊन या गावांना प्रत्यक्ष भेटी, समस्यांची नोंद, निधीचे नियोजन आणि कालमर्यादेत कामे पूर्ण करण्याची हमी मिळणे आवश्यक आहे.विकास केवळ कागदावर, फलकावर किंवा अहवालात दिसून चालणार नाही.

# शिक्षकांच्या प्रश्नांचा अभ्यास, विविध संस्था-संघटनांचा पाठिंबा

## प्रा.डॉ.प्रशांत विघे यांची उमेदवारी चर्चेत

**अमरावती/का.प्र.**



अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवार प्रशांत विघे यांचा शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव, शिक्षक प्रश्नांवरील भूमिका आणि विविध संस्था-संघटनांचा पाठिंबा चर्चेत आहे. शिक्षकांच्या प्रश्नांचा अभ्यास करून ते संबंधित व्यासपीठांवर मांडण्यावर प्रा.डी.प्रशांत विघे यांनी भर दिला आहे.

अमरावती विभागातील पाच जिल्हे आणि ५६ तालुक्यांमधील शाळा, महाविद्यालये व शिक्षक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केल्याचे विघे यांनी सांगितले. वेळेअभावी प्रत्येक ठिकाणी प्रत्यक्ष भेट देणे शक्य न झाल्याने सहकाऱ्यांच्या माध्यमातून तसेच सोशल मीडियाद्वारे आपली भूमिका पोहोचविण्यात आली.शिक्षकांच्या आंदोलनांतील सहभाग, सिनेटमधील काम, शासन निर्णयांचा अभ्यास आणि शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवरील भूमिका यासंबंधीचे व्हिडिओ, पोस्ट व कागदपत्रे सोशल मीडियावर प्रसिद्ध करण्यात आली आहेत. त्यांच्या या प्रचाराला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

**अमरावती शिक्षक मतदारसंघातील पाच जिल्हे, ५६तालुक्यांतील शिक्षकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न; मतदारांशी सोशल मीडियातून संवाद**

**स्वतः शिक्षक असल्याने प्रश्नांची जाणीव**

आपण स्वतः शिक्षक असल्याने शिक्षण क्षेत्रातील समस्यांचा सखोल अभ्यास करूनच भूमिका मांडली पाहिजे, असे प्रा.विघे यांनी स्पष्ट केले. शिक्षकांच्या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळवून देणे, हा आपल्या संवादाचा केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी सांगितले.

या निवडणुकीत शैक्षणिक व प्रलंबित शिक्षक प्रश्न, उमेदवारांचा कार्यानुभव आणि विविध संस्था-संघटनांचा पाठिंबा हे मुद्दे चर्चेत आहेत. शिक्षक मतदार संघामध्ये प्रशांत विघे हेच योग्य उमेदवार असल्यामुळे त्यांना शिक्षक मतदार अधिक मोठ्या प्रमाणात कौल देत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

**संक्षिप्त**

### विज्ञान प्रदर्शनात जनता विद्यालयाचे दुहेरी यश



**अंजनगाव बारी-** तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जनता विद्यालय, अंजनगाव बारीने दुहेरी यश संपादन केले. इयत्ता नववीतील विद्यार्थी सोहम अमोल खंडार याने माध्यमिक विद्यार्थी गटातून, तर शिक्षक सुधीर बोरेकर यांनी शिक्षक गटातून प्रथम क्रमांक पटकावला. जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय, नांदगाव पेठ येथे १५ व १६ ऑक्टोबर रोजी आयोजित विज्ञान प्रदर्शनात सोहमने गढूळ पाण्यातील वस्तू शोधण्यासाठी उपयुक्त नावीन्यपूर्ण प्रतिकृती सादर केली. तांत्रिक विकास व चाचण्यांनंतर या संकल्पनेचा उपयोग गुन्ह्यांच्या तपासादरम्यान पाण्यातील वस्तू शोधण्यासाठी होऊ शकतो.या उल्लेखनीय यशाबद्दल प्राचार्य गजेंद्र अवघड, पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर यांच्यासह विद्यालयातील शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोघांचेही अभिनंदन केले. विद्यार्थी आणि शिक्षक या दोन्ही गटांत प्रथम क्रमांक मिळाल्याने विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये रावणाचे दहन करून विजयादशमी साजरी



**अमरावती-** स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये विजयादशमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दसरा हा एक महत्त्वाचा हिंदू सण असून तो आश्विन महिन्याच्या शुक्लपक्षातील दहाव्या दिवशी साजरा केला जातो.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शाळेच्या मुख्याध्यापिका साधना चंदेल यांनी भूषविले. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व माँ दुर्गा प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.विद्यार्थ्यांनी सुंदर अशी भाषणे देऊन विजयादशमी चे महत्व सांगितले.त्यामध्ये इयत्ता पाचवी,सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम अशी रामलीला व नवदुर्गा अवतार यावर नाटिका सादर करून रावण दहन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका साधना चंदेल यांनी आपल्या वक्तव्यातून विद्यार्थ्यांना आपल्यातील वाईट सवयी, दुर्गुण काढून रावण दहनांमध्ये दहन करावे असा मोलाचा संदेश देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रमाचे संचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी सांची धुरंदर व सानिका गवई यांनी केले. या कार्यक्रमाचा प्रभार शिक्षक जीवन वाढई, अमृता इंगळे,सुरज इंगळे इत्यादींनी सांभाळून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात

# 'फाउंडेशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स'या विषयावर सेमिनार

**अमरावती/का.प्र.**

येथील श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाच्या वतीने 'फाउंडेशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स' या विषयावर एक दिवसीय परिसंवादाचे (Seminar) यशस्वी आयोजन पंजाबराव देशमुख सभागृहात करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे उद्घाटक व मुख्य वक्ते म्हणून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स अँड ॲप्लिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. मुकुल एम.भोंडे उपस्थित होते. त्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) चे महत्त्व, भविष्यातील संधी आणि विविध क्षेत्रांतील त्याचा प्रभाव यावर सखोल व महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.या परिसंवादाला प्रमुख उपस्थिती म्हणून मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम विभागाचे प्रमुख डॉ. कुमार बोबडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख तथा परिसंवादाचे समन्वयक डॉ. संजय के. कटाईत यांनी मांडले. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश आणि एआय तंत्रज्ञानाची आजच्या काळातील गरज यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.महेंद्र मेटे यांनी शिक्षण व संशोधन कार्यामध्ये ए.आय. तंत्रज्ञानाचा वापर



प्रभावीपणे होत असुन विद्यार्थ्यांनी त्याचा वापर करावा असे मत व्यक्त केले.संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन डॉ. दर्शना चौधरी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. स्वाती चौधरी यांनी मानले. या परिसंवादाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सुदर्शन लोहकरे व प्राध्यापक शाहू गुडधे यांनी विशेष परिश्रम घेऊन नियोजन केले.या कार्यक्रमाला वाणिज्य विभागातील प्रा.चेतन खोडके, डॉ. विनय बुरंगे, डॉ. दिनेश बेले, डॉ. योगेश इंगळे, डॉ. रसिका देशमुख, डॉ. मंजुषा ठाकरे, प्रा.माधवी राठोड, प्रा.पायल सरडे, प्रा.नयन बोकडे, प्रा. प्रज्वलि काळे तसेच प्रा.रुपेश फसाटे यांच्यासह महाविद्यालयातील इतर सर्व विभागांतील प्राध्यापक वर्ग आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांनी या परिसंवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### विद्यापीठाच्या हिवाळी - २०२६ च्या लेखी परीक्षा पुढे ढकलल्या

**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ च्या लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत, परंतु महाराष्ट्र विधानपरिषद अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीमुळे २३ ऑक्टोबर रोजी होणा-या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत.विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी जारी केलेल्या पत्रकानुसार, २३ ऑक्टोबर,रोजी होणा-या सर्व परीक्षा आता ३० ऑक्टोबर रोजी पूर्वीच्याच निश्चित वेळ व परीक्षा केंद्रांवर घेतल्या जातील. या बदलाची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच महाविद्यालयांनी आपल्या विद्यार्थ्यांना याची जाणीव करुन द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

### NELTAS परीक्षेत पी.आर.पोटे पाटी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची भरारा



**अमरावती-** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी NELTAS ECAT Assessment Round–Rising Star २०२६-२०२७ या परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या परीक्षेत एकूण १९ विद्यार्थ्यांनी Rising Star हा बहुमान प्राप्त केला. यामध्ये इयत्ता चौथीतील हर्षिता चतुर्वेदी हिने ९२ गुण मिळवून विशेष यश संपादन केले. तसेच देवांश निशिकांत दाळू याने ८६ गुण, गोईजिरी संदीप चौधरी हिने ८४ गुण, शिवांश अभिनव खांडेवाल याने ८२ गुण, तर रुतांश पंकज ठाकरे व आस्था सचिन गावंडे यांनी प्रत्येकी ८० गुण मिळविले.

या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये अश्लेषा अतुल कोळव, अनीत प्रफुल घोरमाडे,कृषिव उवाल फाटे,समंथा गोंडाळे, आदिश्री आर.चौधरी, रुत्वी नितेश जैस्वाल,अन्वी मयूर शिंगणे,आर्यन गौरव धनस्कर, हर्ष राहुल देशमुख, ओवी एस. खंडारे,तेजस जितेंद्र उके,उत्कर्षा सुधीर लाजदरे, श्रावणी आनंद खंडारे आणि गोईजिरी संदीप चौधरी यांचा समावेश आहे.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य,सचिन दुर्गे सर शिक्षकवृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा येथे मूल्यवर्धन विशेष शिक्षण परिषदेचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

जि.प. प्राथमिक शाळा, अंचलवाडी येथे केंद्र पूर्णा नगर पंचायत समिती भातुकली अंतर्गत श्री रामेश्वरजी माळवे ग.शि. अ. पंचायत समिती भातकुली यांच्या प्रेरणेने 'मूल्यवर्धन विशेष शिक्षण परिषदेचे' आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष आरती रोशन पाथरे (अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती) जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा अंचलवाडी यांनी भूषविले. विशेष अतिथी म्हणून गावच्या सरपंचा वैशाली कालमेघ व पोलिस पाटील मनिषा गोवर्धन पाथरे या होत्या, मूल्यवर्धन तालुका समन्वयक ज्योती औघड व केंद्राचे केंद्र समन्वयक शैलेश मांदळे यांची मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लाभली. मान्यवरांचे हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच शाळेतील माजी विद्यार्थ्यांनी सृष्टी उमेश पाथरे, स्वरा सतीश पाथरे व प्रांजल प्रवीण वरठे यांनी या परिषदेमध्ये सहभाग घेऊन उत्कृष्ट असे स्फूर्ती गीत (हे राष्ट्र देवतांचे हे राष्ट्र प्रेषितांचे) व स्वागत गीत (किस तरह से करे हम नमन आपका) सादर करून पाहुण्यांचे व उपस्थित गुरुजनांचे मने जिंकली. कार्यक्रमांमध्ये सत्कारमूर्ती कीर्ती विकास पाथरे,वैशाली गजेंद्र काळमेघ (माजी सरपंच) अंचलवाडी, मनिषा गोवर्धन पाथरे



(पोलीस पाटील) अंचलवाडी तर स्फूर्ती गीत,स्वागत गीत व ख्याल गायन याला तबल्यावर संगत देणारा बालकलाकार कुमार स्पंदन विजय भाजपाले या सर्वांचे शाळेच्या वतीने शॉल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.त्या नंतर पूर्णा नगर केंद्राचे केंद्र समन्वयक शैलेश मांदळे यांनी कार्यक्रमाची प्रास्ताविका करून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. विशेष म्हणजे याच परिषदेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा अंचलवाडी येथील माजी विद्यार्थिनी सृष्टी उमेश पाथरे हिने राग बिहाग मधील छोटा ख्याल (झनझन तोरी बाजे पैंजनिया ) गायन करून सर्व उपस्थित मान्यवरांचे मने जिंकली. या मूल्यवर्धन कार्यशाळेचे मार्गदर्शक ज्योती अवघड यांनी सत्र एक मध्ये कार्यशाळेचा परिचय व मूल्यवर्धन क्षमता मूल्ये व निष्पत्ती याविषयी या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले,तर सत्र २ व ३ मध्ये अनुक्रमे राजकुमार गंगराळे यांनी नवीन शैक्षणिक क्षेत्रातील सहा लक्ष व मूल्यवर्धन उपक्रम व प्रात्यक्षिक याविषयी माहिती दिली व उपस्थित शिक्षकांकडून या कार्यशाळेमध्ये प्रात्यक्षिक करून घेतले. सत्र ४ मध्ये पूर्णा नगर केंद्राचे केंद्र समन्वय शैलेश मांदळे यांनी शिक्षण परिषदेमध्ये शिक्षक भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले व इतर प्रशासकीय बाबींवर सुद्धा चर्चा घडविण्यात आली.कार्यक्रमाचे संचालन शाळेचे सहाय्यक शिक्षक विजय भाजपाले यांनी केले तर आभार शाळेच्या मुख्याध्यापिका विमल श्रीनाथ यांनी केले. या परिषदेला पूर्णा नगर केंद्रांतर्गत येणाऱ्या सर्व शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. शिक्षण परिषदेमध्ये उपस्थित मान्यवर विद्यार्थी व शिक्षकांकरिता स्वादिष्ट अशा फराळाची व्यवस्था करण्यात आली होती.

# महावितरणच्या 'सौदामिनीं'ला सामाजिक कार्याची झालर

## 'सन्मान सौदामिनिचा' कार्यक्रमातून कर्तृत्वाचा गौरव

**अमरावती/का.प्र.**



महावितरणसारख्या अत्यावश्यक सेवेत कार्यरत असताना महिला कर्मचाऱ्यांना नोकरीसोबत कुटूंबाची जबाबदारी सांभाळण्याचे दुहेरी आव्हान असते. असे असतानाही, अमरावती जिल्ह्यातील महावितरणच्या काही महिला कर्मचाऱ्यांनी महावितरणच्या सेवेसोबतच किडणी प्रत्यारोपणाच्या सामाजिक चळवळीला गती दिली आणि काहींनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून महावितरणचा नावलौकिक वाढवला आहे. या 'सौदामिनीं'चा महावितरणला सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले. या प्रसंगी अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे, संजय श्रृंगारे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, कल्पना भुले यांच्यासह जिल्ह्यातील महावितरणच्या महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.यावेळी विचार मांडतांना आद्यश्री कांबे म्हणाल्या की, महिलांनी समाज कार्यासाठी आपल्या स्त्री शक्तिचा वापर करावा.त्यांच्या या उल्लेखनीय कार्यासाठी लाईफ डेव्हलपमेंट सोसायटीतर्फे त्यांना 'सर्वोत्कृष्ट विदर्भ महिला २०२५' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता रूपाली खोब्रागडे यांनी सामाजिक कार्याचे छंद जोपासण्याचे आव्हान केले. त्यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेऊन विविध संघटनांनी त्यांना 'नवचेतना समाजरत्न', 'महाराष्ट्र समाजभूषण' आणि 'राष्ट्रमाता मातृसन्मान' अशा पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. ग्राहक तक्रार निवारण मंच येथे कार्यरत आणि हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाशी संलग्न असलेल्या वैशाली अग्निहोत्री म्हणाल्या की,महिलांना स्वताला सक्षम बनवायला हवे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना 'विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार' आणि भारतीय सैन्याकडून देण्यात येणाऱ्या 'मेरी संतान' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याशिवाय, तंत्रज्ञ असलेल्या माधुरी वानखडे यांनी ग्राहकसेवेला समर्पित काम करण्याचे आव्हाने केले. एल.एल.बी. सारखे उच्च शिक्षण पूर्ण करत माधूरी वानखडे यांनी आवड जपल्याने एक उत्कृष्ट नाट्य कलावंत म्हणून जिल्ह्यात त्यांचे नाव आहे. तर जनमित्र म्हणून कार्यरत असलेल्या मनीषा कांबळे म्हणाल्या की, पारंपरिक वृत्तीला छेद देत महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यांनी वीज क्षेत्राच्या आव्हानात्मक कामातही सिध्द करण्याचे आव्हान केले. कार्यक्रमाचे संचालन व्यवस्थापक विकास बांबल यांनी केले, तर किरण रोहणे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची यशस्वी सांगता केली.

# गणितातील गोडी वाढविण्यासाठी गणित विषयक जनजागृती उपक्रम



**चांदुर रेल्वे-** राजर्षी शाहू सायन्स कॉलेज येथील गणित विभागाच्या वतीने स्व. सुलभाताई जगताप माध्यमिक विद्यालय, निमगव्हाण येथे 'वैदिक गणितातून गणिताची गोडी' हा गणित विषयक जनजागृती उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.या उपक्रमाच्या समन्वयिका डॉ. रेखा केने तसेच बी.एस्सी. भाग दोनचे विद्यार्थी महेश ठाकरे व राणी शिवणकर यांनी वैदिक गणितातील विविध सोप्या युक्त्या,गणिती उदाहरणे व कृतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विविध गणितीय खेळ व प्रश्नांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गणिताचा आनंददायी अनुभव मिळाला.विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने प्रश्न विचारून उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर.वडनेरकर यांनी आपल्या मनोगतात,'वैदिक गणितामुळे गणित सोपे, जलद आणि मनोरंजक बनते असे सांगितले. विद्यालयाचे मुख्याध्यापक मोहोड यांनी या उपक्रमाचे कौतुक करून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता व्यक्त केली.या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर. वडनेरकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच आयक्यूएसी समन्वयक प्रा.एस.ए.वाणी, गणित विभागप्रमुख डॉ. रेखा केने आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ.एम.एस. पळसपगार यांच्या सहकार्याने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी रुची निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

# अवैध उत्खननाविरोधात खाण-क्रशर असोसिएशननेच थोपटले दंड!

## खदानधारकांच्या बेकायदा ब्लास्टिंगचा मुद्दा ऐरणीवर

**-जिल्हाधिकाऱ्यांकडून तपासणीचे आदेश**

**-६ मीटरच्या अटीला हरताळ;**

**विनापास गौणखनिज वाहतुकीवरही कारवाईची मागणी**

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोला जिल्ह्यात गौणखनिज उत्खनन आणि खदान व्यवसायाभोवती सुरू असलेल्या कथित अनियमिततेचा मुद्दा आता खाण-क्रशर उद्योजकांच्या संघटनेनेच थेट प्रशासनाच्या दरबारात उपस्थित केला आहे. अकोला जिल्हा खाण व क्रशर उद्योजक संघाने अवैध उत्खनन, परवानगी विना ब्लास्टिंग, खदानींच्या निर्धारित खोलीच्या मर्यादेचे उल्लंघन आणि स्वामित्वधन न भरता गौणखनिजाची वाहतूक होत असल्याबाबत तक्रार केली आहे. विशेष म्हणजे, या तक्रारीतून खदान व्यवसायातील नियमपालनावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संघटनेने उपस्थित केलेले मुद्दे प्रत्यक्षात किती खदानधारकांच्या अडचणी वाढवणार, याकडे आता लक्ष लागले आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी या प्रकरणी अधीनस्थ यंत्रणांना तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हा खनिकर्म विभागाच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष नवीनचंद्र खोसला आणि अनिता मनोज राजगुरे यांना दिलेल्या पत्राच्या माध्यमातून ही बाब समोर आली आहे.

संघटनेच्या लेटर हेडवर दिलेल्या निवेदनाच्या आधारे जिल्हाधिकारी कार्यालयाने उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील खदानींची तपासणी करण्यास सांगितले आहे. त्यामुळे संघटनेने केलेल्या आरोपांची आता महसूल आणि खनिकर्म यंत्रणेकडून पडताळणी होण्याची शक्यता आहे.



### सहा मीटरची मर्यादा; काही खदानी ३० मीटरपर्यंत खोल?

तात्पुरत्या परवान्याच्या आधारे सुरू असलेल्या खदानींमध्ये सहा मीटर खोलीच्या मर्यादेचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा गंभीर मुद्दाही संघटनेने मांडला आहे. काही खदानी तब्बल ३० मीटरपर्यंत खोल खोदण्यात आल्याचा दावा करण्यात आला असून, अशा खदानींची प्रत्यक्ष स्थळपाहणी करून नियमभंग आढळल्यास त्या तातडीने बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात केवळ कागदोपत्री तपासणी पुरेशी ठरणार नाही. खदानींची प्रत्यक्ष खोली, मंजूर उत्खनन क्षेत्र, परवानगीतील अटी आणि प्रत्यक्षात काढण्यात आलेल्या गौणखनिजाचे प्रमाण यांची तांत्रिक पडताळणी आवश्यक आहे. त्यासाठी इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन (ऊंए) या आधुनिक मोजणी पद्धतीने प्रत्येक खदानीची मोजणी करण्याची मागणी संघटनेने केली आहे. मोजणीमध्ये निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक उत्खनन झाल्याचे स्पष्ट झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई होणार का, हा या प्रकरणातील महत्त्वाचा प्रश्न आहे. तसेच परवानगीच्या अटींचे उल्लंघन करणाऱ्यांना केवळ नोटीस देऊन सोडले जाणार, की प्रत्यक्ष उत्खनन बंद करून दंडात्मक कारवाई केली जाणार, याकडेही लक्ष राहणार आहे.

### प्रशासनाच्या आदेशानंतर कारवाईकडे लक्ष

अकोला जिल्हा खाण व क्रशर उद्योजक संघाने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने हे पत्र काढण्यात आले असून, ते जिल्हा खनिकर्म विभागामार्फत संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या निर्देशानुसार अधीनस्थ यंत्रणांनी तपासणी करून अहवाल सादर करणे अपेक्षित आहे. मात्र, या प्रकरणातील खरी कसोटी तपासणीच्या आदेशात नसून त्याच्या अंमलबजावणीत आहे. सहा मीटरच्या मर्यादेचे उल्लंघन, परवानगीविना ब्लास्टिंग आणि स्वामित्वधन न भरता वाहतूक यांसारख्या मुद्द्यांची निष्पक्ष चौकशी झाली, तर खदान व्यवसायातील नियमपालनाचे वास्तव समोर येऊ शकते. संघटनेने उपस्थित केलेल्या आरोपांना अधिकृत तपासणीत दुजोरा मिळतो का आणि दोषी आढळणाऱ्यांवर प्रत्यक्ष कारवाई होते का, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### ■ स्वामित्वधन न भरताच गौणखनिजाची वाहतूक?

गौणखनिजाच्या वाहतुकीतही नियमभंग होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. स्वामित्वधनाचा भरणा न करता तसेच आवश्यक वाहतूक पासशिवाय गौणखनिजाची वाहतूक सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारांमुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याची शक्यता असून, वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची कागदपत्रे, वाहतूक पास आणि स्वामित्वधन भरण्याच्या नोंदी तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. अवैध उत्खनन आणि विनापास वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महसूल व खनिकर्म विभागाची भरारी पथके, स्थायी पथके, मंडळ अधिकारी आणि तलाठी यांच्यामार्फत नियमानुसार तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले आहेत. त्यामुळे आता प्रत्यक्ष क्षेत्रीय तपासणीतून कोणत्या खदानधारकांनी नियमांचे पालन केले आणि कुठे अनियमितता आढळते, हे स्पष्ट होणार आहे.

### ■ ब्लास्टिंगसाठी परवानगीचा मुद्दा ऐरणीवर

खदान परिसरात दगड फोडण्यासाठी केल्या जाणाऱ्या ब्लास्टिंगच्या परवानगीचा मुद्दा संघटनेने उपस्थित केला आहे. संबंधित सक्षम प्राधिकरणाची, विशेषतः खाण सुरक्षा महासंचालनालयाची (ड्ङश्‍ए) आवश्यक परवानगी नसताना काही खदानधारकांकडून ब्लास्टिंग सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. जिल्ह्यात केवळ चार ते पाच खदानधारकांकडेच आवश्यक परवानगी असल्याची माहिती संघटनेने दिल्याचे समजते. मात्र, या संख्येची स्वतंत्र प्रशासकीय पुष्टी अद्याप झालेली नाही. ब्लास्टिंगसारख्या संवेदनशील प्रक्रियेत आवश्यक परवानग्या, सुरक्षा नियम आणि तांत्रिक अटींचे पालन अनिवार्य असते. त्यामुळे संघटनेच्या तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित खदानधारकांच्या परवानग्या, प्रत्यक्ष कामकाज आणि सुरक्षा व्यवस्थेची सखोल चौकशी करावी लागणार आहे. दुसरीकडे, परवानगी नसल्याचा आरोप म्हणजे संबंधित खदानधारक दोषी ठरले, असे गृहीत धरता येणार नाही. त्यासाठी अधिकृत तपासणी आणि कागदपत्रांची पडताळणी निर्णायक ठरेल.

# बंदोबस्तावरून परतलेल्या पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

## गाडगेनगरात अंबिका नगर परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात बंदोबस्ताची जबाबदारी पार पाडून घरी परतलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचा मृतदेह बुधवारी सकाळी राहत्या घरी आढळून आल्याने पोलीस विभागात खळबळ उडाली. अमर गोपालराव तायडे (बक्कल क्रमांक १८४५) असे मृत कर्मचाऱ्याचे नाव असून, त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती आहे.



गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मार्डी रोडवरील अंबिका नगर, दत्त विहार कॉलनी येथे ही घटना घडली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अमर तायडे हे बुधवारी पहाटे बंदोबस्ताची ड्युटी संपवून घरी परतले होते. त्यानंतर पहाटे पाच ते सहा वाजताच्या सुमारास त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. घटनास्थळी पोलिसांना सुसाइड नोट आढळल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या नोटमध्ये नेमके काय लिहिले आहे आणि त्यातून मृत्यूमागील कारणाबाबत काही संकेत मिळतात का, याकडे लक्ष लागले आहे. तायडे हे काही काळापासून घरगुती कारणांमुळे तणावात असल्याची चर्चा असली, तरी त्याला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. घटनेची माहिती मिळताच संबंधित पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मृत्यूमागील परिस्थिती, सुसाइड नोटमधील मजकूर आणि अन्य बाबींच्या अनुषंगाने तपास सुरू आहे.

आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तपासानंतरच या घटनेमागील परिस्थिती उघड होण्याची शक्यता आहे.

# धारदार शस्त्राने युवकाची हत्या



### नाली पाईपच्या वादातून घटना

**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार पोलीस स्टेशन हद्दीतील शिरजगाव बंड येथे काल झालेल्या वादातून एका ३८ वर्षीय युवकाची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मृतकाची ओळख वसीम खान शहादत खान पैलवान (वय ३८ वर्ष, रा. शिरजगाव बंड) अशी झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत वसीम खान आणि आरोपी आर्यन रहमत खान हे दोघेही एकमेकांच्या शेजारी राहतात. काही दिवसांपूर्वी (१९ तारखेला) दुपारच्या सुमारास नालीच्या पाईपसंदर्भात दोघांमध्ये वाद झाला होता. हा वाद काही लोकांनी आपसात मिटवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, आज सायंकाळी सात वाजता वसीम खान दूध आणण्यासाठी घराबाहेर पडले असता हा जीवघेणा हल्ला झाला. दूध आणण्याकरिता जात असताना आरोपी आर्यन खान दुचाकीवरून तिथे आला आणि रस्त्यावरच वसीम खान यांच्यावर धारदार शस्त्राने बेछूट वार केले. या हल्ल्यात वसीम खान गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळले.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने जखमी वसीम खान यांना चांदूरबाजार ☞(पान २ वर)

# डॉ. भोजने मॅटरनिटी हॉस्पिटल सील

## बाळाच्या कथित विक्री प्रकरणात कारवाई






**अमरावती/प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलीच्या प्रसूतीनंतर तिच्या बाळाच्या कथित विक्रीच्या प्रकरणात आज बुधवार २१ ऑक्टोंबर रोजी राजापेठ परिसरातील डॉ. वैशाली भोजने यांचे रुग्णालय सील करण्यात आले आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून डॉ. वैशाली भोजने आणि त्यांचे पती पसार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोग्य विभाग आणि पोलीस पथकाने ही कारवाई केली आहे.

माहिती नुसार एका अल्पवयीन मुलीच्या प्रसूती नंतर नवजात बाळाच्या विक्रीचा प्रयत्न केल्या प्रकरणी डॉ. वैशाली भोजने त्यांचे पती आणि ☞(पान २ वर)

# भावाचा साखरपुडा जिव्हारी मोठ्या भावासह तरुणीवर चाकूने हल्ला

## लहान भाऊ आणि साथीदार ताब्यात, कुलकर्णी रुग्णालयाजवळील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोठ्या भावाचा साखरपुडा झाल्याच्या नाराजीतून लहान भावाने साथीदाराच्या मदतीने त्याच्यावर आणि त्याच्यासोबत असलेल्या तरुणीवर चाकूने हल्ला केल्याची घटना दसऱ्याच्या रात्री राजापेठ परिसरात घडली. कुलकर्णी रुग्णालयाजवळ झालेल्या या हल्ल्यात मयूर जामोदकर (वय २८, रा.





छत्रसाल नगर) आणि त्याच्यासोबतची तरुणी जखमी झाली. तरुणीची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी धीरज गोविंद ☞(पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी घनकचरा निविदा प्रकरणी हायकोर्टाचा दणका

## प्रधान सचिवांना चार आठवड्यात निर्णयाचे निर्देश

**-नगरसेविका सीमा विजेकर यांच्या याचिकेला यश**



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेची घनकचरा व्यवस्थापन निविदा प्रक्रिया सुरुवातीपासूनच विविध कारणांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करत, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या महिला नगरसेविका सीमा गजानन विजेकर यांनी प्रशासकीय पातळीवर आणि सर्वसाधारण सभेत वारंवार आक्षेप नोंदवले होते. मात्र, सत्ताधाऱ्यांनी व प्रशासनाने त्यांच्या या आक्षेपांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. अखेर या दुर्लक्षाचा परिणाम म्हणून हे प्रकरण थेट मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर ☞(पान २ वर)

# चांदूर रेल्वेत वीजपुरवठा व्यवस्थेचा भोंगळ कारभार

## नागरिक त्रस्त, लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षाचा आरोप

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक, व्यापारी, लघुव्यावसायिक आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शहराला धामणगाव रेल्वे येथून वीजपुरवठा केला जात असून, वीजवाहिन्यांमधील वारंवार बिघाड आणि तांत्रिक समस्यांमुळे शहरातील वीजपुरवठा विस्कळीत होत आहे. महिन्यातून दोन ते तीन दिवस वीजपुरवठा खंडित होण्याचे ☞(पान २ वर)

■ 'चांदूर रेल्वे शहराला अखंडीत आणि सुरळीत वीजपुरवठा मिळणे हा नागरिकांचा हक्क आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होऊनही कायमस्वरूपी उपाययोजना केली जात नसेल, तर याविरोधात मोठे आंदोलन उभारण्यात येईल,' असा इशारा आप नेते नितीन गवळी यांनी दिला.

# प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना २ कोटी ७६ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान वितरण



**खल्लार/प्रतिनिधीः-** नजिकच्या असदपूर येथे सरळ खरेदी धारक शेतकऱ्यांना २ कोटी ७६ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार गजानन लवटे, आमदार प्रविण तायडे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. जुळ्या गावातील सरपंच मोहन मुंदाणे, शहापूरचे ☞(पान २ वर)

# नाइट ड्युटीनंतर घरी झोपलेल्या युवतीचा मृत्यू

## गगलानी नगरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** रात्रपाळीची ड्युटी पूर्ण करून घरी परतलेल्या २८ वर्षीय युवतीचा झोपेत असताना मृत्यू झाल्याची घटना शहरातील गगलानी नगर परिसरात उघडकीस आली. नेहा रवींद्र चौरपगार असे मृत युवतीचे नाव आहे. दुपारी आईने फोन केल्यानंतरही मुलगी प्रतिसाद देत नसल्याचे लक्षात आले आणि कुटुंबीयांची धावपळ सुरू झाली. मात्र, रुग्णालयात नेल्यानंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेहा ☞(पान २ वर)



# मोटरचा शॉक लागल्याने तरुणाचा मृत्यू

## वडगाव येथील धक्कादायक घटना

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** दसऱ्याच्या दिवशी धामणगाव रेल्वे तालुक्यातील वडगाव राजदी गावात एक हृदयद्रावक घटना घडली आहे. पाण्याची मोटर सुरू करताना अचानक विजेचा जोरदार धक्का लागल्याने कार्तिक वसंत पोसरे (वय २४ )या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही दुर्घटना मंगळवारी २० ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ७:३० वाजताच्या सुमारास घडली. सणाच्या दिवशीच घरातील तरुण मुलाच्या अचानक जाण्याने संपूर्ण गावात शोककळा ☞(पान २ वर)



# अपहरण झालेल्या बालकाची सुखरूप सुटका

**-सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपासाला दिशा**

**-हमालपुऱ्यातील ३८ वर्षीय महिला अटकेत**

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ येथील ओसवाल भवनात गरबा पाहण्यासाठी गेलेल्या कुटुंबातील पाच वर्षीय बालकाचे अपहरण झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर शहर पोलिसांनी वेगाने तपासचक्रे फिरवली. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती आणि स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अवघ्या २४ तासांच्या आत बालकाचा शोध घेऊन त्याची सुखरूप सुटका करण्यात आली. या प्रकरणी हमालपुऱ्यातील ३८ वर्षीय महिलेला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखा आणि राजापेठ पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ ऑक्टोबर रोजी एक महिला आपल्या पाच वर्षीय मुलाला घेऊन शेजारच्या महिलांसोबत ओसवाल ☞(पान २